# इब्री

With Study Notes

# इब्री लोकांस पत्र

*इब्री लोकांस पत्र*

## 1

1 प्राचीन काळी परमेश्वर अनेकदां निरनिराळ्या पद्धतीने[*] पूर्वजांशी[*] संदेष्टयांद्वारे[*] बोलला[*]. 2 [*][*]या काळातील शेवटल्या
दिवसांत, तो आपल्या पुत्राद्वारे[*] आपल्याशी बोलला आहे. परमेश्वराने पुत्रास सर्व गोष्टींचा वारीस[*] केले व त्याच्याद्वारेच त्याने या
सृष्टीची रचना केली[*].
3 ते (येशू) परमेश्वरी गौरवाचे आणि त्याच्या तत्वाचे प्रतिरूप आहेत[*]. आपल्या शब्दाच्या शक्तीने[*] येशू सर्व वस्तूंचा सांभाळ

---

[*] *“अनेकदां ......पद्धतीने”*- पाहा उत्प 15:1,12; 18:1,10; 28:12-15; निर्ग 3:1-4; 19:20; 25:22; 33:11; 34:5-7; यहो 5:13-15; 2 शमु 23:1-3; 1 राजे 19:11-13; यश 6:1-8; यिर्म 1:4,9,10;

[*] *“पूर्वजांशी”*- इब्री लोकांचे पूर्वज.

[*] *“संदेष्टयांद्वारे”*- जुन्या करारात असलेले ते लोक ज्यांना परमेश्वराने प्रेरित करून आपला संदेश देण्यासाठी पाठवले- उत्प 20:6यांशी संबोधित नोट्स पाहा. जुन्या कराराचे अध्ययन करणे फार आवश्यक आहे, कारण सत्य परमेश्वरच, संदेष्टयांद्वारे बोलत होता. जर आपण जुन्या कराराचा अभ्यास केला तर परमेश्वरबापाची इच्छा व त्याचे मार्ग समजण्यास आपल्याला मदत होते.

[*]**1:1** *“परमेश्वर...बोलला”*- हा या पत्राचा एक मोठा विषय आहे, जुन्या करारात परमेश्वरबापाने म्हटलेल्या सर्व गोष्टींविषयी आपण वाचू शकतो. तुलना करा मत्त 4:4; 2 पेत्र 1:21; 2 तीम 3:16. पाहा 1:6-7,8,10; 2:11-13; 3:7; 4:3; 5:5-6; 6:13-14; 7:21; 8:8; 10:5,15,17; 12:25-26; 13:5.

[*]**1:2** तुलनात्मक गोष्टींची माहिती, इब्रींच्या पत्रात, प्रारंभीचे वचन 1 व 2 यात आपण पाहू शकतो.

[*]

[*] *“पुत्राद्वारे”*- योहान 7:16-17; 8:28; 12:49-50; 17:8; अनु 18:18-19यात वर्णन केले गेलेले प्रभू येशू हेच 'अंतिम व महान संदेष्टे'असे होते. 2-4 वचनात या पत्राचा लेखक, परमेश्वराचा पुत्र (येशू) यांच्याविषयी नऊ महत्वपूर्ण गोष्टींचा उल्लेख करतो.

[*] *“वारीस”*- लेखक प्रथम सांगतो, की परमेश्वराचा पुत्र कोण आहे आणि तो संदेष्टयांपेक्षा किती अधिक महान आहे. वारीस म्हणजे ते सर्व प्राप्त करणे, मिळवणे, ज्याची प्रतिज्ञा केली गेलेली आहे.

[*] *“सृष्टीची रचना केली”*- वचन 10; उत्प 1:1; योहान 1:1-3; 1 करिं 8:6; कल 1:6.सृष्टीच्या रचनेच्या पूर्वीपासूनच पुत्र होता. पृथ्वीवर जन्म झालेला असल्यामुळे तो परमेश्वराचा पुत्र झाला नाही. (योहान 17:5; कल 1:17). पुत्रयावर अधिक माहितीसाठी पाहा - मत्त 3:16-17; 11:27; योहान 3:16; 5:18-23.

**1:3** *“त्याच्या तत्वाचे प्रतिरूप”*- 2 करिं 4:4; कल 1:15शी तुलना करा. ज्या ग्रीक भाषीय शब्दाचे भाषांतर 'स्वभाव' आहे, त्याचा अर्थ आहे 'तत्व', 'सार', 'वास्तविक स्वभाव', 'परमेश्वरपिता' जोत्याच्या स्वतःच्या अनंत आत्मिक स्थितीतील अदृश्य प्रकाशात राहतो (1 तीम 6:16; योहान 1:18), तो अदृश्य आहे. येशू परमेश्वराचा स्वभाव व गुण ,संपूर्ण रीतिने प्रगट करतात (कल 2:9). परमेश्वर जो काही आहे, ते येशू स्वतःद्वारे प्रगट करतात, हे केवळ त्यांच्याविषयीच म्हटले जाऊ शकते, ज्यांचा स्वभाव परमेश्वरासारखा होता. फिलि 2:6यात दिलेले वचन पाहा.

[*] *“परमेश्वरी.......आहेत”*- याचा अर्थ अलौकिक स्वभाव 'परमेश्वरबापाचा प्रकाश - तेजस्विता' (1 योहान 1:5) असे म्हटले जाऊ शकते. 'येशू' म्हणजेच या तेजाचे चमकणे होय. तुलना करा - लूक 1:78-79; 2:29-32; योहान 1:4-5,9; 8:12; 2 करिं 4:6.सूर्याचे तेज ‘सूर्य व त्याचे तत्व’ प्रगट करते. त्याच प्रकारे येशू ख्रिस्त परमेश्वर प्रगट करतात आणि त्यांच्याजवळ परमेश्वरी स्वभाव आहे. योहान 1:14,18; 10:30; 14:9दुसरे वचन फिलि 2:6; लूक 2:11त्यांचा स्वभाव पित्यासारखा होता. केवळ तेच परमेश्वराचे गौरव, असू शकत होते. येशू ख्रिस्त प्रकाशाचा प्रकाशअसे होते.

[*] *“आपल्या शब्दाच्या बळाने किंवा सामर्थी शब्दाने”*- कल 1:17शी तुलना करा. त्याच्या वचनांद्वारे त्याने इच्छा प्रदर्शित केली होती. तो जे काही म्हणतो ते होते, त्याच्या वचनाचे आज्ञापालन केलेच जाते. या सृष्टीतील आकाशगंगा, तारामंडळ, सूर्य आणि दुसरे इतर ग्रह, येशूंच्या सामर्थी शब्दाने या प्रकारे सांभाळले जातात, नियंत्रित केले जातात की त्यांनी आपसात एकमेकांवर आदळून जाऊ नये. ज्या उद्देशाने या सर्वांची रचना केली गेलेली आहे, ते सर्व हेतू येशूंच्याद्वारेच पूर्ण केले जातात. या सर्व गोष्टींद्वारे त्या

करतात. अपराध (अर्थात चुकणे-माकणे) धुतल्यानंतर, ते सम्माननीय स्थानी अर्थात अधिकार पदावर, महामहिमनाच्या उजवीकडे
बसले*; 4 * परमेश्वराच्या दूतांहून तितकेच थोर ठरले*, जितके त्यांनी दूतांपेक्षाही सर्वोच्च पदाचा वारस होऊन सर्वोत्कृष्ट नांव* प्राप्त
केले,
5 *कारण स्वर्गदूतांपैकी परमेश्वराने कधी कोणाला म्हटले, “की तू माझा पुत्र आहेस, आज तू माझ्यापासून उत्पन्न झाला आहेस
आणि हे देखील, की मी त्याचा बाप होईन आणि तो मला पुत्रासमान होईल?” 6 आणि जर, तो सर्वश्रेष्ठ* (ज्येष्ठ-प्रथम जन्मलेला)
असलेल्यास पुन्हा जगात आणतो, तेव्हा म्हणतो “स्वर्ग त्यास नमन करोत*,” 7 *आणि स्वर्गदूतांविषयी म्हणतो, “की तो आपल्या
दूतांचे आत्में, व आपले सेवक पेटत्या अग्निज्वालेसारखे करतो”, 8 परंतु पुत्राला म्हणतो “हे परमेश्वरा, आपले राजासन युगानुयुग
टिकेल, आपल्या शासनाचा राजदंड धार्मिकतेचा राजदंड आहे; 9 आपण सरळपणावर व सच्चेपणावर प्रेम केले, आणि वाईटाचा द्वेष
केला, म्हणूनच परमेश्वराने, आपल्या परमेश्वराने आपल्यास आपल्या सोबत्यांपेक्षाही श्रेष्ठ अशा हर्षरूपी तेलाने अभिषेक केला
आहे, 10 आणि हे प्रभू*, आपण प्रारंभी पृथ्वीचा पाया घातला, आकाशही आपल्या हातांची कारागिरी आहे; 11 ती नष्ट होतील परंतु

---

गोष्टींची प्रचिती येते आणि आपण पाहू शकतो की या सर्व नियंत्रणात, जो परमेश्वरबापाचा स्वभाव आहे तोच येशूंचाही आहे. या संपूर्ण सृष्टीला सांभाळून ठेवण्यासाठी केवळ एकच समर्थ आहे आणि तो म्हणजे सर्वशक्तीमान परमेश्वर ज्याचे शब्द अतिशय शक्तीशाली आहेत.

* *“उजवीकडे बसले”*- 13; 2:9; 10:12; स्तो 110:1; मार्क 16:19; प्रेषि 2:33; प्रकटी 3:21.वधस्तंभावरच्या आपल्या बलिदानाद्वारे येशूंनी अपराधांच्या शुद्धतेचे कार्य पूर्ण केले आणि सृष्टीचा अधिकार व गौरवाच्या सर्वोच्च स्थानी ते विराजमान झाले.

***1:4** येशूंना संदेष्टयांपेक्षा सर्वोत्तम दाखवून (वचन 1,2) लेखकाने त्यांना परमेश्वरदूतांपेक्षाही महान व श्रेष्ठ दाखवले आहे उत्प 16:7यात “परमेश्वरदूतांविषयी” टीप पाहा.

* *“ठरले”*- ग्रीक भाषेत 'झाले' असाही अर्थ आहे. पृथ्वीवर एका मानवाच्या रूपात ते ‘परमेश्वरदूतांपेक्षा थोडेच कमी होते'- 2:9. आपल्या पुनरूत्थानानंतर त्यांना पुन्हा एकदा ‘परमेश्वरदूतांपेक्षा’ उच्चतम स्थान प्राप्त झाले. योहान 7:16-17; 8:28; 12:49-50; 17:8; अनु 18:18-19.

* *“सर्वोत्कृष्ट नांव”*- 'पुत्र'हेच ते सर्वोत्तम नांम, म्हणजेच तो पुत्र, जो सृष्टीचा प्रभू आहे, ज्याच्यात पित्याचा स्वभाव आहे आणि ज्याची भक्ति, आराधना केली जावी, इतका तो महान आहे (6,8,10). फिलि 2:9-11शी तुलना करा. परमेश्वरदूतांपेक्षा कमी पद घेऊन त्यांनी या जगात जन्म घेतला आणि या जगात येण्यापूर्वी जे 'परमेश्वराच्या पुत्र स्वरूपात' त्यांचे नांम होते, ते त्यांनी पुन्हा प्राप्त केले. याठिकाणी, स्वर्गदूतांद्वारे दिल्या गेलेल्या जुन्या करारापेक्षा, येशूंनी स्थापन केलेला नवा करार किती उत्तम आहे, हे दाखवलेले आहे. 2:2.

***1:5** पाहा स्तो 2:7; 2 शमु 7:14.कोणताही परमेश्वरदूत आपल्या स्वतःसाठी परमेश्वराचा पुत्र या पदाचा दावा करणारा ठरु शकत नाही. (योहान 3:16ची टीप पाहा) 2 शमु 7:14यात परमेश्वरबाप आधी दावीदाचा पुत्र शलमोन याचा उल्लेख करतो. परंतु त्याला ठाऊक होते की शलमोनाहून मोठा असा एक येणार, जो दावीदाचा पुत्र आणि परमेश्वराचा पुत्र असणार (रोम 1:3-4यश 9:6).

***1:6** *“सर्वश्रेष्ठ”*- मूळ भाषेत प्रथम, पहिला असा शब्द आलेला आहे. परमेश्वरपित्याला देखील 'प्रथम' असे म्हणण्यात काहीच आपत्ति नाहीये, कारण त्याचा अर्थच आहे, 'सृष्टीतील परमप्रधान किंवा सर्वश्रेष्ठ'. कल 1:15वरची टीप पाहा. या शब्दाचा अर्थ शाब्दिक रीतिने जन्म असा नाही (पाहा स्तो 89:27 -आपला ज्येष्ठ व पृथ्वीवरील राज्यात त्याला सर्वश्रेष्ठ करीन).

* *“नमन करोत”*- जुन्या करारात ग्रीक भाषेत (सेप्टूजिंट) यात हे शब्द अनु 32:43यात आलेले आहेत. येथे 'पवित्रात्मा'या शब्दांवर सहमत होऊन आपला शिक्का त्यावर लावतो. स्तो 97:7सुद्धा पाहा. कारण परमेश्वरदूतांना म्हटले गेले आहे, की येशूंना दंडवत किवा नमन करा, म्हणूनच हे स्पष्ट होते की येशू ख्रिस्त त्यांच्याहूनही अधिक श्रेष्ठ आहेत. हे सुद्धा एकदम स्पष्ट आहे की पिता व ख्रिस्त यांचा स्वभाव एकसारखाच आहे, एकच आहे. जर असे राहिले नसते तर परमेश्वरपित्याने परमेश्वरदूतांना अशी आज्ञा दिली नसती की त्यांनी येशूंची आराधना करावी. बायबलमध्ये भक्ति-आराधना केवळ परमेश्वरासाठीच आहे. (पाहा. मत्त 4:10)

***1:7-8** स्तो 104:4; 45:6-7 वचन पाहा. या वचनांद्वारे हे कळते की, परमेश्वरदूत ते ‘जीव’ आहेत, ज्यांना परमेश्वरबापाने रचले. परमेश्वराचा पुत्र रचला गेला नाही, पण त्यांचा आणि परमेश्वराचा स्वभाव व व्यक्तीमत्व एकसारखेच आहे, त्यात समानता आहे. वचन 8 यात पिता पुत्राशी बोलतो आणि दावीदाच्या मुखाद्वारे असे म्हणतो, “हे परमेश्वरा... राजदंड आहे”- जे लोक येशूंचा परमेश्वर म्हणून स्वीकार करीत नाहीत; ते असेच दुसऱ्या प्रकारे म्हणण्याचा प्रयत्न करतात. जो राजासनावर विराजमान आहे, तो राजासनापेक्षा श्रेष्ठ आहे. येशू ख्रिस्तांच्या परमेश्वर तत्वाविषयी पाहा फिलि 2:6.

**1:9** *“आपल्या परमेश्वरने”*- परमेश्वर पिता - इफि 1:3.

***1:10-12** *“आणि हे प्रभू”*- स्तो 102:25-27पाहा. परमेश्वराने संदेष्टयांद्वारे कसे संभाषण केले, त्याचे हे एक उदाहरण आहे, आणि ते

आपण सदैव कायम असाल, ती सर्व वस्त्रांसारखी जीर्ण-जुनी होतील, [12] आपल्याद्वारे ती चादरासारखी गुंडाळली जातील आणि
बदलली जातील, परंतु आपण तेच राहणार व निरंतर सर्वकाळही तसेच असणार; [13] *व स्वर्गदूतांपैकी त्याने कधी कोणाला असे
म्हटले, की जोपर्यंत मी तुझे वैरी, तुझ्या पायांखालील पदासन करीत नाही, तोपर्यंत तू संपूर्ण अधिकारांसह उत्तराधिकारी म्हणून
विराजमान रहा.”
[14] *स्वर्गदूत सांभाळणारे आत्में नाहीयेत काय, जे तारण प्राप्त लोकांची मदत करावी म्हणून पाठविले जातात?

# 2

[1] म्हणून ज्या कारणामुळे आम्ही या गोष्टी ऐकल्या आहेत* त्यावर अधिक मन लावा, अन्यथा ऐकलेल्या गोष्टींपासून बहकून,
आपण दूर जाता कामा नये. [2] कारण ज्या गोष्टी स्वर्गदूतांद्वारे* सांगितल्या गेल्या त्या स्थिर राहिल्या*, व जर प्रत्येक गुन्ह्याचे आणि
आज्ञाभंगाचे यथायोग्य फळ मिळाले; [3] तर आपण एवढ्या मोठ्या तारणापासून* निश्चिंत राहून कसे काय वाचूं शकू, ज्याची चर्चा

---

परमेश्वराचा पुत्र ख्रिस्त याला 'प्रभू' असे म्हणतात (वचन 8) आणि वचन 10 दर्शविते की कशा प्रकारे ख्रिस्तांद्वारे स्वर्ग, आकाश आणि पृथ्वी यांची रचना केली गेली. (उत्प 1:1) ख्रिस्त व परमेश्वर यांचा स्वभाव एकच आहे, त्याचे हे आणखी एक प्रमाण आहे कारण फक्त परमेश्वरच सृष्टीकर्ता आहे. (उत्प 1:1) वचन 11,12 यात परमेश्वर म्हणतो, की पुत्र कधी न बदलणारा व अनंत असा आहे. हे गुण केवळ परमेश्वरबापातच आहेत. केवळ परमेश्वरच कापडासारखे गुंडाळू शकतो (वचन 12) आणि ख्रिस्त ते कार्य करतील. स्तो 102:1ही यहोवा परमेश्वराशी केलेली एक प्रार्थना आहे, पण लेखक येथे म्हणतो की ही ख्रिस्तांशी केलेली प्रार्थना आहे. दुसऱ्या शब्दांत, यहोवा ख्रिस्त रुपांत आला. लूक 2:11यात वेगळी वचनें पाहा.

***1:13** स्तो 110:1या सृष्टीत केवळ ख्रिस्ताला परमेश्वरबापाने सर्वश्रेष्ठ स्थान दिलेले आहे.

***1:14** ख्रिस्त मानवजातीचे स्वामी/प्रभू आहेत (वचन 10; रोम 14:9; फिलि 2:9-11) परंतु परमेश्वरदूत सेवक आहेत, जे अशा लोकांच्या सेवेसाठी पाठवले गेले आहेत, जे तारणाचे वारीसदार होतील, जे ख्रिस्तांचे विश्वासीं आहेत. येथे 'मुक्ति' म्हणजे त्यांच्या तारणाचे अंतिम चरण/टप्पा रोम 8:23,29,30; 1 पेत्र 1:5.येथे आपल्याला याविषयी सांगितले गेले नाही की परमेश्वरदूत आपल्यासाठी कोणती सेवा करतात. उत्प 16:7 -परमेश्वरदूतांवरील टीप पाहा. या वचनांबरोबर लेखक आपला मुख्य मुद्दा पूर्ण करतो. परमेश्वर आपल्या पुत्राद्वारे बोलला आहे, तो पुत्र ज्याचा परमेश्वरी स्वभाव आहे आणि जो सर्व मानवांहून, तसेच संपूर्ण परमेश्वरदूतांहूनही श्रेष्ठ आहे. या गोष्टीमुळे आपली खात्री होते, आपण निश्चिंत होतो, आश्वस्त होतो की परमेश्वरबापाचे प्रकाशन त्याच्या पुत्राद्वारे त्याने दिलेले अंतिम प्रकाशन आहे. आपल्या पुत्राला पाठवल्यानंतर त्याच्याद्वारे लोकांशी बोलल्यानंतर परमेश्वर, का बरे एखाद्या जुन्या पद्धतीचा अवलंब करून मानवजातीतून कोणालाही संदेष्टा म्हणून निवडेल आणि त्याच्याद्वारे बोलेल?

***2:1** *“आम्ही .... आहेत”*- प्रभू येशूंचे आनंदवर्तमान. “बहकून”- परमेश्वराने आम्हाला जे सत्य दिलेले आहे, त्यापासून दूर जाणे ही साधी, सोपी, सहज गोष्ट आहे म्हणून त्याच्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. जगात अशा पुष्कळशा गोष्टी आहेत ज्या मनुष्याला परमेश्वरापासून दूर नेतात.

***2:2** *“स्वर्गदूतांद्वारे”*- असे समजले जाते की मोशेद्वारे नेमून दिली गेलेली व्यवस्था, परमेश्वरदूतांच्या मदतीने पोहचवली गेली होती. पाहा गल 3:19आणि प्रेषि 7:53.

* *“स्थिर राहिल्या”*- स्वर्गदूतांद्वारे दिल्या गेलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक होते. (निर्ग 19:5; लेवी 18:1-5; अनु 6:1-3; 32:45-47आणि त्याचे पालन न केल्यास दंड - लेवी 26:14-39; अनु 28:15-68; 2 राजे 17:7-20 )

***2:3** *“तारणापासून”*- जी मुक्ति परमेश्वराने येशूंच्याद्वारे दिलेली आहे (रोम 1:16). लेखक म्हणतो की स्वर्गदूतांद्वारे दिले गेलेले नियम व आज्ञा, यांहून येशूंनी दिलेले तारण श्रेष्ठ आहे; पुत्राद्वारे दिलेले परमेश्वराचे प्रकाशन, ज्या लोकांनी परमेश्वराच्या नियमांकडे दुर्लक्ष केले, उपेक्षा केली, ते वाचू शकले नाहीत. त्याचप्रमाणे येशूंच्या वर्तमानाची उपेक्षा करणारे, नाकारणारे लोकही वाचू शकणार नाहीत, त्यांचा बचाव होऊच शकत नाही. आनंदाची बातमी, ही जणू परमेश्वरबापाचे प्रेम आणि कृपा यांचा खुलासाच आहे; त्यामुळे, मानवाला तारण प्राप्त होते. परंतु याचा अर्थ असा नव्हे की जे आनंदवर्तमान ऐकतात, पण ती गंभीर किंवा महत्वाची गोष्ट न जाणता, एक हलकी, साधी गोष्ट समजतात ते दंडाचे भागीदार नसणार. याउलट त्या प्रकारच्या लोकांना जास्त दंड मिळेल; ही शिक्षा भयानक आणि अतिशय निश्चित असेल, कारण ज्या वर्तमानाची ते उपेक्षा करीत आहेत, कमी महत्वाचे जाणून, दुर्लक्ष करीत आहेत ते मागील किंवा पूर्वीच्या कोणत्याही खुलास्यापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे. आनंदवर्तमानाला 'असे मोठे तारण' म्हटले गेले आहे. येशूंचे आनंदवर्तमान खालील गोष्टींत श्रेष्ठ आहे- त्याचे लेखक : स्वतः परमेश्वर त्याची निश्चितता : अनेक अचूक प्रमाण (प्रेषि 1:3). त्याचा वेगळेपणा : केवळ एक आणि एकच सत्य व आनंदाचेवर्तमान. योहान 14:6; प्रेषि 4:12; त्याची तारण देण्याची योग्यता : 7:25; रोम

सर्वप्रथम येशूंद्वारे* झाली आणि ऐकणाऱ्यांनी त्या गोष्टीची पुष्टि सुद्धा केली व प्रमाण देखील प्रस्तुत केले? 4 यासोबतच परमेश्वराने*
आपल्या इच्छेनुसार, चिन्हें, अद्‌भुतें व पवित्र आत्म्याची दानें* दिली आणि त्याविषयीची साक्षही तो देत राहिला आहे.
5 परमेश्वराने भविष्यात येणाऱ्या जगाविषय ी ज्याची चर्चा आम्ही करीत आहोत, ते स्वर्गदूतांच्या आधीन केले नाही; 6 *परंतु
कोठेतरी एके ठिकाणी अशी साक्ष दिलेली आहे, ‘की मनुष्य आहे तरी कोण की तू त्याची चिंता करावी, किंवा मानव आहे तरी
काय, की ज्याच्यावर तुझी दृष्टि जावी (करावी)?’ 7 तू अल्पकाळासाठीच येशंना स्वर्गदूतांपेक्षा थोडकेच कमी केले, त्यांच्या
डोक्यावर गौरवाचा व आदराचा ताज ठेवला, आणि आपल्या हातांच्या कार्यांवर त्यांना अधिकार दिला आहेस; 8 तू सर्व काही
त्यांच्या पायाखाली केलेस, म्हणून ज्याअर्थी त्यांच्या ताब्यात सर्व काही आहे त्याअर्थी त्यांच्या नियंत्रणात नाही असे काहीही राहू
दिले नाही, तरीपण आमच्या दृष्टीने आजतायागत आतापर्यंतही* सर्व काही त्यांच्या आधीन असे आम्ही पाहात नाही. 9 *परंतु आम्ही
येशूंना, जे स्वर्गदूतांहून थोडेच कमी केलेले व मृत्यूचे दुःख सहन केल्यामुळे महिमेचा व सन्मानाचा मुकूट घातलेले असे पाहातो, की
त्यांनी परमेश्वरी कृपेने मरणाच्या अनुभवातून जाऊन प्रत्येक मनुष्यासाठी कशा प्रकारे मरण चाखावे*.
10 ज्या परमेश्वरासाठी येशू सगळे काही आहे, ज्याद्वारे सर्व काही आहे, त्यास उचित वाटले की त्या येशूंनी सुद्धा दुःख सहनाद्वारे*
क्रूसाच्या मरणापर्यंत जाऊन सिद्ध-परिपूर्ण* व्हावे, जेणेकरून त्या बहुत पुत्रांना* महिमेत पोचवावे. 11 *कारण पवित्र करणारे* येशू व

---

1:16. त्याच्या न्यायाचे संतुष्टीकरण : रोम 3:25-26 त्याचे स्थायी परिणाम : 9:12; 10:10,14; रोम 5:9-10 या गोष्टींकडे लक्ष द्या - परमेश्वराच्या न्यायपूर्ण दंडाचा सामना करण्यासाठी हे आवश्यक नाही की मनुष्याने सक्रिय रूपाने आनंदवर्तमानाकडे दुर्लक्ष करावे किंवा नकार द्यावा. त्याला कमी महत्वाचे लेखणे, हलकी गोष्ट समजणे म्हणजेच त्याचा अस्वीकार करणे होय.

* *“ज्याची चर्चा येशूंद्वारे”*- आनंदवर्तमानाची पहिली चर्चा प्रभू येशू ख्रिस्तांद्वारे केली गेली (मार्क 1:14-15; लूक 4:18-21)

* **2:4** *“परमेश्वराने”*- पित्याने आश्चर्यकारक कार्यांद्वारे आपल्या पुत्राच्या आनंदवर्तमानाची पुष्टि केली. मत्त 28:6; रोम 1:4; मार्क 16:20; प्रेषि 2:43; 5:12-16.

* *“दानें”*- पवित्र आत्म्याची वरदानें, बक्षिस ही सर्व येशूंच्या वर्तमानाविषयी परमेश्वरबापाची साक्षच होती. (1 करिं 12:7-11) काही लोक असे प्रश्न मांडतात की जर ख्रिस्त परमेश्वरदूतांपेक्षा उत्तम आहेत तर मनुष्य रूपात, ते परमेश्वरदूतांपेक्षा कमी कसे होते? जे परमेश्वरदूतांहून श्रेष्ठ होते, त्यांनी परीक्षा, दुःख आणि मरणाचा सामना मग का केला? अनेक यहूदी लोकांसाठी, ही अशक्य बाब होती (1 करिं 1:23) याच कारणांनी ते येशूंचा ‘परमेश्वर-मनुष्याच्या रूपात” स्वीकार करावयाला तयार नव्हते- योहान 5:17-18; 10:31-33. लेखक या वचनात दोन गोष्टी सांगतो, एक काही अल्प-थोड्या काळासाठीच, ख्रिस्त परमेश्वरदूतांपेक्षा कमी केले गेले होते (वचन 9) आणि हे अगदी योग्यच होते की, 'लोकांच्या अपराधांची क्षमा करणारे' असे ठरण्यासाठी त्यांना परमेश्वरदूतांपेक्षा कमी करून, एक मनुष्य केले जावे. (वचन 10,14,17).

**2:5** *“भविष्यात...जगाविषयी”*- मत्त 25:31,34; प्रेषि 3:21; रोम 8:18-23; यश 11; प्रकटी 20-22 अध्याय.

* **2:6-8** स्तो 8:4-6याकडे संकेत करून लेखक दाखवतो की येणाऱ्या भावी काळात, परमेश्वरपिता, परमेश्वरदूतांना नव्हे तर मनुष्यांना ‘शासक’ असे करील. पाहा मत्त 19:28; 24:46-47; 25:21; लूक 19:17; 2 तीम 2:12; प्रकटी 5:10; 20:6; 22:5.

* **2:8** *“आजतायागत आतापर्यंतही”*- वचन 8 - हे पूर्ण झालेले नाही. जे उच्च पद, परमेश्वरबाप मनुष्याला देणार होते, ते आतापर्यंतही त्याचे झालेले नाही.

* **2:9** येणाऱ्या भावी जगावर मनुष्याचा अधिकार, प्रभूत्व होणे केवळ येशूंद्वारेच शक्य आहे. ते 'अंतिम आदाम' (1 करिं 15:45-47) मानवजातीचे प्रतिनिधि आहे. सुटका झालेल्या त्या सर्व लोकांचे ते पुढारी आहेत व प्रधान आहेत, जे भविष्यातील जगावर शासक म्हणून शासन करतील( राज्य करतील). मनुष्याला परमेश्वरदूतांवरचे पद देण्याची त्याची इच्छा होती, म्हणूनच जरी त्याने परमेश्वरदूतांना निर्माण केले असले तरीही येशूंना परमेश्वर दूतांपेक्षा कमी केले गेले, म्हणजेच ते मानव केले गेले (योहान 1:14; फिलि 2:5-8). मानव होण्यामागे त्यांचा हेतू होता, लोकांसाठी मरण सोसणे.

* *“मरण चाखावे”*- म्हणजेच मरण पावणे. परमेश्वराचा हेतू हाच होता की मानवाने भविष्यकाळातील जगावर शासन करावे, पण त्या हेतूच्या पूर्ततेत एक बाधा होती, अडथळा होता. सर्वांनीच अपराध केलेले होते, आणि आपल्या अपराधांच्या शिक्षेच्या रूपात, ते सर्व 'मृत्यूच्या आधीन' होते (उत्प 2:17; रोम 5:12; 6:23). प्रभू येशू ‘प्रत्येक व्यक्तीसाठी’ मरण सोसायला आले. 2 करिं 5:14-15; 1 तीम 2:6; 1 योहान 2:2;

* **2:10** *“सहनाद्वारे”*- याचा अर्थ हा नव्हे की दुःखापूर्वी येशूंचा स्वभाव, महिमामय नव्हता. येशू ख्रिस्त आपल्या चारित्र्यांत आणि कार्यांत निरअपराधी आणि सिद्ध असेच होते. येथे त्याचा अर्थ असा आहे की, 'बहुत पुत्रांचे उद्धारक' यारूपात कार्य करण्यासाठी परमेश्वराने त्यांना दुःखाद्वारे पूर्ण रीतिने योग्य असे तयार केले व हे उचित जाणले. 5:7-9; 7:28.

* *“सिद्ध-परिपूर्ण”*- प्रभू येशू 12:2परमेश्वराने जी महिमा लोकांसाठी तयार केली ती महिमा, ते गौरव प्राप्त करण्यासाठी त्यांनी एक

पवित्र होणारे विश्वासीं, सगळे जण एका स्त्रोतापासूनच आहेत, म्हणूनच विश्वासींना बंधूभगिनी म्हणताना येशूना संकोच होत नाही, लाज वाटत नाही. [12] *येशू म्हणूनच निःसंकोच म्हणतात, “मी तुझे नाम आपल्या भाऊबहिणींमध्ये घोषित करीन, सभेमध्ये मी भजन गाईन; [13] येशू पुढे म्हणतात, मी त्याच्यावर भरवंसा टाकीन व नंतर, पहा पहा, ही मुलें! पहा, ती परमेश्वरानेच मला दिली आहेत.”

[14] यास्तव ज्या अर्थी, मुलें* मांस व रक्ताचे भागीदार झाली आहेत, त्याअर्थी ते स्वतःही त्यांत सहभागी झाले, अशासाठी की आपल्या मरणाद्वारे त्यांनी सैतान ज्याला मरणावरचा हक्क* मिळाला होता, त्याला कमजोर - अपयशी व कुचकामी करावे. [15] इतकेच नव्हे, तर मरणाच्या भयाने जीवनभर गुलामीच्या जोखडांत फसलेल्यांची सुटकाही त्यांनी आपल्या मरणाद्वारे करावी*.

[16] *कारण येशू स्वर्गदूतांचा नव्हे, परंतु अब्राहामाच्या वंशाचा* सांभाळ करतात.

[17] यास्तव सर्व बाबतींत आपल्या बंधूप्रमाणेच* असणे येशूंसाठी गरजेचे होते, जेणेकरून परमेश्वर संबंधीच्या गोष्टींविषयी, येशूंना

---

मार्ग देखील तयार केला.

* *“बहुत पुत्रांना”*- जे काही परमेश्वरबापाने केले आणि लोकांमध्ये करीत होता, त्याचा हेतूच हा आहे. योहान 17:22,24; रोम 5:2; 8:18,28-30; 9:23; 2 करिं 4:17; इफि 1:18यांशी तुलना करा.

***2:11-18** ज्या लोकांना परमेश्वरपिता गौरव देणार आहे त्या सर्वांसाठी प्रभू येशूंनी स्वतःला, त्यांच्यासारखेच केले (मानव).

***2:11** *“पवित्र करणारे”*- हे ख्रिस्तच आहेत. पाहा इब्री 10:10,14; 13:12; लेवी 20:6 आणि योहान 17:17-19होय. जे पवित्र केले जातात ते असे लोक आहेत, जे येशू ख्रिस्तांवर विश्वास करतात, आणि त्यांना अपराधांपासून मुक्त करणाऱ्याच्या आणि गौरवाकडे नेणाऱ्याच्या रूपात त्यांचा स्वीकार करतात. परमेश्वरबापाने अशा सर्वांना उरलेल्या मानवजातीपासून वेगळे केले आहे आणि स्वतःसाठी ते पवित्र केले आहेत.

***2:12-13** प्रभू येशू व त्यांचे विश्वासीं एकसारखाच, एकसमानच मानवी स्वभाव बाळगतात, आणि परमेश्वराशी त्यांचे नातेही एकसारखेच आहे, प्रमाणाच्या रूपात लेखक स्तो 22:22; यश 8:17-18या वचनाकडे इशारा करतो.

***2:14-15** *“मुलें”*- परमेश्वराची मुले. वचन 10 यांत 'पुष्कळ मुलें' म्हणजे मानवजातीकडे केलेला संकेत होय. ख्रिस्त माणसांसारखेच मांस व रक्त (शरीर) यात प्रगट झाले. मत्त 1:20-21; लूक 2:5-7; 24:49; योहान 1:14; 6:53-58;असे करण्यामागे तीन उद्देश होते: मरणे (मत्त 16:21; 20:28; योहान 10:17-18), मरणाद्वारे सैतानाचा नाश करणे आणि आपल्या लोकांना मुक्त करणे. मत्त 4:1-10यात सैतानावर दिलेली व्याख्या पाहा.

* *“मरणावरचा हक्क”*- आदम व हवा यांना अपराधांत पाडून सैतानाने या जगात मरण आणले - उत्पत्ति 3. मनुष्याला गुलाम करून तो अपराध आणि मरण यांच्या क्षेत्रात राज्य करतो आणि मनुष्याला आत्मिक मृत्यूच्या अवस्थेत ठेवतो - 2 तीम 2:26.असे प्रतित होते की त्याला मारून टाकण्याचा सुद्धा अधिकार आहे- ईयोब 2:6; 1 करिं 5:5.आपल्या मरणाद्वारे आणि पुनरूत्थनाद्वारे ख्रिस्तांनी सैतानाचा पराभव केला आणि परिणामी हे शक्य झाले, की मानवाला अपराधांची क्षमा मिळाली, आत्मिक जीवन प्राप्त झाले, आणि योहान 5:24; 11:25-26; 1 करिं 15:54,57; 2 तीम 1:10याचा अर्थ सैतानाचे राजासन हालवणे आणि त्याचा व त्याच्या राज्याचा सर्वनाश करणे. योहान 12:31; प्रकटी 20:10,14,15.

***2:15** *“सुटकाही...करावी”*- ग्रीक भाषेतील क्रिया, वर्तमानकाळ दर्शवते. जे लोक अजूनही आपल्या अपराधांत आहेत आणि ख्रिस्ताचा स्वीकर करीत नाहीत, त्यांच्यावर परमेश्वरास सार्वकालिक मृत्यूचा हक्क/अधिकार आता देखील आहे. परंतु ख्रिस्तांच्या विश्वासीं लोकांवर नाही (1 करिं 5:5चे उदाहरण सोडून). ख्रिस्तांनी आपल्याला सैतानाच्या सामर्थ्यांपासून आणि अंधाराच्या साम्राज्यातून सोडवले आणि आपल्याला परमेश्वराच्या राज्यात आणले. प्रेषि 26:18; कल 1:13). लक्ष द्या की, “मरणाच्या भयाने” सैतान मनुष्याला आपल्या बंधनात व गुलामीत ठेवतो. मृत्यूच्या भीतिपेक्षा अधिक या गोष्टीची भिती आहे की मरणानंतर काय होईल? यामुळे लोक खोट्या मतांच्या झपाट्यात येतात. ख्रिस्त येशू आपल्या विश्वासींना मरणाच्या भयापासून आणि इतर दुसऱ्या भयापासून मुक्त करतात, सोडवतात. योहान 8:32,36; रोम 6:18; 8:2,15,21; 2 करिं 5:6-8; फिलि 1:21-23.

***2:16** या वचनाचे भाषांतर कठीण आहे. याचा अर्थ असा आहे की मानवरूप धारण केल्यामुळे ते स्वर्गदूतांना नव्हे तर लोकांना सांभाळण्यास समर्थ व योग्य आहेत, किंवा तो अधिकार त्यांना प्राप्त आहे.

* *“अब्राहामाच्या वंशाचा”*- मानवाची मदत करण्यासाठी ख्रिस्त स्वर्गदूत न होता, मानव झाले. अब्राहामाचा वंश म्हणजे, ते यहूदी ज्यांनी ख्रिस्तांवर विश्वास केला आणि त्यांची आत्मिक मुलें जी त्यांच्याचप्रमाणे परमेश्वरबापावर विश्वास करतात. रोम 4:11-12,16,17; गल 3:7-9;

***2:17** *“सर्व .......बंधूप्रमाणेच”*- याचा अर्थ असा नव्हे की येशू अपराधी होते किंवा लोकांप्रमाणे अपराधी स्वभावाचे होते. पाहा 4:15; 7:26; लूक 1:35; योहान 8:46; 2 करिं 5:21; 1 पेत्र 2:22.याचा अर्थ असा देखील नव्हे की ते एक मानव होते, परमेश्वर नव्हते. - 1:6,8. तात्पर्य हेच आहे की, त्यांच्याजवळ वास्तविक मांस, रक्त आणि मानवी स्वभाव होता (वचन 14) आणि त्यांना

एक दयाळू व विश्वसनीय महापुरोहित* होता यावे, अशासाठी की लोकांच्या प्रायश्चितासाठीचे* मरण त्यांनी सोसावे, 18 *म्हणूनच ज्या लोकांची पारख होत असते, त्या सर्वांचे साहाय्य येशू सहज करू शकतात, कारण त्यांनीही त्यांची पारख होत असताना दुःख सहन केले.

## 3

1 *म्हणून हे पवित्र बंधूभगिनींनो तुम्ही जे वरचें ,अर्थात स्वर्गीक पाचारणाचे* भागीदार आहा, प्रेषित* व महापुरोहित येशूंवर ज्यांच्यावर तुम्ही विश्वास करता व ज्यांचा अंगिकारही केला आहे, नीट लक्ष द्या. 2 *मोशे जसा संबंध घराण्यांत* होता, येशूही तसेच आपल्या नेमलेल्यासाठी भरंवशायोग्य होते. 3 *ज्याप्रमाणे घर बांधणारा, घरातील लोकांपेक्षा अधिक सन्माननीय मानला जातो, त्याप्रमाणेच येशू मोशेपेक्षाही सर्वोच्च महिमेयोग्य गणले गेले. 4 प्रत्येक घराचा कोणीतरी बांधणारा असतो, परंतु ज्याने सर्व काही रचले तो तर परमेश्वरच आहे. 5 *मोशे संबंध घराण्यात सेवक म्हणून विश्वासयोग्य राहिला होता, जेणेकरून ज्या गोष्टींचे वर्णन नंतर पुढे होणार होते त्याविषयीची साक्ष त्याने द्यावी. 6 परंतु पुत्राप्रमाणे, ख्रिस्त परमेश्वराच्या घराचे अधिकारी आहेत. जर* आपण धैर्य व

---

वास्तविक दुःखाचा व परीक्षांचा सामना करावा लागला. (वचन 18) याचे दोन हेतू होते: प्रायश्चित करणे आणि लोकांसाठी महापुरोहित होणे. प्रायश्चित संबंधी वचन - निर्ग 29:33; 25:17; रोम 3:25-26पाहा.

* *“महापुरोहित”*- येथे लेखक, या पुस्तकात, एका महत्वपूर्ण विषयाचा परिचय करून देतो (3:1; 4:14; 5:10; 6:20; 7:26; 8:1; 9:11; 10:21). बायबलमध्ये, एक याजक तो होता जो लोकांसाठी बलि स्वीकारीत असे, अर्पण करीत असे, परमेश्वराच्या भवनातील कार्यांची देखरेख करीत असे आणि परमेश्वरबापासमोर लोकांचे प्रतिनिधित्व करीत असे (निर्ग 28:1ची टीप पाहा). सर्व याजकांच्यावर, महायाजक असे आणि केवळ तोच काही विशेष कार्य करीत असे - 5:1-3; 9:7; लेवी अध्याय 16 पाहा. परमेश्वराने जुन्या करारातील याजकपण समाप्त केलेले आहे. इतर कोणत्याही धर्मातील याजकपणाची स्थापना परमेश्वराने प्रतिस्थापित केलेली नव्हती. स्वर्गात ख्रिस्त येशूंच महायाजक आहेत आणि पृथ्वीवर, त्यांचे विश्वासी लोकच अशा प्रकारचे याजक आहेत जे त्याला ग्रहणयोग्य आहेत. 1 पेत्र 2:5,8; प्रकटी 1:6.

* *“लोकांच्या प्रायश्चितासाठीचे”*- बहुतेक बायबल ज्ञानी या मताचे आहेत की 'प्रायश्चित' शब्दासाठी, ग्रीक भाषेतील प्रयुक्त शब्द 'ख्रिस्तांद्वारे परमेश्वराचा क्रोध दूर करून त्याला प्रसन्न करणे'- असा प्रगट करते - रोम 3:25आणि 1 योहान 2:2यात पाहा.

* **2:18** पाहा 4:15; मत्त 4:1-10.येशूंनी परीक्षांचा सामना केला, त्यांस तोंड दिले. सैतानाने त्यांना परीक्षेत घालण्याचा, त्यांच्यावर परीक्षा/मोह आणण्याचा प्रयत्न केला, यासाठी की येशूंनी केवळ आपल्याविषयीच(आपल्या पुरता) विचार करावा, क्रूस किंवा वधस्तंभापासून स्वतःला वाचवावे आणि परमेश्वराच्या आज्ञेचे उल्लंघन करावे, आज्ञा मोडावी. येशू ख्रिस्त या सर्व प्रकारच्या गोष्टींच्या अनुभवातून गेल्यामुळे, ते स्वअनुभवामुळे सैतानाचे मार्ग ओळखतात, जाणतात. म्हणून त्या सर्व लोकांप्रत त्यांना सहानुभूति आहे, जे या प्रकारच्या गोष्टींचा सामना करीत आहेत. मत्त 6:13; 1 करिं 10:13ची टीप पाहा.

* **3:1-6** येशू ख्रिस्त मोशेहून श्रेष्ठ आहेत. मोशे परमेश्वराच्या घरात सेवक होता परंतु येशू जे परमेश्वराचे पुत्र आहेत ते घरातील प्रत्येक वस्तूंवरचे अधिकारी आहेत.

* **3:1** *“स्वर्गीक पाचारणाचे”*- विश्वासींचे पाचारण स्वर्गाकडूनचेच आहे आणि ते पाचारण त्यांना स्वर्गाकडे घेऊन जाते. (रोम 8:30).

* *“प्रेषित”*- बायबलमध्ये केवळ हेच एक स्थान आहे, जेथे ख्रिस्तांना प्रेषित म्हटले गेलेले आहे, याचा अर्थ आहे परमेश्वरबापाने त्यांना आपले कार्य करण्यासाठी या जगात पाठवले आणि त्यांच्याद्वारे तो बोलला (1:2; योहान 6:48-49)

* **3:2** "भरंवशायोग्य" - गण 12:6; योहान 8:28-29; 17:4 .

* *“घराण्यांत”*- परमेश्वराचे लोक

* **3:3-4** मोशे परमेश्वरपित्याच्या घराचा एक भाग होता, परंतु येशूंनीच त्याची सृष्टि/रचना केली म्हणून ही गोष्ट स्पष्ट आहे की येशू मोशेपेक्षा श्रेष्ठ आहेत.

* **3:5-6** घरात सेवकाच्या पदापेक्षा, पुत्राचे पद श्रेष्ठ आहे. "ज्या ...होते” त्याविषयी मोशे बोलला. म्हणजेच परमेश्वरबापाने आणखी एका सत्याचा उलगडा करण्याकडे संकेत केला (तुलना 10:1) मोशे याने ख्रिस्तांविषयी अशी साक्ष दिली. लूक 24:27; योहान 5:46.

* **3:6** *“जर”*- वचन 14; कल 1:23; 1 करिं 15:2पाहा. या वचनावरून आपण विश्वास सोडून दिल्यावर विश्वासीं सदस्य आपली सदस्यता गमावतात असे आपण मुळीच शिकत नाही.याचाच अर्थ असा आहे की विश्वासांत दृढ व स्थिर राहणे हे सदस्यतेचे

आपल्या आशेच्या आनंदाठायी शेवटपर्यंत स्थिर राहिलो तर आपण त्याचे घर आहोत*. 7 *या कारणास्तव जसा पवित्रात्मा म्हणतो*, 8 "जर आज* तुम्ही त्याचा शब्द ऐकला असेल तर, जंगलात क्रोध दाखवताना* व परीक्षेच्या दिवसांत जसे इस्राएलाने आपले मन कठोर केले होते, तसे तुम्ही आपले मन कठीण करू नका; 9 तुमच्या पूर्वजांनी तेथे मला पारखले, परीक्षा केली व चाळीस वर्षे* माझी कृत्यें पाहिली, 10 म्हणून त्या काळांतील लोकांवर मी प्रचंड संतापलो होतो व म्हटले, "यांची मनें सर्वदा भटकत* असतात, यांनी माझे मार्ग ओळखले नाहीत, 11 आणि रागाने* शपथ वाहून मी म्हणालो की ते माझ्या विसाव्यात* प्रवेश करू शकणार नाहीत."

12 *हे बंधूभगिनींनो, सावध असा*. जिवंत परमेश्वरापासून दूर जाणारे, त्याला सोडणारे, वाईट व अविश्वासाने भरलेले मन तुमच्याठायी नसावे. 13 *परंतु जोवर यास आजचा दिवस म्हटले जाते, तोवर प्रत्येक दिवशी तुम्ही आपसांत एकमेकांची हिंमत व उत्साह वाढवीत रहा, ते अशासाठी की तुमच्यापैकी कोणीही अपराधांच्या छळणुकीद्वारे कठीण मनाचा होता कामा नये. 14 *कारण

---

वास्तविक प्रमाण आहे. वचन 14 पाहा. तो व्यक्ती जो धैर्य व आशा गमावतो, तो येशूंच्या वर्तमानाच्या वार्तेस नकार देतो आणि अपराधमय जीवनात पुन्हा परत जातो, असा व्यक्ती कधी मुक्तीवार्तेचा भागीदार झाला होता असे गृहित धरणे किंवा मान्य करणे, व्यर्थ आहे. (10:39; योहान 10:27; 1 योहान 2:19) दुःखाची बाब हीच आहे की अनेक लोक दावा करतात, की ते परमेश्वराचे घर आहेत, पण वास्तविकता हीच आहे की ते तसे नाहीत.

* *"आपण त्याचे घर आहोत"*- मोशे द्वारे इस्त्राएलाची सेवा केली गेली. ख्रिस्तांचे घर म्हणजे त्यांच्यावर विश्वास करणारे सर्व सदस्य आहेत आणि येशू त्यांचे अधिकारी आहेत.

***3:7-19** हे वचन विश्वास - त्यागाविषयीची दुसरी ताकीद आहे. वचन 7-11; स्तो 95:7-11यांतून घेतले गेले आहे या वचनाची टीप पाहा. ही वचनें सांगतात की संपूर्ण पिढी परमेश्वराचे घराणे म्हटली जाऊ शकते, तरीपण अविश्वासासाठी दोषी ठरविले जाऊन, त्या आशीर्वादापासून ती पिढी वंचित राहू शकते, जे देण्याचे वचन परमेश्वराने विश्वासीला दिलेले आहे (वचन 19) जर हे एकदा झालेले आहे तर, ते अनेक वेळा होऊ शकते.

***3:7** "पवित्रात्मा म्हणतो"- जरी स्तोत्र 95, एका व्यक्तीद्वारे लिहिले गेले तरीपण त्याला परमेश्वरपित्याच्या आत्म्याने प्रेरित केले आणि त्याच्याद्वारे आपल्याशी तो बोलला. तुलना करा 9:8; 1 तीम 3:16; 2 पेत्र 1:21.

***3:8** *"आज"*- हा शब्द एक नवा प्रारंभ, संधी देणाऱ्या एका नव्या दिवसाकडे इशारा करतो. याचा अर्थ ख्रिस्तांच्या आनंद वर्तमानाचे एक नवे युग - 2 करिं 6:12शी तुलना करा.

* *"क्रोध दाखवताना"*- निर्ग 17:1-7; स्तो 95:8.

***3:9** *"चाळीस वर्षे"*- गण 14:26-35.

***3:10** *"यांची...भटकत"*- बाहेरून (बाह्य रीतिने) ते परमेश्वराचे लोक म्हटले जातात पण आंतून (आंतरिक रीतिने) ते कठोर, अविश्वासीं आणि बंडखोर आहेत. तुलना करा स्तो 58:3; 1:2-3; 53:6.

***3:11** *"रागाने"*- गण 25:3यात परमेश्वराच्या क्रोधा- संबंधीत टीप पाहा.

* *"माझ्या विसाव्यात"*- वाळवंटाची यात्रा आणि कनानच्या शत्रूंपासून विश्राम (अनु 1:34-36; 12:9; यहो 23:1).

***3:12-19** स्तो 95:7-11लेखक यांतील शब्द, आपल्या काळातील यहूदी लोकांच्या स्थितीवर लागू करतो. आपणही आज आपल्या समाजातील चर्चमध्ये ही स्थिती लागू करु शकतो. जे लोक परमेश्वराचे लोक म्हटले जातात, ओळखले जातात, त्यांच्या विश्वासासंबंधी ही ताकीद आहे.

***3:12** *"सावध असा"*- 12:25. अविश्वासाची भयंकर शक्यता आहे; याविषयी अतिशय जागृत रहा. अविश्वासी मन - आपण ते पाहू शकत नाही परंतु त्याची बाह्य-प्रमाणें आहेत, ती म्हणजे परमेश्वरबापापासून दूर जाणे, मागे फिरणे. जेव्हा लोक परमेश्वरबापाला सोडतात तेव्हा, बुद्धि, तर्क, शिक्षण यामुळे तसे होत नाही, मनाची स्थिती हे निर्धारित करते की मनुष्य काय करतो. तुलना करा नीति 4:23.

***3:13** ख्रिस्ती विश्वासींनी निरंतर दुसऱ्या विश्वासीं बंधूभगिनींना परमेश्वरबापावर खरी निष्ठा, खरा विश्वास, करण्यासाठी त्या विश्वासांत कायम स्थिर राहण्यासाठी आणि अपराधांपासून दूर राहण्यासाठी, त्यांना सतत प्रोत्साहित करीत राहिले पाहिजे.अपराध याविषयी दोन गोष्टींकडे लक्ष द्या: अपराध- परमेश्वराविरूद्ध, मनुष्याचे मन कठोर करते आणि तो एक धोकाच आहे, (2 थेस्स 2:10). अपराध/गुन्हा एक अत्यंत धोका देणारी शक्ति आहे, ज्यामुळे लोक आंधळे होतात आणि विनाशाच्या रूंद मार्गावर मनुष्याला तो घेऊन जातो.

***3:14** वचन 6. या वचनाचा काळ पाहा. आपण ख्रिस्तांचे भागीदार झालो आहोत (भविष्यात नव्हे तर वर्तमान काळी), पण जर आपण शेवटपर्यंत त्यांच्यात स्थिर राहिलो तरच. भूतकाळात झालेली वास्तविक घटना आपण भविष्यात नष्ट करू शकत नाही, पुसू

जर आपण आपल्या प्रारंभीच्या विश्वासापासून - शेवटपर्यंत मजबूत व दृढ़ राहिलो तरच आपण ख्रिस्तांबरोबर भागीदार झालो
आहोत. 15 *जसे म्हटलेही जाते, “आज तुम्ही त्याचा आवाज ऐकला आहे, तर इस्राएली लोकांप्रमाणे आपले मन कठीण करू नका,”
क्रोध आणताना त्यांनी तसेच केले होते.
16 ऐकल्यानंतरही परमेश्वरास कोणी क्रोधित केले? चीड आणली? त्या सर्वांनीच नाही काय*, जे मोशेंद्वारे मिसर देश सोडून बाहेर
निघाले होते?* 17 *चाळीस वर्षे तो कोणावर भडकला होता? ज्यांनी बंडाळी केली, ज्यांची प्रेतें जंगलात पडून राहिली, त्यांच्यावरच
नव्हे काय? 18 *त्याने कोणास शपथ वाहून असे म्हटले, “तुम्ही माझ्या विश्रामात प्रवेश करू शकणार नाही?” केवळ त्यांनाच नाही
काय, ज्यांनी आज्ञा मोडली होती?* 19 यावरून कळते, की इस्राएली आपल्या आज्ञाभंगामुळे व अविश्वासामुळे आत प्रवेश करू
शकले नाहीत.

# 4

1 *म्हणून विश्रामात* प्रवेश करण्याची प्रतिज्ञा जर अजूनही आहे, तर आपण* सावध रहावयास हवे कारण कोणीही ती प्रतिज्ञा
गमावता कामा नये. 2 *त्यांच्यासारखीच आनंदवार्ता आपल्यासही ऐकविली गेली, परंतु ऐकलेल्या संदेशापासून त्यांना कोणताच

---

शकत नाही. लेखक येथे परमेश्वरपित्याच्या खऱ्या, सत्य आणि प्रामाणिक लोकांचे वर्णन करीत आहे. लेखक, परमेश्वरबापाच्या सत्य विश्वासींची व्याख्या प्रस्तुत करतो आहे. ते ख्रिस्तांचे भागीदार आहेत आणि आपल्या विश्वासांत दृढ असतात, कायम स्थिर असतात; विश्वासाची परीक्षा होऊ शकते आणि खरा विश्वासी धीराने शेवटपर्यंत त्यात स्थायी राहू शकतो. 'ख्रिस्ती विश्वासी' या रूपात मात्र फक्त प्रारंभीच विश्वास करणे आवश्यक नाही, तर शेवटपर्यंत त्यात स्थिरतेने टिकून राहणे महत्वाचे आहे. खरे विश्वासी शेवटपर्यंत त्यात दृढ़ राहतात, विश्वास त्यागणारे नसतात. (तुलना करा 10:35-39; रोम 5:9-10; योहान 10:27; 17:11-12; लूक 22:31-32; 1 योहान 2:19).

* **3:15** मन कठोर करणे तसेच परमेश्वराविरूद्ध बंडखोरी करणे, हे अविश्वासी अंतःकरणाचे प्रमाणच आहे.

* **3:16** *“त्या सर्वांनीच नाही काय”*- दोन व्यक्ती वगळतां पूर्ण इस्त्राएल देश (गण 14:1-2,30).

* *“मिसर...निघाले होते?”*- निर्ग 14:29-31.

* **3:17** वचन 10; 1 करिं 10:1-12; इफि 5:6; कल 3:6.लेखक या संभावनेची चेतावणी देत आहे की त्याच्या पिढीच्या इब्री लोकांना सुद्धा, परमेश्वर पित्याच्या क्रोधाचा सामना करावा लागू शकतो, म्हणून त्यांनी विश्वास करून, ख्रिस्तांच्या प्रकाशनाची आज्ञा पालन करणे, हे त्यांच्यासाठी अत्यंत आवश्यक असे होते.

* **3:18-19** वचन 11; गण 14:11; अनु 9:24; स्तो 78:10-12,21,22; प्रेषि 7:51-53.

* *“आज्ञा मोडली होती?”*- याचे भाषांतर 'विश्वास केला नाही' ft सुद्धा होऊ शकते. आज्ञाभंग आणि अविश्वास (वचन 19) सोबतच असतात. आज्ञा भंग मनुष्याला परमेश्वराच्या आशीर्वाद- प्राप्तिपासून दूर ठेवतो. याच कारणामुळे इस्त्राएल, कनान देशात प्रवेश करू शकला नाही. याच प्रकारे या सर्व गोष्टी लोकांना स्वर्गात प्रवेश करू देण्यासाठी बाधक ठरतील, त्यांना थांबवतील.

* **4:1-13** या भागाचा विषय परमेश्वराच्या विश्रांमांत प्रवेश करणे हा होय - वचन 1. ख्रिस्तांठायी विश्वास करणारे यात प्रवेश करतात; परंतु अविश्वास करणारे इस्त्राएली यात जाऊ शकले नव्हते - वचन 2,3; या प्रकारचा आराम इस्त्राएली लोकांच्या दिवसात उपलब्ध होता आणि तरी ते त्यात प्रवेश करू शकले नाहीत; परमेश्वरबापाचा हेतू हा होता की काही लोकांनी खात्रीने यात प्रवेश करावा, म्हणून त्याने एक दुसरा दिवस आणि वेळ निश्चित केलेला होता - वचन 6-8. सारांश आता एक विश्रांती आहे, ज्यात प्रवेश केला जाऊ शकतो - वचन 9,10. प्रोत्साहन : यात दाखिल होण्याचा भरसक प्रयत्न करा - वचन 11, परमेश्वरबापाचे वचन पारखते, म्हणून अविश्वासीच्या दाखिल होण्यात काही बाधा निर्माण होऊ शकते - वचन 12-13.

* **4:1** *“विश्रामात”*म्हणजेच आत्मिक शांति ज्याविषयी येशूंनी मत्त 11:28यात म्हटले होते. हे ख्रिस्तांठायी असलेले तारण दाखवते. कनानची भूमि त्या विश्रांतीचे मात्र एक चित्र आहे (यहो 1:18ची टीप पाहा).

* *“आपण”*- तो आमच्यापैकी असे म्हणत नाही.त्याला म्हणावयाचे नाहीये की विश्वासीला तारणाचे आश्वासन नाही, किंवा त्यांनी कुठल्याही प्रकारे भयभीत होऊ नये. (पाहा 2:15; लूक 12:32; रोम 8:15; 1 योहान 5:13) लेखक स्वतःविषयी चिंता करीत नाही, परंतु त्याला दुसऱ्यांची चिंता आहे. आपण सर्वांनी याविषयी सतर्क व्हायला हवे. जेव्हा ख्रिस्ती लोक अविश्वास व आज्ञाभंगाची चिन्हें दाखवतात, तेव्हा आपण त्यांना बजावले पाहिजे, त्यांना ताकीद देऊन सावध केले पाहिजे 3:13; 1 तीम 5:20.

* **4:2** इस्त्राएलाला हा आशीर्वादाचा संदेश दिला गेला होता की प्रतिज्ञेचा देश तुमच्या समोर आहे, जा आणि तो घेऊन घ्या. अनु 1:19-21माणसाला ज्या आनंदवर्तमानाचा प्रचार केला जात आहे तो हा आहे : परमेश्वर तुम्हांला ख्रिस्तांठायी विश्राम व तारण प्रदान

फायदा झाला नव्हता, कारण ऐकणाऱ्यांच्या मनात ते वचन विश्वासाने मूळ धरू (रूजू) शकले नाही. 3 *आपण ज्यांनी विश्वास केला,
त्या विसाव्यात दाखल झालो आहोत. जसे त्याने म्हटलेही होते, “आपल्या क्रोधामुळे मी रागाने म्हणालो, की ते माझ्या विश्रामात
प्रवेश करणार नाहीत,” तरी सृष्टीच्या प्रारंभापूर्वी परमेश्वराची सर्व कार्यें पूर्ण झाली होती. 4 *आणि सातव्या दिवसाविषयी कोठे तरी
एके ठिकाणी असे म्हटले आहे, “परमेश्वराने सातव्या दिवशी कशाचीही रचना केली नाही, कारण सहा दिवसांत रचनेचे कार्य समाप्त
झाले.”

5 हे देखील लिहिले आहे, ‘ते माझ्या विसाव्यात प्रवेश करणार नाहीत.’

6 *मग जर ही गोष्ट बाकी आहे, की जे त्यांत (विश्रामात) यावयाचे होते ते दुसरे लोक आहेत, आणि ज्यांना पूर्वी उद्धारवार्ता
सांगितली गेली होती, परंतु आज्ञापालन न केल्यामुळे ज्यांनी त्यांत प्रवेश केला नाही; 7 तर मग एखादा दिवस हमखास - विषेश
ठरवून, इतक्या दिवसांनंतर दावीदाच्या पुस्तकांत तो त्यास ‘आजचा दिवस’ म्हणतो, आधी म्हटले गेले त्याप्रमाणे, “जर आज तुम्ही
त्याचा शब्द ऐकाल, तर आपली मनें कठीण (अडून बसू) करू नका.”

8 आणि जर यहोशवाद्वारे त्यांचा विसाव्यासाठी प्रवेश झालाच होता, तर त्यानंतर दुसऱ्या दिवसाविषयीची चर्चा झालीच नसती;

9 म्हणजे परमेश्वराच्या लोकांसाठी शब्बाथाची विश्रांती* अजूनही बाकी राहिलेली आहेच. 10 *कारण जितक्यांनी त्याच्या आरामांत
प्रवेश केला आहे त्या सर्वांनी परमेश्वरासमान, आपली कार्यें पूर्ण करून विसावा घेतलेला आहे. 11 *यास्तव आपण या आरामांत

---

करतो; त्याचा विश्वासाद्वारे स्वीकार करा, इस्त्राएली लोक भूमी घ्यावयास तयार नव्हते, या प्रकारे त्यांनी आपला अविश्वास व आज्ञाभंग व्यक्त केला. आज लोक ख्रिस्तांचा स्वीकार न केल्याने, परमेश्वराचे आशीर्वाद गमावतात. या प्रकारे ते आपला अविश्वास दर्शवतात. हे वर्तमान ऐकणेच पुरेसे नाही, तर त्यासोबत त्यावर विश्वास असणेही आवश्यक आहे, असा विश्वास जो आज्ञापालन उत्पन्न करतो.

***4:3** परमेश्वरपित्याच्या विश्रांतीत दाखिल होण्याची एकमात्र पद्धत आहे: ख्रिस्तांवर विश्वास करणे -"जसे ........ होते" - स्तो 95:11

***4:4-5** लेखक उत्प 2:2आणि स्तो 95:11यात दाखवतो की परमेश्वराचा एक “विश्राम” आहे आणि सृष्टीच्या निर्मितीपासूनच तो 'विश्राम' आहे. परमेश्वराची सृष्टि त्या आत्मिक विश्रांतीचे चित्र आहे जी परमेश्वरबाप विश्वासींना देतो.

***4:6-8** परमेश्वराचा हा उद्देश आहे की, लोकांनी 'आरामात' प्रवेश करावा. इस्त्राएलाने, कनान देशात दाखिल झाल्यावर असे केले नाही (जो विश्रांतीचा एक प्रकार होता) यहोशवाद्वारे परमेश्वराने त्यांना मानवीय शत्रूंपासून आराम दिला, म्हणूनच परमेश्वरबापाने एक नवा वेळ नियुक्त केला आणि त्याला 'आजचा दिवस' असे म्हटले. “आजचा दिवस” म्हणजे येशू ख्रिस्तांच्या प्रथम आगमनानंतर - पाहा 3:6.यहोशवा, मोशे किंवा व्यवस्था/नियम आणि पूर्व करार यांद्वारे लोकांना तो विश्राम मिळाला (देऊ शकले) नाही, जो परमेश्वराने त्यांच्यासाठी ठेवलेला होता; याच कारणामुळे परमेशराने एका दुसऱ्या वेळेचा प्रबंध करून, दुसरा करार नियुक्त केला.

***4:9** *“शब्बाथाची विश्रांती”*- ग्रीक भाषेत ‘सबटिस्मौस' शब्बाथ पालन किंवा 'आराम'. शब्बाथाविषयी पाहा निर्ग 20:8-11.यहूदी, शब्बाथांस, येणाऱ्या भावी जगाच्या चित्राच्या रूपात पाहत असत. इस्त्राएली म्हणाले, “हे संपूर्ण विश्वाच्या प्रभो, येणाऱ्या भावी विश्वाचे रूप तू आम्हांला दाखवावे” परमेश्वराने उत्तर दिले, "तो शब्बाथच त्याचा प्रकार आहे "(हे यहूदी ग्रंथात लिहिलेले आहे). त्यांनी म्हटले की स्तोत्र 92 हे शब्बाथाचे भजन होते, कारण याद्वारे भावी विश्वाचे चित्र दिसते, जो पूर्ण शब्बाथाचा दिवस आहे. हा शब्बाथ येणाऱ्या विश्वाकडे संकेत करतो, कारण हा शब्बाथ संपूर्ण असणारा शब्बाथ आणि अनंत जीवनासाठी असलेला विश्रामच आहे”

***4:10** विश्वासीं विश्रांतीत केव्हा प्रवेश करतात? निश्चित रीतिने आपल्या पार्थिव जीवनानंतरच. तेव्हा ते आपल्या परिश्रमापांसून, परमेश्वराच्या उपस्थितीत विश्रांती प्राप्त करतात. (तुलना करा. प्रकटी 14:13; 2 करिं 5:8; फिलि 1:21-24). परंतु काही अर्थांनी, ते याच आरामात प्रवेश करतात. मत्त 11:28-29हा आराम, अंतिम शब्बाथाचा आराम नसून केवळ हा त्याचा पूर्व अनुभव आहे. याचा अर्थ आहे, अपराध क्षमेसाठी केवळ ख्रिस्तांवर विश्वास ठेवणे आणि आपल्या कार्यांच्या आधारे तारण प्राप्तीचा प्रयत्न न करणे (रोम 4:4-5). ही विश्रांती आताच, येथेच आरंभ होते, पण परमेश्वराच्या उपस्थितीमुळे ही विश्रांती, अंतिम व सिद्ध विश्रांती ठरेल. जर आपण हा विश्राम आताच या पृथ्वीवर, ख्रिस्तांठायी आरंभ करीत नसूं, तर येणाऱ्या भावी विश्वाच्या शब्बाथाचा विश्राम आपल्याला खात्रीने मिळणार नाही, हे निश्चितच आहे.

***4:11** मत्त 11:12; लूक 13:24; 2 करिं 13:5; 2 पेत्र 1:10शी तुलना करा. आपण आपल्या स्वतःच्या जीवनातील आणि इतर दुसऱ्या ख्रिस्ती लोकांच्या जीवनातील अविश्वास व आज्ञाभंग पाहण्याचा प्रयत्न करावा आणि अंतिम टप्प्याकडे विश्वासपूर्वक वाटचाल करून पुढे जावे, या खात्रीने की आपल्याजवळ ख्रिस्तांद्वारे प्रतिज्ञा केलेली विश्रांती आताच आहे; आणि निश्चितच आपण तिच्याशी जुळलेले आहोत, आणि पुढे पुढे जात आहोत, तर निस्संदेह आपण त्या विश्रामात दाखिल होणार यांत शंकाच नाही.

प्रवेश घेण्यासाठीचा होईल तितका प्रयत्न करावा*, यासाठी की त्या लोकांप्रमाणे आज्ञा मोडून कोणीही कमी पडता कामा नये.
[12] *कारण परमेश्वराचे वचन, जिवंत, शक्तीशाली व हरेक दुधारी तरवारीपेक्षाही* तीक्ष्ण असून, जीव व आत्मा, सांधे-गाठी आणि मज्जा ही वेगळी छाटून ती भेदून आरपार जाणारे आणि मनातील विचार व इच्छा पारखणारे आहे. [13] सृष्टीतील एकही रचलेली रचना, रचनाकारापासून लपलेली नाहीये; असा कोणताही प्राणी नाही जो त्याच्या दृष्टीआड होऊन अदृश्य होण्यासारखा आहे, परंतु त्याच्या डोळ्यांदेखत* सर्व वस्तू उघड आणि बेपडदा आहेत, व त्यांचा हिशेब आपल्याला त्यास द्यावा लागणार आहे*.
[14] *म्हणून ज्याअर्थी आपला असा महापुरोहित* (येशू) आहे, जो आकाशापार (स्वर्गात दाखल झालाच आहे) गेला आहे, तर आपण आपला विश्वास दृढतेने व मजबूतीने धरून राहू या*. [15] कारण आपले महापुरोहित येशू आपल्या (विश्वासी) दुर्बलतेठायी* आपल्याबरोबर* दुःखी होतीलच, कारण ते सर्व प्रकारे आपल्यासारखेच पारखेले गेले*, तरी ते निरपराधी ठरले व सिद्ध झाले*.

---

* *"प्रयत्न करावा"*- येथे कार्याच्या आधारे असलेल्या तारणाविषयी शिकवले जात नाही, परंतु असा विश्वास जो दृढ, स्थिर व कायम टिकणारा आहे. (3:14)

* **4:12-13** लेखक म्हणतो की, 'अविश्वासाचे एक वाईट अंतःकरण, एक वाईट मन जे अपराधाच्या धोक्यामुळे कठोर झालेले आहे' ते (3:12-13) परमेश्वरबापाच्या दृष्टीपासून लपू शकत नाही. बायबल आंतरिक मनुष्य प्रगट करते आणि परमेश्वरबाप ज्याने शिकवण दिली आहे, तोच ठरवेल की कोणाला विश्रांतीत प्रवेश द्यावा व कोणाला बाहेर ठेवावे.

*"जिवंत, शक्तीशाली"*- 1 पेत्र 1:23

* *"तरवारीपेक्षाही"*- इफि 6:17; यिर्म 23:24शी तुलना करा.

* **4:13** *"त्याच्या डोळ्यांदेखत"*- 2 इति 16:9; स्तो 14:2; 90:8; 139:1-12; यिर्म 23:24; मत्त 6:4.

* *"हिशेब ...आहे"*- मत्त 12:36; प्रेषि 17:31; रोम 14:12; प्रकटी 22:12.

* **4:14** ज्या विषयाचा परिचय लेखकाने 2:17यांत दिला होता, पुन्हा त्याच विषयाकडे तो परत येतो. प्रोत्साहन व ताकीद दिल्यानंतर तो 10:18पर्यंत आपला विषय चालूच ठेवतो.

* *"आपले...महापुरोहित"*- असे वाटते की प्रत्येक धर्मात मनुष्याला एका मध्यस्थाची (याजक) आवश्यकता भासते; एक असा व्यक्ति ज्याला लोक स्वतःच्या तुलनेत परमेश्वराच्या अधिक जवळचा समजतात. ख्रिस्त येण्यापूर्वी सुमारे 1400 वर्षांपर्यंत, यहूदी मतात याजक आणि महायाजक असत. परंतु ख्रिस्ती मताच्या लोकांपुढे कोणताच याजक नव्हता. ख्रिस्तांवर विश्वास न ठेवणाऱ्या यहूदी लोकांनी विचार केला असेल आणि म्हटले असावे की संपूर्ण पृथ्वीवर त्यांचा कोणीच मध्यस्थ नाही, म्हणून त्यांच्यासाठी खरोखर कोणताही महायाजक तर नाहीच नाही. या पत्राचा लेखक, वरील चुकीची धारणा दुरूस्त व खरी करू इच्छितो. ख्रिस्ती विश्वासींच्या जवळ सर्वश्रेष्ठ संभावित महायाजक आहेत, अर्थातच परमेश्वराचा पुत्र, जरी ते पृथ्वीवर नसले किंवा दृष्टीस पडत नसले तरी कांहीच हरकत नाही, काहीच फरक पडत नाही - परंतु गोष्ट याउलट आहे, ती अशी की परमेश्वरासमोर, येशू ख्रिस्त पृथ्वीवरील आणखी कोणत्याही मध्यस्थापेक्षा चांगले कार्य करू शकतात. याच सत्याविषयीची अज्ञानता लोकांना प्रत्येक स्थानावर 'मानवीय मध्यस्थाच्या' बंधनात बांधून ठेवते. म्हणून लेखक, येशू ख्रिस्तांना एका पुरोहिताच्या रूपात प्रगट करण्यासाठी आणि हे दाखवण्यासाठी की ख्रिस्त या कार्यासाठी किती उपयुक्त, योग्य, समर्पक, उचित आणि 'सर्वश्रेष्ठ' मध्यस्थ आहेत, त्यासाठी अत्याधिक परिश्रम करतो.

* *"धरून राहू या"*- 3:1; 4:1. परमेश्वरबाप आपल्याला सत्य यासाठी सांगतो की आपण ते सत्य दृढतेने धरून ठेवावे व जीवनात ते लागू करावे.

* **4:15** *"आपल्या ...दुर्बलतेंठायी"*- प्रत्येकात हा अशक्तपणा आलेला आहे. तुलना करा - मत्त 26:41; रोम 7:18; 8:26; 1 करिं 2:3; 2 करिं 12:5,9; गल 5:17

* *"आपल्याबरोबर"*- हेच एक कारण होते की आपल्या इस्त्राएली लोकांसाठी याजकपण स्थापित करण्यासाठी परमेश्वराने असे केले. आदर्श याजक तोच असूं शकत होता, जो लोकांच्या दुर्बलतेत, दुःखात, संघर्षांत, समस्येंत व आवश्यकतेत समर्थपणे परमेश्वरासमोर त्या सर्व गोष्टीं सहानुभूतीने प्रस्तुत करू शकत होता. 5:1-2; निर्ग 28:29शी तुलना करा. इस्त्राएलाच्या कोणत्याही याजकांपेक्षा किंवा जगाच्या इतर दुसऱ्या मताच्या याजकांपेक्षा, प्रभू येशू ख्रिस्तच सर्वश्रेष्ठ याजकाचे काम करू शकत होते.

* *"पारखले गेले"*- 2:18; मत्त 4:1-10;म्हणूनच ते आमच्याबरोबर सहानुभूति ठेवतात. पृथ्वीवर मनुष्य ज्या सर्व परीक्षांतून जातो त्या सर्व परीक्षांचा सामना येशूंनी केला. त्यांच्यात वास्तविक मांस व रक्त होते आणि ते वास्तविक मानवी स्वभावाचे होते - 2:14. अनुभवामुळेच येशूंना कळले की सैतान परमेश्वराच्या लोकांच्या विरोधात कशा प्रकारे गर्जना करीत फिरत असतो. ख्रिस्तांनी अपराधांच्या भयंकर व भयानक सामर्थ्यांला जाणले होते, ज्याचा उपयोग सैतान आपल्या व आपल्या विश्वासाच्या विरोधात करीत असतो. येशूंनी सैतानाच्या प्रत्येक अग्नीमय तीरांचा सामना केला, तरीपण ते निरअपराधी राहिले.

[16] यास्तव या, चला, आपण कृपेच्या राजासनाजवळ.* हिंमतीने पोचू जेथे कृपा मिळत असते, जेणेकरून आपल्या गरजेसमयी आपणास साहाय्य मिळावे.

## 5

[1] *कारण हरेक.* महायाजक मनुष्यांमधून निवडलेला असतो. मनुष्याच्या ज्या गोष्टींचा संबंध परमेश्वराबरोबर आहे, त्यासाठी तो
नेमलेला असतो, जेणेकरून लोकांचे दान व अपराधांबद्दलचे बलिदान त्याने अर्पण करावे. [2] असा महापुरोहित अज्ञानी व
बहकणाऱ्यांशी.* कोमलतेचा व्यवहार करण्याची दाट शक्यता असते, कारण तो स्वतःही दुर्बलतेनेच घेरलेला आहे. [3] म्हणून या
दुर्बलतेमुळे त्याने लोकांसाठी.* आणि स्वतःसाठी देखील अपराधबलि.* करणे अपेक्षित होते. [4] *अहरोनाप्रमाणे जोवर परमेश्वराकडून
पाचारण होत नाही, व तो नियुक्त केला जात नाही, तोवर अशा प्रकारचे आदराचे पद कोणीही आपसुक (स्वतः) घेत नाही.
[5] *त्याचप्रमाणे येशूंनीही महापुरोहित असण्याचे मोठेपण स्वतः घेतलेले नाहीये, परंतु ते पद परमेश्वराने त्यांना देऊ केलेले आहे,
ज्याने म्हटले होते, “तू माझा पुत्र आहेस, आज मी तुला जन्म दिलेला आहे, [6] *मग परमेश्वर इतरत्र असे म्हणतो, की तू युगानुयुगचा व
सदाकाळाचा याजक (पुरोहित) आहेस.”
[7] येशूंनी देहांठायी रहाण्याच्या दिवसांत, परमेश्वराकडे उंच शब्दांनी पुकारून.* [8] प्रार्थना व विनंती.*.* केली, केवळ येशूंच्या

---

* *“सिद्ध झाले”*- याचे दोन अर्थ होऊ शकतात, एक हा की येशू प्रलोभनाच्या जाळयांत/सापळयांत फसले नाहीत, परंतु प्रत्येक वेळी विजयी होऊनच परीक्षेतून बाहेर निघाले. त्यांच्याठायी वाईट स्वभाव नव्हताच. खरे पाहतां, दोन्ही गोष्टी खऱ्या आहेत (2:17 ची टीप पाहा) पण हे शक्य आहे काय, की ज्याच्याजवळ वाईट स्वभाव नाही, त्याच्या पुढे प्रलोभने असावीत? होय हे शक्य आहे. उत्प 3:1-6; 2 पेत्र 2:4; यहूदा 6.

***4:16** *“कृपेच्या राजासनाजवळ”*- परमेश्वराच्या राजासनाचा अर्थ आहे, ती जागा जेथून तो सर्व सृष्टीच्या कार्यांचे संचालन करतो. त्याचप्रमाणे आपले महायाजक प्रभू येशू परमेश्वरासमवेत राज्य करतात. 1:3; प्रकटी 3:21.आपल्या अपराधांसाठी बलिदान झाल्यामुळे, आता कृपेचे राज्य आहे. पाहा रोम 5:21; 6:14.ते स्वतः म्हणतात की आम्ही स्वतःच्या आवश्यकतेसाठी त्यांच्याजवळ यावे. मत्त 6:9-13; 7:7-10; योहान 16:23-24.आपली सर्वात मोठी गरज आहे, त्यांची कृपा. आपण वाईटात पडू नये, अपराधात पडून राहू नये म्हणून सावध असावे, जपावे; जर चुकलोच तर आपल्याला क्षमेची आवश्यकता आहे, आपल्याला ते बळ हवे जे कृपेद्वारे प्रदान केले जाते. त्याचप्रमाणे जेव्हा आपण अशक्तपणामुळे वाईटात, परीक्षेत पडतो तेव्हा आपल्याला दया, करूणा यांची गरज भासते. आपण कृपेच्या राजासनाजवळ येतो तेव्हा आपण हे निश्चित जाणून घ्यावे की कोणतीही शक्ति, परमेश्वराला, आपल्या आवश्यकतेच्या वस्तूं आपल्याला देण्यापासून वंचित करू शकत नाही, थांबवू शकत नाही, बाधक होऊ शकत नाही; आम्हांला निश्चित खात्री आहे की आपली गरज पूर्ण करण्यासाठी येशू ख्रिस्त नेहमी तयार आहेत/ असतात. (फिलि 4:19तुलना करा)

***5:1-10** लेखक महायाजकाच्या विषयावर चर्चा सुरूच ठेवतो. 1-4 वचनें यात इस्त्राएलातील चांगल्या महायाजकाच्या योग्यतेचे वर्णन केलेले आहे. 5-10 ही वचनें दाखवतात की ख्रिस्तांत हे सर्व गुण होते.

***5:1** *“हरेक”*- मोशे व ख्रिस्त यांच्या मधल्या काळांतील इस्त्राएलाच्या नैतिक व्यवस्थेकडे (नियम) हा इशारा आहे.

***5:2** *“अज्ञानी व बहकणाऱ्यांशी”*- लेवी 4:2; 5:17; गण 15:28.अशा लोकांशी याजकाचा व्यवहार कडक नव्हता, परंतु जे लोक मुद्दाम आणि धीटाईने अपराध करायचे, त्यांच्यासाठी कठोर शिक्षा होती. 2:2; गण 15:30-36.

* *“लोकांसाठी”*- लेवी 16:15-16,32-34.

***5:3** *“स्वतःसाठी देखील अपराधबलि”*- लेवीय महायाजक मानसिक दृष्टीने अशक्त होता आणि त्याच्यामध्ये देखील अपराधांत पडण्याची प्रवृत्ति होती. प्रथम महायाजक अहरोन याची मानसिक दुर्बलता पाहा - निर्ग अध्याय 32.

***5:4** निर्ग 28:1

***5:5** 1:5; स्तो 2:7

***5:6** वचन 10; 6:20; 7:17 पाहा स्तो 110:4. स्तो 110:5यात शब्द 'पुत्र' ख्रिस्तांसाठीचा आहे आणि ज्या प्रकारे अहरोनाला परमेश्वराने आता याजक ठरवले होते त्याच प्रकारे येशूंनाही याजक ठरवले.

***5:7** *"परमेश्वराकडे उंच शब्दांनी पुकारून"*- काही आलोचक असे म्हणतात की सैतान येशूंना गेथशेमाने बागेतच मारण्याच्या बेतात होता आणि येशू, परमेश्वराजवळ प्रार्थना करत होते की परमेश्वरबापाने यापासून त्यांचे रक्षण करावे, आणि वधस्तंभावर अपराधांच्या बलिदानाच्या रूपात मरण्याची योग्यता त्यांना प्रदान करावी. परंतु या प्रकारचे शिक्षण बायबलमध्ये सापडत नाही. काही लोक म्हणतात की वधस्तंभावरच्या मृत्युपासून, स्वतःचा बचाव करण्यासाठी ते प्रार्थना करीत होते, परंतु हे खरे असू शकत

समर्पणाखातरच ती प्रार्थना ऐकलीही गेली. [9] पुत्र असतानाही येशूंनी वारंवार दुःखें सहन करून आज्ञा पाळण्याचे मर्म शिकून घेतले. ते स्वतः मजबूत* झाले व त्यांचे आज्ञापालन* करणाऱ्या सर्व विश्वासींसाठी मुक्तीचे कारण ठरले. [10] येशूंना परमेश्वरातर्फे, मलकीसदेकाप्रमाणे* महापुरोहिताचे पद प्राप्त झाले.

[11] *या विषयांतर्गत अनेक गोष्टी आम्हांला सांगायच्या आहेत, परंतु तुम्ही त्यां समजून घेणे जरा अवघड आहे, कारण तुमचे ऐकणे व समजून घेणे, मंदपणाचे झाले आहे. [12] *खरे पाहता, इतक्या काळानंतर तुम्ही तर गुरू व्हावयास हवे होते, पण असे वाटते की आत्ताही तुम्हाला एखाद्या अशा मनुष्याची गरज आहे, ज्याने बायबलची मूळ शिकवण तुम्हांस द्यावी! तुम्ही असे झाला आहा, की अन्नाऐंवजी* अजूनही तुम्हांस दूधच हवे आहे. [13] दूध, नव्या विश्वासींसाठी आहे ज्यांना परमेश्वरी मार्गांचा अनुभव* * नाहीच मुळी,

---

नाही, कारण येशू आपल्या मरण्याचा हेतू जाणत होते (मत्त 20:28; योहान 10:17-18). पुढे लेखक असेही म्हणतो की "ती... गेली"आपल्याला ठाऊक आहे की, येशूंनी तर वधस्तंभावरचे मरण सोसले, म्हणूनच त्यांची प्रार्थना नक्कीच बचावासाठी नव्हती. संभावित अर्थ असा आहे येशू यासाठी प्रार्थना करत होते की मृत्युनंतर पित्याने त्यांना मृत्युच्या मर्यादेतून सोडवावे, यासाठी की मृत्युचा त्यांच्यावर प्रभाव होता कामा नये, (प्रेषि 2:24) दुसऱ्या शब्दांत पित्याने त्यांना मरणानंतर जिवंत करावे. तुलना करा स्तो 22:15-21(वचन 19-21 पुनरूत्थानासाठी त्यांनी केलेली प्रार्थना वाटते) "ऐकलीही गेली" - म्हणजेच त्या प्रार्थनेचे त्यांना उत्तर मिळाले. आपल्याला ठाऊक आहे की येशूंना क्रूसाच्या मरणापासून वाचवण्यात आलेले नाही म्हणजेच येशूंनी वधस्तंभावरच्या मृत्युपासून वाचवण्यासाठी प्रार्थना केलेली नव्हती, परंतु येशूंना याविषयी ज्ञान नव्हते काय की परमेश्वर त्यांना उठवील? मग त्याच्यासाठी प्रार्थना का करायची? त्यांना हे ज्ञान होते की परमेश्वरबापाने प्रतिज्ञा केली होती की तो त्यांना उठवील (स्तो 16:10). परंतु प्रार्थनेचा हा एक महत्वपूर्ण पैलु आहे: परमेश्वरबापाच्या प्रतिज्ञांच्या पूर्णतेसाठी त्याच्यासमोर कळकळीची विनंती करणे (तुलना करा - योहान अध्याय योहान 17; दानी 10:2-19) आणि जेव्हा भयंकर अनुभवाचा प्याला त्यांच्या पुढे आला (मत्त 26:39; 2 करिं 5:21) आणि ती अंधकारमय घटका जी त्यांच्यावर आली (लूक 22:53); तेव्हा येशू अतिशय व्याकुल होऊन अश्रूंनी ढळढळा रडले आणि पित्याने त्यांचे ऐकले (मत्त 28:6) केवळ यासाठीच की येशूंच्याठायी पित्याप्रत श्रद्धा होती.

***5:8*** *"प्रार्थना व विनंती"*- पृथ्वीवरील दिवसात प्रभू येशू, एक प्रार्थना करणारे व्यक्ती होते (मत्त 14:23; लूक 5:16). परंतु लेखक एका निश्चित वेळेचा उल्लेख करतो ज्या वेळी ते मरणाचा सामना करीत होते. संभावना हीच आहे की लेखक गेथशेमाने बागेतील अनुभवाविषयी सांगत आहे (मत्त 26:36-46; मार्क 14:32-42; लूक 22:39-46) येथे ते दुःखाने व्याकुळ झाले, त्यांचा घाम जणू रक्ताच्या थेंबासारखा पडत होता. या सर्व गोष्टी परीक्षेच्या भयानक क्षणांचा आणि दैहिक अशक्तपणाचा अनुभव करून देतात. (तुलना करा 2 करिं 13:4).

***5:8*** *"आज्ञापालन"*- याचा अर्थ हा नव्हे की येशू कधीतरी आज्ञाभंग करणारे होते आणि त्यानंतर हळूहळू ते आज्ञापालन शिकले. आज्ञेचे उल्लंघन करणे म्हणजे परमेश्वराचा विरोध करणे आणि येशू ते कधीच आज्ञेचे उल्लंघन करणारे नव्हते. (योहान 4:34; 6:29; फिलि 2:6-8; 1 पेत्र 2:21-22). परंतु येशू आपल्या अनुभवातून शिकले की आज्ञापालनाचा अर्थ काय आहे. त्यासोबतच ते इतर गोष्टी सुद्धा शिकले जसेः आपली इच्छा दाबणे, परीक्षेचा सामना करणे आणि दुःख सहन करणे. (या सर्वांचा समावेश आहे.) तो प्याला (मत्त 26:39) जो त्यांच्या पुढे होता, तो पाहून त्यांनी असा अनुभव केला की आज्ञेचे पालन करणे सोपे नाही/नसते.

***5:9*** *"मजबूत"*- याचा अर्थ हा नाही की येशूंच्या जीवनात काही खोट होती, ज्यांत सुधारणेची गरज होती. 2:10संबंधी टीप पाहा. परमेश्वरबापाने येशूंना दुःखाच्या अनुभवातून जाऊ दिले, यासाठी की त्यांनी आपले महायाजक असे व्हावे.

* *"आज्ञापालन"*- या वचनाच्या प्रकाशात दुसरी वचनें- (जसे योहान 3:36; प्रेषि 5:32; 2 थेस्स 1:8). आपण असे म्हणू शकतो कां, की जो कोणी येशूंची आज्ञा पाळीत नाही, त्याला तारण प्राप्त होऊ शकते? याचा अर्थ हा नव्हे की तारण कार्यामुळे प्राप्त होते. परंतु पौलाच्या मते विश्वासाच्या आज्ञापालनाद्वारे (रोम 1:5). ही एक कृपाच आहे जी आपल्याला अशा प्रकारचा विश्वास आणि अंतःकरण प्रदान करते, ज्यांच्या मदतीने आपण विश्वास करू शकतो. (इफि 2:8-9) प्रेषि 22:10ची टीप पाहा.

***5:10*** *"मलकीसदेकाप्रमाणे"*- अध्याय 7 चे नोट्स पाहावे.

***5:11-14*** लेखक आरंभी आणखी एक प्रोत्साहन व ताकीद या ठिकाणी सांगत आहे जे 6:12यात समाप्त होते. ही ताकीद परत जाण्याविषयीची अर्थात शहाणे झाले नसल्याविषयी आहे (6:6). ही ताकीद देऊन त्याने चेतवले की त्याने यहूदी लोकांतून आलेल्या विश्वासींच्या ख्रिस्ती जीवनात प्रगतीची कमतरता पाहिली.

***5:12-14*** अनेक प्रचारक, पालक, शिक्षक आज हीच तक्रार करतात. कितीतरी ख्रिस्ती विश्वासीं आहेत जे विश्वासात आल्यानंतरही किती तरी वर्षे केवळ दूधाचीच मागणी करतात. येशूंच्या वचनांचे सरळ व सोपे सत्य ते संदेश- सभेत गर्दी करून शोधतात व बायबल अध्ययनापासून दूर राहतात. एकच सत्य त्यांना वारंवार शिकवावे लागते.

* *"अन्नाऐंवजी"*- याचा अर्थ, 'येशू एक मध्यस्थ' यांसारख्या विषयावर आणि दुसऱ्या अशा सिद्धांताविषयीचे शिक्षण, परमेश्वराच्या

कारण ते बाळक आहेत. [14] परंतु वयस्क प्रौढांसाठी[*] दूध नव्हे, तर जड अन्न असते, अर्थात असे विश्वासीं ज्यांनी आपल्या अंतःकरणाच्या अभ्यासाद्वारे चांगले वाईट यांच्यातील भेद व ज्ञान प्राप्त केले आहे.

## 6

[1] मग या! येशूंच्या शिकवणीच्या प्राथमिक बाबींवर[*] विवाद करण्याचे सोडून आपण परिपूर्णतेच्या[*] दिशेने पुढे जात राहू, दुष्ट
कृत्यांपासून वळून परमेश्वरावर विश्वास ठेवू[*]. [2] बाप्तिस्में[*] आणि हात (वर) ठेवण्याचा[*], मेलेल्यांच्या पुनरूत्थानाचा[*] व सनातन
न्यायाचा[*] पाया पुन्हा घातला जाऊ नये. [3] जर परमेश्वराची इच्छा असेल तर आपण असेच करू या.
[4] [*]आपण ज्यांनी एकदा सत्य प्राप्त केले[*], स्वर्गीक वरदानाचा[*] आस्वाद घेतला, पवित्र आत्म्याचे भागीदार[*] झालोत; [5] आपण

---

अशा सत्याचा स्वीकार न करणे, हे अपरिपक्वतेचेच लक्षण आहे. पाहा 1 करिं 3:1-4.

[*]**5:13** *"परमेश्वरी मार्गांचा अनुभव"* - आत्मिक जीवनातील लहान बालक, परमेश्वराच्या गोष्टींविषयी शिक्षण ऐकू शकतो, परंतु आपल्या जीवनांत लागू करण्यासंबंधी त्याच्याजवळ कोणताच अनुभव नसतो.

[*]*'परमेश्वराचे मार्ग*- कदाचित याचा अर्थ सुद्धा, वचन 12 चे जड अन्न आहे. 1 करिं 2:6-10यात पौलाने वचनांच्या ज्ञानाविषयी परिपक्व ख्रिस्ती लोकांना शिकवले, याचा अर्थ देखील तोच आहे.

[*]**5:14** *"प्रौढांसाठी"*- जे लोक परमेश्वरबापाच्या गोष्टींच्या अभ्यासात आणि आत्मिक बाबतींत दृढ झाले आहेत असे. तसे पाहिल्यास चांगले व वाईट किंवा खरे आणि खोटे यात फरक करणे कठीणच असते. यासाठी प्रशिक्षण (परमेश्वराच्या वचनांच्या गंभीर व खोल गोष्टींचा अर्थ समजण्याचा प्रयत्न) याची गरज आहे. याचा अर्थ आहे निरंतर प्रयत्न, अध्ययन आणि अनुशासन. जे लोक आत्मिक बाळें आहेत, कदाचित हे त्या प्रकारचे लोक आहेत ज्यांच्याजवळ आत्मिक विकासासाठी कमी वेळ आणि संधी आहे किंवा त्या प्रकारचे लोक जे प्रयत्न करू इच्छितच नाहीत.

[*]*"प्राथमिक बाबींवर"*- हे स्पष्ट नाही की कोणत्या प्राथमिकतेविषयी बोलले जात आहे. लेखक त्या यहूदी लोकांना लिहीत आहे, जे ख्रिस्ती झालेले होते. यहूदी या नात्याने त्यांनी जो जुना करार प्राप्त केला होता, कदाचित त्याच्याचकडे हा संकेत आहे किंवा कराराच्या काळात, प्रेषितांद्वारे सादर (देलेल्या) आरंभीच्या गोष्टींविषयी म्हटले जात आहे, याविषयीचा 'अर्थ' शंका उत्पन्न करतो. सर्व गोष्टीं जुन्या करारातील पायाच्या किंवा प्रारंभिक गोष्टींचा, एक भाग असू शकतात.

[*]**6:1-2** *"परिपूर्णतेच्या"*- परिपक्वता किंवा पूर्ण विकास" - 5:14; इफि 4:13-15

[*]*"दुष्ट कृत्यांपासून वळून परमेश्वरावर विश्वास ठेवू"*- लेखक याठिकाणी "ख्रिस्तांत विश्वास"याविषयी बोलत नाही.

[*]**6:2** *"बाप्तिस्में"*- अनेकवचनाकडे लक्ष द्या. जर या ठिकाणी तो ख्रिस्ती बापतिस्म्याविषयी बोलला असता तर ते एकवचन राहिले नसते का? पाहा इफि 4:5.येथे 'धुतले जाणे' हा एक संभाव्य योग्य आणि उत्तम अर्थ आहे. जुन्या करारात अनेक प्रकारचे धुतले जाणे होते. निर्ग 29:4; 3:19-21; लेवी 11:25; 13:6; 14:8; 16:26; 17:16; गण 8:17; 19:18.

[*]*"हात ....ठेवण्याचा"*- हे देखील जुन्या करारातच आहे गण 8:10; 27:18; निर्ग 29:10; लेवी 1:4.

[*]*"पुनरूत्थान"*- दानी 12:2; यश 26:19; स्तो 16:10.

[*]*"न्याय"*- स्तो 9:8; 82:8; दानी 7:9-10; योएल 3:12.तरी सुद्धा बायबलचे ज्ञान ठेवणारे लोक यांस दुसऱ्या वेगळ्या दृष्टीकोनातून पाहतात. ते म्हणतात की लेखकाच्या मनात 'परमेश्वरावर विश्वास' याचा अर्थ 'ख्रिस्तावर विश्वास' असा देखील लावला शकतो. ते असेही म्हणतात की 'बापतिस्मे' याचा अर्थ योहान बापतिस्मा देणाऱ्याचा बापतिस्मा, ख्रिस्ती बापतिस्मा, पवित्र आत्म्याचा बापतिस्मा असू शकतो. 'हात ठेवणे' , प्रारंभिक चर्चमध्ये हात ठेवण्याची प्रथा असावी. (प्रेषि 6:6; 8:16-18; 13:3). जर या सूचीचा उपयोग, ख्रिस्ती जीवनातील पायाभूत गोष्टींचे (आधारभूत) वर्णन करण्यासाठी केला गेला, तरी ही यादी 'विचित्र यादी' ठरेल. या सूचीत, ख्रिस्तांचा जन्म, अपराधांसाठी बलिदान, पावित्रात्म्याचे दिले जाणे, ख्रिस्तांचे चर्च, ख्रिस्तांद्वारे अनंत जीवन यासंबधीचे कोणतेच विषय दिलेले नाहीत. शंका असल्यामुळे आपण असे म्हणू शकत नाही की याचा अर्थ हा आहे की तो आहे.

[*]**6:4-6** या वचनांचा अर्थ लावणे, सोपे काम नाही. ज्या लोकांना बायबलचे ज्ञान आहे त्या लोकांचे अर्थाविषयी आपसात मतभेद आहेत. या वचनांच्या विषयी देखील चार प्रकारची मतें आहेत. पहिला : ख्रिस्तांच्या विश्वासीं लोकांसंबंधीचे हे वचन आहे. असे लोक जे ख्रिस्तांपासून दूर जाऊन, आणि त्यांना नकार देऊन आपले तारण गमवू शकतात. दुसरा : हे वचन त्या प्रकारच्या विश्वासीं लोकांकडे संकेत करते, जे जरी बहकले होते तरी आपले तारण गमावीत नाहीत, मात्र ते त्या पुरस्कारांपासून वंचित राहतील, जे त्यांना विश्वसनीय सेवेमुळे मिळणार होते. तिसरा : या विचारधारेचे लोक असे म्हणतात की हे वचन त्या खऱ्या विश्वासीं लोकांसाठी आहे, ज्यांना परत जाण्याच्या वास्तविक धोक्याची ताकीद दिली गेली होती, परंतु ते खरोखर कधीच विश्वास गमावणार नाहीत व

परमेश्वराच्या उत्तम शिकवणीचा व येणाऱ्या भावी युगाच्या शक्तीचा स्वाद घेतला आहे, [6] *तरीही जे लोक बहकले व भटकले.* असतील, त्यांना अंतःकरणाच्या पालटासाठी एकवार पुन्हा नवे करणे अशक्य आहे; कारण याद्वारे असे लोक परमेश्वराच्या पुत्रास

---

तो नाकारणार नाहीत. चौथा : या मताचे लोक म्हणतात की, हे वास्तविक विश्वासीं लोक नाहीत. ज्या गोष्टी येथे लिहिल्या गेल्या आहेत, त्या विश्वासी लोकांसंबंधी सत्य आहेत, परंतु त्या अशा ख्रिस्ती लोकांसंबंधी सुद्धा असतील, जे कधीच खरे विश्वासी नव्हते. या अध्ययन बायबलच्या लेखकाचे स्वतःचे असे मत आहे की ख्रिस्तांचे खरे विश्वासी कधीच विश्वासापासून दूर जाऊ शकत नाहीत, नकार देऊ शकत नाहीत किंवा ते विश्वास त्यागासंबंधी कोणतेच अपराध करू शकत नाहीत (2:1-4 शी संबंधित टीप आणि 10:39; योहान 10:27; 1 योहान 3:9; 5:18पाहा व तुलना करा. योहान 5:24; 6:37-40; 10:27-29; 17:11-12; रोम 5:9-10; 8:28-39; फिलि 1:6; 1 पेत्र 1:5). आपण कधीच अशा प्रकारच्या कठीण वचनांचा (जसा येथे आहे) उपयोग स्पष्ट वचनांना दूर सारण्याकडे करू नये. इब्रीच्या पत्रात हे वचन स्पष्ट रीतिने सांगत नाही की ख्रिस्तांठायी असलेले खरे विश्वासीं विश्वासाचा त्याग करतात आणि विश्वास गमावतात; खरे पाहिले तर या वचनात ख्रिस्तांतील विश्वासाची चर्चा सुद्धा केली गेलेली नाही. संपूर्ण नव्या कराराच्या शिक्षणाच्या प्रकाशात तिसरा अर्थ बरोबर व योग्य वाटतो. सैतानाचा कल आणि प्रयत्न या गोष्टीकडे असतो की एखाद्या विश्वासीने विश्वासाचा त्याग करून तो गमावून टाकावा आणि असा धोका शक्य आहे. परंतु धोक्याच्या शक्यतेचा अर्थ हा नव्हे, की असे अवश्य होईलच. जर परमेश्वराचे वचन, ते सांभाळण्याची योग्यता आणि त्याच्यासाठी ख्रिस्तांची प्रार्थना, मध्यस्थी नसती तर हे कदाचित शक्य झालेही असते. (तुलना करा लूक 22:31-32; योहान 17:11-12; 1 पेत्र 1:5). परंतु या कारणांमुळे ते नकार देण्यापासून वाचतात आणि जेव्हा धोका समोर असतो तेव्हा नकाराविषयीची ताकीद माहीत असल्यामुळे ते विश्वास त्यागण्यापासून सुद्धा आपला बचाव करतात. तरीपण चौथा अर्थ संभवतः योग्य व बरोबर आहे. 4 ते 6 वचनें त्या लोकांविषयी असूं शकतात जे सत्य जाणतात, त्याद्वारे प्रभावित होतात, परमेश्वराच्या राज्याच्या अतिशय जवळ येतात, तरी सुद्धा त्यांनी त्यात प्रवेश केलेला नसतो. जे लोक परमेश्वराची मुलें नाहीत, पण अशी घोषणा करणारे ते लोक, काही काळ परमेश्वराची मुलें भासू शकतात (तुलना मत्त 13:18-23,24-30; 25:1-2; 2 करिं 11:14-15)

*__6:4__ *“ज्यांनी ....प्राप्त केले”*- त्या लोकांविषयी म्हटले गेले आहे जे सत्य जाणतात 10:26शी तुलना करा. ख्रिस्तांचा प्रकाश त्यांच्यावर चमकलेला आहे, तरी पण याचा अर्थ असा नाही की त्यांनी प्रकाशावर आपला विश्वास ठेवला किंवा प्रकाशाची मुलें' (योहान 12:35-36) झालीत. लोक अंतःकरणाचा पालट न होताही तारणावर किंवा येशूंवर विश्वास न करूनही, सत्याविषयी जाणणे कायम ठेवू शकतात.

* *“स्वर्गीक वरदानाचा”*- याचा अर्थ असा नाहीये की त्यांना स्वर्गीक दानें प्राप्त झालेली आहेत. कदाचित लेखकाने येथे योहान 6:57च्या 'खाणे'शब्दाची तुलना चव घेण्याशी केली असेल, हे शक्य आहे. गण 13:23,26शी तुलना करा- ते इस्त्राएली, ज्यांनी कनान देशात आपल्या अविश्वासाखातर कधीच प्रवेश केला नाही, परंतु (3:19) कनानच्या फळांची चव घेतली असेल.

* *“पवित्र आत्म्याचे भागीदार”*- लेखक म्हणत नाही की त्यांना पवित्रात्मा मिळाला. 'भागीदार' होण्याचा अर्थ, हा असू शकतो किंवा नाही सुद्धा. पवित्रात्म्याचे भागीदार होणे, अनेक प्रकारे होऊ शकते. खोट्या बलामाला त्याचा अनुभव होता (गण 24:2).यहूदा इस्कर्योत याला हा अनुभव होता (मत्त 10:1; योहान 6:70-71). प्रेषि 8:9-24यात शिमोन याचे एक चांगले उदाहरण असू शकते. कदाचित येथे भागीदार होण्याचा अर्थ आहे, पवित्रात्म्याच्या सामर्थी कार्याच्या वेळी व्यक्तीचे उपस्थित असणे, आत्म्याद्वारे प्रभावित केले जाणे (योहान 16:8-11)व पश्चात्तापाच्या स्थानी, परमेश्वराच्या राज्याच्या सीमेपर्यंत आत्म्याद्वारे आणले जाणे

*__6:6__ *“परंतु”*- शब्द असे सुचवीत नाही की ज्या लोकांचे वर्णन 4,5 वचनांत आहे, ते विश्वास त्याग करणारे लोक आहेत, परंतु यात शंका नाही की लेखक अशा प्रकारच्या धोक्याविषयी अवश्य शिक्षण देतो.

* *“बहकले व भटकले”*- हे कोणत्याही प्रकारच्या अपराधात पडण्यापेक्षा अधिक भयंकर आहे. पेत्र वाईट रीतिने पडला, तरीपण पुन्हा त्याने मनाचा पालट केला, विश्वास पुन्हा परत आला, उभा झाला (मत्तय 26,69-75). जरी आपण अपराधात पडलो, तरी क्षमा प्राप्त होऊ शकते. (1 योहान 1:9; 2:1; मत्त 6:12; 12:31-32; नीति 24:16पाहा) 'भटकले' चा अर्थ आहे विश्वास-त्याग. याचा अर्थ पूर्ण प्रकारे सत्याचा त्याग करणेअसा देखील आहे. (2:1-4ची टीप पाहा) लेखक असे का म्हणतो की मनबदलासाठी त्यांचे नवीनीकरण अशक्य आहे? जर लेखक त्या लोकांविषयी बोलतो ज्यांच्या जवळ विश्वास आहे तर तो असे का बोलत नाही की विश्वासाचे नवीनीकरण व्हावे? मनपालटाचा अर्थ आहे, हृदय, अंतःकरण किंवा मन परिवर्तन आणि याठिकाणी त्याचा हाच अर्थ असू शकतो. आधी या इब्री लोकांनी असा विचार केला की येशू त्यांचे ख्रिस्त नाही, नंतर त्यांनी आपल्या मनाचे परिवर्तन केले आणि विश्वास ठेवला की तेच त्यांचे ख्रिस्त आहेत. वचन 4,5 यात त्यांच्याविषयी म्हटले गेले आहे की जर त्यांनी पूर्णपणे ख्रिस्तांचा त्याग केला तर पुन्हा त्यांना हृदय परिवर्तनाच्या स्थानी कसे आणले जाऊ शकते?

आपल्यासाठी पुन्हा वधस्तंभावर खिळतात.* आणि उघडरित्या त्यांच्यावर कलंक.* लावतात.
7 *जी जमीन तिच्यावर वारंवार पडणारे पावसाचे पाणी पिऊन, ज्या लोकांनी तिची लागवड केली होती त्यांच्यासाठी उपयोगी वनस्पति आणि भाजीपाला उपजवते, त्या भूमिस परमेश्वराचा आशीर्वाद प्राप्त होतो. 8 पण याउलट जर ती निरूपयोगी काटे व झुडपें उगवीत असेल, तर ती निकामी व दंडपात्र आहे व जाळले जाणे हाच तिचा अंत आहे.
9 *हे प्रियांनो, जरी आम्ही असे बोलत असू, तरी तुमच्याविषयी आम्ही यांहून चांगल्या गोष्टींसंबंधी विश्वास बाळगतो. 10 परमेश्वर इतका अन्यायी नाहीये, की त्याने तुमचे कार्य विसरावे व तुमच्या प्रेमाचा त्याला विसर पडावा. जी कार्यें त्याच्या नांवासाठी तुम्ही अशा रीतिने केली, की त्याद्वारे दुसऱ्या पवित्र लोकांची सेवा झाली.* आणि जी तुम्ही आताही करीतच आहा, ती परमेश्वरास खचितच आठवीत असतात. 11 *आमची इच्छा.* हीच आहे, की तुमच्यापैकी प्रत्येकाने शेवटपर्यंत.* पूर्ण आशेसाठी याच समंजसपणाने कार्य करीत जावे; 12 तुम्ही आळशी.* होता कामा नये, परंतु विश्वास व धीर यांद्वारे जे सर्व प्रतिज्ञेचे वारस होतात, अशा लोकांना तुम्ही आपला आदर्श करावे.
13 **परमेश्वराने अब्राहामाला प्रतिज्ञा दिली, तेव्हा शपथ वाहण्यासाठी त्याला स्वतःपेक्षा कोणीही मोठा आढळला नाही म्हणून

---

* *“पुन्हा वधस्तंभावर खिळतात”*- यावरून आपल्याला कळते की त्या लोकांसाठी कोणताही मनबदल का नाही? ते ख्रिस्तांना स्वीकारीत नाहीत आणि एका प्रकारे ते पुन्हा त्यांची हत्याच करतात, अगदी त्याप्रमाणे ज्याप्रमाणे यहूदा याने केले होते. लेखक म्हणतो की असे लोक विश्वासात मागे राहिले की मग त्यांची स्थिती अधिक वाईट व दयनीय होते, त्यांच्यासाठी कोणतीच आशा नसते. पण अशा प्रकारे मागे पडलेल्या लोकांना पश्चात्ताप करुन मनपालटाच्या स्थितीपर्यंत व विश्वासात आणणे शक्य आहे (2 करिं 2:5-10; गल 6:1; याकोब 4:8-10; स्तो 32:3-5; 51:1-12; यिर्म 3:12; यहे 18:30-32; होशेय 14:1-4).

* *“उघडरित्या ... कलंक”*- जर इब्री लोक ख्रिस्तांना सोडून परत यहूदी धर्मात गेले असते तर ही गोष्ट सर्व लोकांना कळली असती. जेव्हा एखादा व्यक्ती, ख्रिस्तांचा त्याग करून दुसऱ्या मताचा होतो/जातो, तेव्हा सर्व लोकांना ही गोष्ट कळते. याचाच अर्थ, ख्रिस्त आणि त्यांच्या आनंदवर्तमानासाठी हा सार्वजनिक लज्जेचा विषय बनतो आणि यामुळे लोक खऱ्या-सत्य परमेश्वराचा अनादर देखील करतात.

* **6:7-8** याचा अर्थ स्पष्ट समजण्यासाठी लेखक हे उदाहरण देतो. उत्पादन देणारी जमीन, विश्वासींकडे संकेत करते. (मत्त 13:23). फळ न देणारी भूमि, 'अविश्वासींकडे' आणि विश्वास त्यागणाऱ्यांकडे संकेत करते. हे लोक परमेश्वरासाठी कोणतेच फळ उत्पन्न करीत नाहीत (तुलना मत्त 13:19-22; लूक 13:6-9). दोन्ही प्रकारच्या भूमीवर पाऊस पडतो (येथे पाऊस म्हणजे 'परमेश्वराचे सत्य आणि पवित्रात्म्याचा प्रभाव'). पण परमेश्वरबापासाठी ही दुसऱ्या प्रकारची जमीन कोणतेच फळ उत्पन्न करीत नाही. एखाद्या मनुष्याच्या जीवनाचे उत्पादन (फळ) हे प्रगट करते की तो ख्रिस्तांठायी आहे किंवा नाही. विश्वास त्यागाचे काटे, या गोष्टीचे चिन्ह आहेत की या लोकांच्या जीवनात ख्रिस्त कधीच नव्हते. तुलना करा 1 योहान 2:19; मत्त 3:8; 7:16-20).

* **6:9-10** हे स्पष्ट आहे की लेखक, कोणत्याही प्रकारची अनावश्यक ताकीद, जी त्याच्या शब्दांद्वारे प्रगट झाली असेल, दूर करण्याचा प्रयत्न करतो. (तुलना करा 4:1; रोम 8:15). त्यांच्या 'पडणे' 'श्रापित होणे' आणि 'जाळले जाणे' या सर्व शक्यतां तो या कारणामुळे अस्वीकार करतो. कारण त्यांच्या जीवनात, आत्मिक फळें प्रगट झाली होती, ते परमेश्वरबापावर प्रेम करीत होते, परमेश्वरासाठी कार्य करीत होते, केवळ इतकेच नव्हे, तर त्या लोकांनी परमेश्वर व लोक यांची सेवा सुद्धा केली होती. (10:32-34). जर ख्रिस्ती लोकांच्या जीवनात या प्रकारच्या गोष्टी दिसत नसतील, तर मग ते विश्वासीं असण्याचे काय प्रमाण आहे, काय चिन्ह आहे? जर त्या संबंधात 4-5 चे संपूर्ण मत योग्य आहे आणि त्यांच्या जीवनात परमेश्वरासाठी कोणतेच फळ नाही, तर मग सर्व काही व्यर्थच आहे, निष्फळ आहे, निष्क्रीय आहे. विश्वासी, आज अशा प्रकारच्या जमिनीसारखा आहे, जी काटेच उत्पन्न करते.

* **6:10** *“सेवा झाली”*- मत्त 25:34-40; 1 थेस्स 1:3.

* **6:11-12** लेखकाची इच्छा होती की वचन 4-8 यात दिलेल्या ताकीदीने व चेतावणीद्वारे लोकांनी शिकावे. जर ते ख्रिस्तांमध्ये पुढे जाण्यासाठी, विश्वासांत वाढण्यासाठी तत्पर नाहीत तर त्या सर्वांचा अर्थ लावण्यात, त्यांचा व आपला काही फायदा होणार नाही. या पृथ्वीवरील जीवनात शेवटपर्यंत ख्रिस्तांवर विश्वास ठेवून त्यांची सेवा करणे, हीच सर्वांत अधिक महत्वपूर्ण गोष्ट आहे. जर आपण असे केले तर आपण विश्वास त्यागणारे होणार नाही, आणि असे होईलच याची भीतिही आपल्याला राहणार नाही.

* *“आमची इच्छा”*- 2 करिं 13:5; 2 पेत्र 1:10; 1 योहान 5:13.

* *“शेवटपर्यंत”*- 3:6,14; 10:36.

* **6:12** *“आळशी”*- मत्त 25:26; नीति 18:9; 24:30-34. ज्याप्रमाणे दुसऱ्या क्षेत्रात आळस विनाशकारी आहे त्याचप्रमाणे आत्मिक क्षेत्रांत देखील आहे.

* **6:13-20** - अध्याय 5:11यात आरंभिलेला भाग लेखक येथे समाप्त करतो आणि 'ख्रिस्त मध्यस्थ असण्याचा' विषय पुन्हा

त्याने स्वतःचीच शपथ वाहून म्हटले, [14] “मी खरोखर तुला पुष्कळ आशीर्वाद देईन आणि तुझे संतान वाढवीत जाईन,”
[15] व या प्रकारे त्याने धीर धरला आणि फळ प्राप्त केले.
[16] *मनुष्य स्वतःपेक्षा मोठ्यांची शपथ वाहतो, आणि प्रत्येक विवादाचा फैसला शपथेने पक्का होत असतो. [17] ‘आपली इच्छा कधीच बदलणार नाही, ती अढळ आहे असे प्रतिज्ञेच्या* वारसदारांना स्पष्ट प्रगट करण्याची इच्छा बाळगून’ परमेश्वराने आपली शपथ मध्ये आणली म्हणून, [18] या दोन न बदलणाऱ्या गोष्टींमुळें* परमेश्वरास खोटे ठरणे केवळ अशक्य आहे, म्हणूनच आपला धीर वृद्धींगत होऊन आपणास प्रोत्साहन मिळावे व त्यान्वये शरण* आलेले धावत सुटले आहेत, की जी आशा समोर ठेवली आहे ती त्यांनी प्राप्त करावी.
[19] *जी आशा पडद्याच्या* आतल्या भागांपर्यंत पोचते, ती आपल्या जिवाचा नांगर असून स्थिर आणि मजबूतही आहे, [20] ज्यांत
येशू मलकीसदेकाप्रमाणे, युगायुगाचे व सर्वकाळाचे महापुरोहित, पुढाऱ्याच्या रूपात आपल्यासाठी दाखल झाले आहेत.

# 7

[1] *मग शालेमाचा राजा मलकीसदेक, जो परमप्रधान परमेश्वराचा याजक आहे, त्याने अब्राहामाशी भेट घेतली व त्या समयी त्याला

---

आपल्याकडे परत आणतो. (वचन 20) धीर, विश्वास आणि परिश्रम या विषयी 11 आणि 12 वचनात सांगितल्यानंतर, तो अशा एका व्यक्तीचे उदाहरण देतो ज्याच्या जीवनात या गोष्टीं होत्या. शेवटी तो या गोष्टींना सर्व विश्वासीं लोकांवर लागू करतो.

* **6:13-15** अब्राहाम सर्व इब्रियांचा पूर्वज होता रोम 4:11,16 यानुसार तो सर्व विश्वास करणाऱ्यांचा पिता आहे. 11:18-19यात अब्राहामाच्या विश्वासाचे वर्णन आहे. विश्वास व धीर याचा उत्तम नमूना म्हणजे अब्राहाम.

* **6:16-18**

* **6:17** *“प्रतिज्ञेचे”*- उत्प 22:16-18 जर मनुष्य सत्य बोलण्याची शपथ वाहतो तर त्याच्यापासून काय अपेक्षी केली जावी? परमेश्वराकडे, मनुष्य यांहून अधिक काय अपेक्षा करू शकतो? शपथ वाहून मनुष्य खोटे बोलू शकतो पण परमेश्वर नाही. (तीताला 1:2) जर परमेश्वरबाप काही करण्याची शपथ वाहतो तर अगदी त्याचप्रमाणे करतो.

* **6:18** *“दोन न बदलणाऱ्या गोष्टींमुळें”*- (वचन 18) परमेश्वराची प्रतिज्ञा/करार आणि शपथ या दोन्ही गोष्टी विश्वासीला प्रोत्साहन देणाऱ्या आहेत. विश्वासींने शरणार्थी म्हणून या खालील गोष्टीपासून दूर पळावे: आहेत. अपराधांपासून, अपराधांमुळे परमेश्वरबापाला येणाऱ्या क्रोधापासून बचाव करून, पवित्र जगासाठी स्वत:ला वेगळे ठेवण्याचा प्रयत्न (गण 35:9-29शी तुलना करा) करावा. त्यांनी परमेश्वराच्या अनंत तारणाच्या प्रतिज्ञेला घट्ट पकडून घ्यावे.

* *“शरण”*-स्तो 7:1; 18:2; 19:2.

* **6:19-20** ज्या आशेविषयी बायबल सांगते, ती निर्बळ, अशक्त, कमकुवत किंवा डगमगणारी नाही. ही आशा मजबूत व सुरक्षित नांगर आहे. ही कधीच न हलणारी आहे (रोम 5:2-5). नांगर जहाजाला समुद्रात एकाच ठिकाणी स्थिर ठेवते, त्याचप्रमाणे आशेमुळे विश्वासी एकेठिकाणी स्थिर राहतो (स्वर्ग जेथे ख्रिस्त आहे). तेथे विश्वास त्यागाचे कोणत्याही प्रकारचे तूफानी-वादळ आले तरी विश्वासीं कधीच नाश होणार नाहीत.

* *“पडद्याच्या”*- 10:19-20; मत्त 27:51परमेश्वरास भेटण्यासाठी केलेला दर्शन - तंबू आणि भवन, दोन्हींमध्ये पवित्र आणि महापवित्र स्थानाचे विभाजन पडद्याद्वारे केले गेले होते. महापवित्र स्थान स्वर्गाकडे संकेत करते. त्या विश्वासींनी तेथे प्रवेश केलेला नव्हता पण येशूंनी केला होता. विश्वास व आशेद्वारे ते सदासर्वदासाठी त्यांच्याशी बांधलेले होते. येशू त्यांच्यासमोर आणि त्यांच्यासाठी तेथे आहेत. 4:44; 9:24; इफि 2:6; कल 3:3-14. येशू तेथे आहेत आणि आम्हांला पण ते तेथेच पोहचवतील.

* **7:1-3** मलकीसेदेक ख्रिस्ताचा एक प्रकार आहे किंवा त्यांच्यासारखा आहे, जो राजा आणि याजक या दोन्ही प्रकारच्या रूपात होता. 5:6,10; 6:2.बायबलच्या इतिहासात मलकीसेदेक केवळ एकदांच प्रगट होतो - उत्प 14:19-20.नव्या करारात, इब्रीकरास पत्र यात एकदां आणखी त्याच्याविषयी वाचण्यापूर्वी, स्तो 110:4यात त्याचे वर्णन आहे. म्हणून पुष्कळ लोकांचा विचार आहे की तो ख्रिस्तच होता. पण जर मलकीसेदेक कनान मध्ये शालेमाचा एक राजा होता तर तो ख्रिस्त असूं शकत नाही. लेखक येथे म्हणतो की तो परमेश्वराच्या पुत्रासारखा होता, परंतु परमेश्वराचा पुत्र नव्हता. याचा अर्थ काय आहे की त्याचे आईवडील नव्हते? कदाचित याचा अर्थ असा आहे की बायबलमध्ये, यासंबंधी काहीच माहिती नाही. आपल्याला त्याचे आईवडील, वंशावळी-जन्म-मृत्यू याविषयी काहीच ठाऊक नाही. अचानकच तो बायबलमध्ये प्रगट होतो आणि सदैव एक राजा-याजकाच्या रूपात ख्रिस्तांकडे संकेत करतो. ख्रिस्त नीतिमत्वाचे राजे, शांतिचे राजे आहेत जे अब्राहामापेक्षा श्रेष्ठ आहेत; ज्यांची उत्पत्ति नाही किंवा शेवटही नाही (1:2-3,8,10-12) आणि ते सदासदाकाळासाठी मध्यस्थ आहेत (5:6).

आशीर्वाद दिला. जेव्हा अब्राहाम राजांना ठार मारून परत येत होता तेव्हा असे झाले होते. 2 या याजकालाच अब्राहामाने सर्व
पदार्थांचा दशमांश सुद्धा दिला. हा प्रथम, आपल्या नांवार्थानुसार नितीमत्वाचा राजा, 3 व नंतर शालेम अर्थात शांतीचा राजा आहे.
त्याचे आईवडील, वंशावळ व अंत नाहीये, तरीही परमेश्वराच्या पुत्रस्वरूपात ठरविला गेल्यामुळे तो निरंतर पुरोहित रहातो.
4 [*]कुलपति अब्राहामाने ज्याला सर्वोत्तम लुटीच्या पदार्थांचा दशमांश दिला, तो किती महान होता याकडे लक्ष पुरवा. 5 लेवीच्या[*]
संतानांपैकी ज्यांना याजकपण मिळते, त्यांना अशी आज्ञा मिळाली होती: लोकांपासून अर्थात आपल्या भावांपासून, जरी ते
अब्राहामाच्या देहाद्वारे जन्मले होते, त्यांनी नियमशास्त्राप्रमाणे त्यांच्याकडून दशमांश घ्यावा. 6 आणि जो त्यांच्या वशांवळीचा सुद्धा
नव्हता त्याने, त्या अब्राहामापासून दशमांश[*] घेतला ज्याला प्रतिज्ञा मिळाल्या होत्या, व त्यास आशीर्वाद दिला. 7 शंका करण्याचे
कारण नाहीच मुळी की लहान, मोठ्यापासून आशीर्वाद मिळवीत असतो. 8 [*]एकीकडे येथे[*], मरणशील मनुष्य दशमांश घेतात, पण
दुसरीकडे तेथे, तोच दशमांश घेतो ज्याची अशी साक्ष दिली जाते की तो जिवंत आहे. 9 [*]तर मग असेही म्हणता येईल, की लेवीही जो
दहावा अंश घेत असतो त्याने अब्राहामाद्वारे दशमांश दिलाच. 10 कारण ज्या समयी मलकीसदेकाने लेवीच्या पित्याची भेट घातली
त्या समयी तो आपल्या पित्याच्या देहाठायी होता.
11 [*]मग जर, लेवीय याजकपणाच्या पदाद्वारे सिद्धता[*] असू शकते (ज्या आधारे लोकांना नियमशास्त्र मिळाले) तर मग,
मलकीसदेकाच्या रीतिप्रमाणे दुसरा याजक उभा होणे, व अहरोनाच्या रीतिचा म्हणविलेला नसणे, या सर्व बाबींची गरजच काय
होती? 12 [*]कारण ज्याअर्थी पुरोहितपण बदलेले गेले त्याअर्थी नियमशास्त्राचे बदलणेही अगत्याचे आहेच. 13 ज्याच्याविषयी अशा
गोष्टी म्हटल्या जातात, “तो अशा (दुसऱ्या) गोत्राचा आहे, ज्यांच्यापैकी कोणीही वेदीची सेवा केलेली नव्हती!” 14 तर स्पष्ट आहे
की आपले प्रभू येशू यहूदाच्या[*] वंशातून उदयास आले आहेत, व या वंशाची मोशेने पुरोहितपणासंबंधी काहीच चर्चा (उल्लेख) केली
नव्हती.
15 [*]ही गोष्ट अधिक ठळकपणे स्पष्ट होत जाते, कारण मलकीसदेकासारखा आणखी एक पुरोहित उत्पन्न होणार होता; 16 जो

---

[*]**7:4-10** लेखक मलकीसेदेकाची महानता दाखवतो, तो अब्राहामापेक्षा श्रेष्ठ होता (4-8), लेवीहून श्रेष्ठ (19,20). याचा अर्थ हा झाला की पदात सर्वोच्च. येशूंचे याजकपण लेवी गोत्राच्या याजकपणापेक्षाही सर्वश्रेष्ठ आहे, हेच समजवण्याचा त्याचा हेतू आहे.

[*]**7:5** *“लेवीच्या”*- इस्त्राएलाच्या तो एक गोत्र/वंश आहे, ज्याच्या अंतर्गत जुन्या कराराचे सर्व याजक आहेत. (गण 1:48-53; 3:5-10)

[*]**7:6** *“दशमांश”*- लेवी 27:30; गण 18:24-28.

[*]**7:8** ज्याची वंशावळी काय आहे, याचे काहीच ज्ञान नाही-मलकीसेदेक.

[*] *“येथे”*याजक लेवी वंशातील आहे.

[*]**7:9-10** लेवी व जे लोक त्याच्या गोत्रातून अब्राहामातून निघाले, त्या सर्व लोकांपेक्षाही,मलकीसेदेक श्रेष्ठ होता. तो सर्वोच्च पदावर होता. अब्राहामाद्वारे मलकीसेदेकास दशमांश दिल्या जाण्याच्या 120 वर्षानंतर लेवी उत्पन्न झाला होता.

[*]**7:11-19** या अध्यायाचा उरलेला भाग आणि 10:18 पर्यंत लेखक दाखवतो की याजकाच्या रूपात ख्रिस्त लेवीच्या गोत्रातील मध्यस्थापेक्षा किती अधिक श्रेष्ठ आहेत. जुन्या काळातील मध्यस्थ, पूर्ण रूपाने अपूर्ण असे होते. जर या जुन्या मध्यस्थांद्वारे, परमेश्वरास जे हवे होते, ते सर्व काही प्राप्त करता आले असते तर मलकीसेदेकाच्या क्रमानुसार, एका दुसऱ्या मध्यस्थाची आवश्यकता पडली(भासली) नसती.

[*]**7:11** *“सिद्धता”*- 10:4 लेवीच्या गोत्रातील याजकपणा मानवाचे अपराध समाप्त करू शकला नाही, हृदय किंवा अंतःकरणाचे परिवर्तन करू शकला नाही आणि मानवाला स्वर्गात राहण्यायोग्य, जाण्यायोग्य तयार करु (बनवू) शकला नाही.

[*]**7:12** नियमशास्त्र आणि जुन्या कराराचे याजकपण, एक दुसऱ्यांशी बांधलेले असे होते. एकाच्या अयशस्वीतेमुळे सर्व काही अयशस्वी झाले आणि जुना करार (अध्याय 8) सुद्धा; आणि म्हणून परमेश्वरबापाने ते वेगळे केले, एकमेकांपासून दूर केले आणि एक अद्‌भुत व नवीन सत्य समोर ठेवले.

[*]**7:14** *“यहूदाच्या”*- येशू यहूदा वंशातून होते (मत्त 1:1,3-6,16) जर येशूंनी प्रयत्न केला असता, इच्छा केली असती, तर पृथ्वीवरच्या त्यांच्या जीवनकाळात प्रार्थनाभवनाच्या प्रशासनाने, त्यांना पवित्रस्थानात प्रवेशही करू दिला नसता किंवा वेदीसमोर सेवेची संधिपण दिली नसती (8:4; गण 3:10).

[*]**7:15-17** लेखक म्हणतो की याजकपण आणि नियमशास्त्र यात एक परिवर्तन आलेले आहे - वचन 12. हे स्पष्ट आहे की यहूदा गोत्राला परमेश्वरपित्याने प्रधान याजकपणाच्यापदावर नेमले /ठरवले, परंतु त्याचा आधार मात्र नवीन होता. जुन्या कराराचे याजकपण त्याच्या वंशावळीच्या आधारानुसार निवडले गेलेले नव्हते, अवश्य होते की ते लेवी आणि अहरोनाचे वंशज असावयास हवे होते, परंतु परमेश्वरबापाने ख्रिस्तांना त्यांच्या कधी न संपणाऱ्या जीवनाच्या आधारे निवडले. वचन 16,24.

शारीरिक आज्ञेच्या प्रबंधानुसार नव्हे, परंतु अविनाशी जीवनाच्या शक्तीनुसार नियुक्त केला गेला, तर यावरून आमचा दावा
आणखी भक्कम व अधिक स्पष्टपणे प्रगट झाला; [17] *कारण त्याच्याविषयी अशी साक्ष दिली गेली, ‘तू मलकीसदेकासारखाच
युगानुयुगाचा पुरोहित आहेस.’
[18] पहिली आज्ञा कमजोर व निष्फळ झाल्यामुळे ती संपली. [19] कारण यहूदी नियमांन्वये कोणत्याही गोष्टीस सिद्धत्व प्रदान झालेले
नव्हते; परंतु त्यांच्या स्थानी आता एक उत्तम आशा*, कायमची मिळालेली आहे जिच्याद्वारे आपण परमेश्वराजवळ जाऊ शकतो.
[20] *आणि यासाठी की येशू शपथेवांचून पुरोहित नेमले गेले नाहीत, [21] येशू शपथेवांचून नेमलेले पुरोहित आहेत व ज्याने येशूंविषयी
अशी शपथ वाहिली की, “तू युगानुयुगाचा पुरोहित आहेस”, तो परमेश्वर त्याने वाहिलेली ही शपथ पुन्हा कधी कधीच बदलणार
नाहीये. [22] म्हणूनच येशू एका उत्तम कराराचे जामीन झाले आहेत*.
[23] *अनेक पुरोहित (याजक) होत राहिले होते, कारण मरण त्यांना निरंतरचा याजक म्हणून राहू देत नव्हते. [24] पण हा तर
युगानुयुगाचा आहे, म्हणून येशूंचे याजकपण अबाधित (जसेच्या तसे) व अढळ आहे. [25] यास्तव जे लोक त्यांच्याद्वारे परमेश्वराकडे
येतात, त्यांचा येशू संपूर्णपणे उद्धार* करू शकतात, कारण विश्वासींखातर विनंती करण्याकरता, येशू सर्वदा जिवंत आहेत.
[26] *आपणास असाच महायाजक लाभणे योग्य होते, कारण आपले महायाजक येशू, पवित्र, निष्कपट, निर्मळ, अपराधी
लोकांपासून वेगळे व स्वर्गाहूनही उंच केले गेलेले* असे आहेत; [27] आधीच्या महायाजकांप्रमाणे*, येशूंस प्रथम स्वतःच्या
अपराधांकरता व नंतर लोकांच्या अपराधांखातर दररोज अर्पणें सादर करीत जाण्याची गरज नाहीये, कारण त्यांनी आपल्या स्वतःस

---

*__7:17__ लेखक हे शिकवीत आहे की स्तो 110:4ची भविष्यवाणी ही संपूर्ण जुना करार, याजकपण आणि नियमशास्त्र वेगळे ठेवण्यासंबंधी आहे.

*__7:19__ *“एक उत्तम आशा”*- याचा संबंध ख्रिस्तांच्या याजकपणाशी आहे. आपल्याप्रत त्यांच्या कार्याद्वारे आपण परमेश्वराजवळ येऊ शकतो -10:19-22.

*__7:20-22__ ख्रिस्तांचे याजकपण लेवीच्या वंशजांच्या याजकपणापेक्षा सर्वश्रेष्ठ आहे; याचे आणखी एक कारण लेखक सांगतो. जेव्हा परमेश्वराने ख्रिस्त येशूंना प्रमुख महाजकपण दिले तेव्हा त्याने गंभीरतेने ही शपथ वाहिली की येशूच याजक असतील. लेवीच्या वंशातील याजकांच्या संदर्भात अशी कोणतीच गोष्ट नव्हती (6:11). यहूदी आणि आपण सर्वांनी ख्रिस्तांच्या याजकपणाविषयी पूर्णपणे आश्वस्त असावे अशी त्याची इच्छा होती. मानवाच्या मुक्तीसाठी याजकपण हे एका पायासारखे आहे.

*__7:22__ *“एका उत्तम कराराचे जामीन झाले आहेत”*- वचन 22 या विषयी आपण 8:6-13यात वाचतो.

*__7:23-25__ ख्रिस्त जुन्या करारातील याजकांपेक्षा श्रेष्ठ व उत्तम याजक होण्याचे येथे आणखी एक कारण आहे. ख्रिस्तांचे याजक होणे स्थायी आहे, पण त्या लोकांचे नव्हते. इस्त्राएलाचे प्रत्येक मुख्य याजक पद दुसऱ्यासाठी सोडले जात असे, अहरोन आणि 70 इ.स. दरम्यान (जेव्हा मंदिर तोडले गेले) 80 पेक्षा जास्त याजक होऊन गेले होते. येशू जिवंत आहेत आणि सदाकाळासाठी आपले कार्य कायम चालू ठेवतील. परिणामस्वरूप ते आपल्या लोकांना सर्वदाच वाचवण्यास योग्य असे आहेत.

*__7:25__ *“संपूर्णपणे उद्धार”*- याचा अर्थ सर्वकाळासाठी असा देखील होऊ शकतो. येशू लोकांना पूर्ण रीतिने आणि नेहमीसाठी वाचवतात. “कारण”- ख्रिस्तांच्या मध्यस्थी संबंधी : लोकांचे ख्रिस्तांद्वारे पूर्ण रीतिने आणि सर्वदा वाचवले जाणे व लोकांसाठी ख्रिस्तांची मध्यस्थता, या दोन्ही गोष्टींचा संबंध येशूंच्या मध्यस्थीशी संबंधित आहे. पाहा 9:24; 1 योहान 2:1; रोम 8:34.ख्रिस्त येशूंचे विश्वासीं, स्वर्गातील त्यांच्या जीवनाद्वारे तारणाच्या स्थितीत ठेवले जातात. रोम 5:9-10त्यांच्या लोकांसाठी त्यांच्या प्रार्थना कशा प्रकारच्या होत्या, त्याचे उदाहरण येशूंनी त्या वेळी दिले जेव्हा ते या पृथ्वीवर होते: योहान 17; लूक 22:32.ते सर्व विश्वासींना गौरवात आणण्यास योग्य आहेत, कारण ते स्वर्गात मध्यस्थी करणारे याजकपदासाठी तयार केले गेलेले सर्वात मोठे महायाजक आहेत (2:10). परीक्षेत लोकांचे मदतगार आहेत (2:18; 4:16). शेवटपर्यंत विश्वासात दृढ ठेवण्यास मदत करतात (3:6,14; 10:39)

*__7:26-28__ लेखक या गोष्टीचे कारण सांगतो की ख्रिस्तांचे मध्यस्थ असणे, जुन्या कराराच्या याजकांपेक्षा श्रेष्ठ व योग्य का आहे: ख्रिस्त स्वतःच त्या सर्व याजकांहून श्रेष्ठ आहेत. ते आमची वास्तविक गरज भागवतात. दुसरे असे करू शकले नसते. ते पूर्णतः पवित्र आहेत, परंतु दुसरे अपराधी असल्यामुळे त्यांना आपल्या अपराधांसाठी देखील बलिदान अर्पण करावे लागत होते व लोकांसाठी वारंवार बलिदान अर्पण करावे लागत होते. आपल्या बलिदानांद्वारे येशूंनी सदासदासाठी त्यांचे अपराध दूर करून दिलेले आहेत. याजक दुर्बळ लोक होते, परंतु येशू परमेश्वर आहेत, जे शरीर रूपात आले.

* *“स्वर्गाहूनही उंच केले गेले”*- 1:3; 8:1 ही गोष्ट दुसऱ्या महायाजकांच्या विषयी खरी नव्हती.

*__7:27__ *“महायाजकांप्रमाणे”*- या पृथ्वीवर ते अपराधी जनांसोबत राहिले, भोजन केले, त्यांना स्वीकारले, त्यांचे मित्र झाले, त्यांना प्रेम दिले, त्यांच्यासाठी अपराध झाले आणि मरण सोसले - मत्त 11:29; लूक 15:2; रोम 5:8; 2 करिं 5:21; 1 पेत्र 3:18.परंतु चारित्र्यात ते त्यांच्यापेक्षा वेगळे होते. लोकांचे अपराध त्यांना अशुद्ध करू शकले नाही कारण येशू निरअपराध होते.

बलिदान अर्पण म्हणून एकदांच अर्पून, आधीच्या ‘त्या सर्व बलिदानांचा कायमचा नीटसा निकाल लावून टाकला आहे*.’
28 नियमशास्त्र दुर्बल मनुष्यास मुख्ययाजक म्हणून नेमते; पण आता मात्र शपथेचे* वचन जे नियमशास्त्रानंतर* वाहिले गेले, ते पुत्राची
नियुक्ती करते. होय, असे महायाजकपण जे युगानुयुगासाठी सिद्ध करण्यात आलेले आहे.

# 8

1 **आता ज्याविषयी आम्ही सांगत आहोत, त्यांत सर्वांत विशेष गोष्ट अशी: आपला असा महायाजक आहे, जो स्वर्गात
महामहिम आणि राजवैभवाच्या राजासनावर, अधिकार व प्रभूत्वांसह 2 आणि पवित्रस्थान व खऱ्या तंबूचा* सेवक झाला, जो
मनुष्याने नव्हे तर परमेश्वराने उभारलेला आहे.
3 *प्रत्येक मुख्ययाजक दान व बलिदान अर्पण करण्यासाठी नेमला जातो, म्हणून त्याच्याकडेही अर्पावयास काही तरी जवळ
असणे आवश्यक आहेच. 4 जर तो पृथ्वीवर असता, तर कधी याजक राहिलाच नसता. नियमशास्त्रानुसार दानें अर्पण करणारे
आहेतच, 5 *जे स्वर्गातील वस्तूंच्या प्रतिरूपांची व प्रतिबिंबांची सेवा करतात; जसे जेव्हा मोशे तंबू उभारणार होता तेव्हा त्यास अशी
चेतावणी मिळाली, ‘की लक्ष दे! जो नमूना पर्वतावर तुला दाखविला होता, त्याप्रमाणेच सर्व काही कर.’
6 *येशूंना तर मोशेहूनही आणखी अधिक श्रेष्ठ सेवा मिळाली आहे, कारण येशू सर्वोत्तम कराराचे मध्यस्थ* ठरले, जो सर्वोत्कृष्ट

---

* *“बलिदान अर्पण...आहे”*- कोणत्याही अन्य याजकांविषयी ते सत्य नव्हते - वचन 19.

* **7:28** *“शपथेचे”*- वचन 20-22.

* *“नियमशास्त्रानंतर”*- नियमशास्त्र आणि जुन्या करारातील याजकपण कमजोर, दुर्बळ व प्रभावहीन असे राहिलेले होते, म्हणून परमेश्वराने दुसरा प्रकार स्थापित केला.

* **8:1-13** लेखक पुढे त्याचे म्हणणे चालू ठेवून म्हणतो की ख्रिस्तांचे याजकपण जुन्या कराराच्या याजकपणापेक्षा श्रेष्ठ आहे (सर्व प्रकारच्या याजकपणापेक्षा देखील). हे सर्वश्रेष्ठ असण्याचे कारण हेच आहे की, स्वर्गात परमेश्वराच्या खऱ्या स्थानी ते याजकाच्या रूपात सेवा करतात, परंतु जुन्या कराराचे सर्व याजक, पृथ्वीच्या मंदिरात सेवा करायचे, जे स्वर्गीक स्थानाचे एक लहानसे चित्र आहे. वचन 1-5. हे याजकपण यासाठीही श्रेष्ठ आहे कारण हे जुन्या करारापेक्षा उत्तम व नव्या कराराशी जुळलेले आहे. वचन 6:13.

* **8:1** 1:3; 7:26 पाहा

* **8:2** *“खऱ्या तंबूचा”*- 9:1-11; प्रकटी 7:15; 11:19; 13:6; 14:15; 15:5-6; 16:1;निर्गम अध्याय 25-30 यात वर्णिलेल्या जुन्या कराराच्या तंबूच्या तुलनेत, परमेश्वराचा आत्मिक स्वर्गीक तंबू खोटा नव्हता, परंतु हा 'सत्य'म्हणवला गेला. जुन्या कराराचा तंबू, स्वर्गीक तंबूचे एक चित्र आहे. वचन 5; 9:23-24; 10:1; निर्ग 25:9पाहा (असे प्रतित होते की हा स्वर्गीक तंबू पृथ्वीपर्यंत पसरलेला आहे. केवळ महापवित्र स्थान जे की परमेश्वराच्या उपस्थितीत आहे, ते स्वर्गात आहे). पितळेची वेदी निर्ग 27:1-8 जेथे ख्रिस्त बलिदान झाले होते, ते कालवरीचे एक चित्र आहे, स्वर्गीक तंबूचा हौद या पृथ्वीवर आहे, ज्याठिकाणी ख्रिस्ती विश्वासीं, स्वतःला धुतात, स्वच्छ होतात. निर्ग 30:17,21शी तुलना करा. पृथ्वीवर असलेले पवित्र स्थान म्हणजे ख्रिस्तांचे चर्च होय. तुलना करा - निर्ग 25:31-40; प्रकटी 1:12-13; 2:1; निर्ग 30 अध्यायाच्या शेवटी दिलेली टीप पाहा.

* **8:3** पाहा 5:1हा मनुष्य- प्रभू येशू, त्यांना आपले रक्त व आपल्या स्वतःला द्यावयाचे होते 7:27; 9:14.

* **8:5** वचन 2 त्याला सावधगिरी ठेवण्याची ताकीद मिळाली - निर्ग 25:8-9,40; 26:30; 27:8.परमेश्वरबापाने उगीच/ व्यर्थ, चार वेळी ही आज्ञा केली नव्हती. पार्थिव तंबूने, स्वर्गीक सत्य दर्शवावे ही त्याची इच्छा होती. त्याने दिलेल्या तंबूचा नमूना सोडून इतर वेगळा तंबू तयार करून, सत्यापासून भटकून जावे ही परमेश्वरबापाची अजिबात इच्छा नव्हती.

* **8:6** लेखक मोशेद्वारे दिलेल्या कराराची तुलना - येशूंद्वारे स्थापित कराराशी करीत आहे. तो 10:18पर्यंत सुरूच ठेवतो. निर्ग 19:5-6,21-25यात जुना करार आणि यिर्म 31:31-34; मत्त 26:28यात नव्या कराराची टीप पाहा. 2 करिं 3:6-18यात जुना व नवा करार यातील तुलना पाहा. मानवाच्या मुक्तीसाठी जुना करार जे काही करू शकला नव्हता, ते सर्व नव्या कराराने केलेले होते. कारण नवा करार, जुन्या करारापेक्षा श्रेष्ठ आहे. एक करार म्हणजे दोन पक्षांमधील सहमति किंवा एकमेकांशी केली गेलेली प्रतिज्ञा आहे. जुन्या करारात इस्त्राएली लोकांना, परमेश्वराकडून ही प्रतिज्ञा प्राप्त झाली होती, की जर त्यांनी नियमशास्त्राचे (नियम, निर्देश) पालन केले, तर त्यांना आशीर्वाद प्राप्त होतील; नव्या करारात परमेश्वरपिता, अपराधांची क्षमा, एक नवे अंतःकरण आणि परमेश्वराच्या ज्ञानाची प्रतिज्ञा करतो व वचन देतो, ते ज्ञान जे अनंत/सार्वकालिक जीवन प्रदान करते त्यावर माणसाला हृदय परिवर्तन करून विश्वास ठेवायचा आहे.

* *“सर्वोत्तम कराराचे मध्यस्थ”*- वचन 10-12 ख्रिस्त नव्या कराराचे ‘मध्यस्थ’ आहेत. 9:15; 12:24.येशूंद्वारे परमेश्वराने नवा करार

प्रतिज्ञांवर आधारलेला आहे, त्या करारान्वये परमेश्वरी प्रतिज्ञा नीटशी बांधली गेली आहे. 7 *कारण पहिला करार जर उणीवा
नसलेला व निर्दोष असता, तर दुसऱ्यासाठी मोका शोधलाच गेला नसता. 8 *परंतु तो त्यांच्यावर दोष लावून म्हणतो, की प्रभू
म्हणतो, “पहा, असे दिवस येत आहेत जेव्हा मी इस्राएलाचे व यहूदाचे घराणे यांच्याबरोबर नवा करार करीन; 9 हा करार त्यासारखा
नसणार, जो त्यांच्या पूर्वजांशी त्या वेळी केला होता, ज्या वेळी त्यांचा हात धरून मी त्यांना मिसर देशातून बाहेर आणले. ते माझ्या
करारावर स्थिर राहिले नव्हते.* म्हणून मीही त्यांच्याकडे दुर्लक्ष केले; 10 *पुन्हा प्रभू म्हणतो, की जो करार त्या दिवसांनंतर
इस्राएलाच्या घराण्याशी मी करीन, तो असा: मी आपले नियम त्यांच्या अंतःकरणी घालीन, त्यांच्या आत्म्यांवर लिहीन, मी त्यांचा
परमेश्वर होईन व ते माझे लोक.* (प्रजा) असे होतील; 11 त्या समयी देशातील नागरिकांस व आपल्या भावास अशी शिकवण दिली
जाणार नाही, की तुम्ही परमेश्वरास ओळखा. असे यास्तव होईल कारण लहानांपासून - थोरांपर्यंत सगळे जण मला ओळखतील.*.
12 *त्यांच्या दुष्टाईविषयी मी क्षमाशील व दयावंत होईन, इतकेच काय मी त्यांचे अपराध पुन्हा कधीच स्मरण करणार नाही, .”
13 नवीन कराराच्या स्थापनेमुळे पहिला करार रद्द केला.*, जी वस्तु जुनी-जीर्ण-कमजोर होत जाते, तिचे नाहीसे होणे नितांत
आवश्यक आहे.

# 9

1 *त्या पहिल्या करारात सेवेचे नियम होते व असे पवित्रस्थानही.* जे या पृथ्वीवरचे होते, 2 *ज्यात एक तंबू होता, ज्यात आधी

---

स्थापित केला आणि त्यांच्याचद्वारे तो करार प्रभावशाली असा ठरला.

***8:7*** जुन्या कराराची समस्या काय होती? लोक अपराधी (श्रेष्ठ) होते आणि परमेश्वराच्या नियमांचे पालन करू पाहत नव्हते, म्हणून आशीर्वाद नाही पण दंड त्यांच्या जीवनात आला - रोम 8:3; गल 3:10-13.

***8:8-12*** यिर्म 31:31-34ची टीप पाहा.

***8:9*** *“ते माझ्या ..... राहिले नव्हते”*- संपूर्ण समस्या हीच तर होती. नियमशास्त्राचा जुना करार, लोकांना केवळ हेच दाखवू शकला की त्यांनी काय करावे आणि कसे असावे? परंतु नियमशास्त्र त्यांना तसे करण्यात किंवा तसे बनवण्यात मदत करू शकला नाही. निर्गमन ते मलाखीपर्यंतचा जुन्या कराराचा इतिहास इस्त्राएलाच्या विश्वासहीनतेची एक साक्ष आहे.

***8:10*** येथे परमेश्वर आपल्या लोकांना नवे आणि उत्तम व वेगळे करण्याचे वचन देतो, एक अशा प्रकारचे नवे मन आणि हृदय देण्याची प्रतिज्ञा करतो, जे परमेश्वराच्या आज्ञांचे पालन करील (तुलना करा योहान 1:12-13; 3:3-8; रोम 8:3-4; 2 करिं 5:17; 1 पेत्र 1:23).

* *“माझे लोक”*- 2 करिं 6:16-18; 1 पेत्र 2:9-10.

***8:11*** *“सगळे जण मला ओळखतील”*- मत्त 11:27; योहान 14:7,17; 17:3,6; 2 करिं 4:6.नवा करार परमेश्वरपित्याच्या ज्ञानाचे वचन देतो आणि ते सर्व काही देतो, ज्याची प्रतिज्ञा केली गेलेली आहे. हे केवळ सृष्टीकर्ता पित्यासंबंधी जाणणे नव्हे, तर सरळ अनुभव केले जाणारे एक आत्मिक ज्ञानच आहे. इतर कोणताही दुसरा मार्ग, दर्शन शास्त्र, धार्मिक नियमशास्त्र हे ज्ञान पुरवू शकत नाही ज्ञान पुरवठा करू शकत नाही, किंवा उपलब्ध करू शकत नाही. 1 करिं 1:19-21; 2:7-16; कल 2:8ची टीप पाहा.

***8:12*** यश 44:22; मीखा 7:19; लूक 24:47; प्रेषि 13:38-39; रोम 4:6-8; 8:33. 8-12 वचनांत परमेश्वरबापाच्या वचनाकडे लक्ष द्या. “म्हणून असे होईल” . जुना करार हा लोकांच्या शब्दांवर निर्भर होता. 'आम्ही करू'- निर्ग 19:8; 24:7.याच कारणाने जुना करार कमजोर ठरतो आणि परिणामी अयशस्वी झाला, परंतु नवा करार सामर्थी असून यशस्वी सुद्धा होईल.

***8:13*** *“पहिला करार रद्द केला”*- उपयोगात न येणारे म्हणजेच निरूपयोगी आणि अस्वीकृत ठरले. मोशेद्वारे दिले गेलेल्या नियमांचा, परमेश्वराच्या दृष्टीने अंत येऊन ठेपला होता आणि याच्याबरोबरच जुन्या याजकपणाचाही शेवट येऊन पोहचला होता. “नाहीसे होणे ...... आहे”- यरूशलेमेत प्रार्थनाभवन होते आणि याजक आपल्या कामांत लागलेले होते. हे सर्व इ.स.70 यात समाप्त झाले. मत्त 24:1-2आणि लूक 19:41-44पाहा. त्या समयापासूनच यरूशलेमेत कोणतेही प्रार्थनाभवन नाही आणि यहूदी प्रबंधानुसार याजकांचे कार्य देखील नाही.

***9:1*** या अध्यायात लेखक जुन्या प्रबंधातील याजकपण व नव्या करारातील याजकपणाची तुलना करतो. तो जुना तंबू आणि तेथील याजकांच्या सेवेविषयी म्हणतो. वचन 1-7 यात. तो सेवा व आराधना याद्वारे काय दर्शविले जाते हे देखील सांगतो - वचन 8-10. त्यानंतर तो स्वर्गीक तंबू व त्यात प्रवेश आणि याजकाच्या रूपात येशूंच्या बलिदानाविषयी पण सांगतो - वचन 11-20.

* *“पवित्रस्थानही”*- निर्ग 25:8पाहा.

***9:2*** निर्ग 25:40तंबू व त्याचे अनेक भाग या सेवेशी संबंधित आहेत. जे स्थान याला प्राप्त झाले आहे त्याद्वारे लेखक दाखवतो की,

दीपवृक्ष* व नंतर मेज* आणि समर्पित भाकरी होत्या, त्यास पवित्रस्थान म्हटले जाई. 3 पडद्याच्या मागे दुसरा तंबू* होता, ज्यास
परमपवित्रस्थान म्हटले जात होते. 4 त्यात सोन्याची धूपदाणी* आणि चारीबाजूंनी सोन्याने मढविलेला कराराचा संदूक (कोश)*
होता. कोशात मान्ना* भरलेले सोनेरी पात्र आणि अहरोनाची काठी* होती, त्यासोबतच कराराच्या पाटया* होत्या. 5 कोशावर दोन
तेजोमय गौरवी* करूबीम* होते, जे प्रायश्चित्ताच्या दयासनावर (झाकण) छाया करीत होते, या सर्वांविषयी एक एक करून वर्णन
करण्याची गरज नाहीये.
6 जेव्हा या सर्व वस्तूंची तयारी झाली, तेव्हा पहिल्या तंबूत* याजक कधीही प्रवेश करून सेवाकार्य नित्य करीत असे; 7 परंतु
दुसऱ्यात* केवळ प्रमुखयाजक वर्षांतून फक्त एकदांच जाई, त्या समयी तो रक्त घेऊन जाई जे तो स्वतःसाठी व लोकांच्या
अज्ञानाद्वारे* झालेल्या चुकांसाठी अर्पण करीत असे. 8 पवित्रात्मा* याद्वारे असे दर्शवितो, की जोवर पहिला तंबू व ते सर्व काही जे
तो दर्शवीत उभा आहे, तोवर महापवित्रस्थानी तो प्रवेश करू शकत नाही. 9 *हा तंबू वर्तमानकाळी एखाद्या दृष्टांतासारखा आहे,

---

परमेश्वरबापाच्या शिकवणीचे महत्व काय आहे. जवळजवळ 40 अध्याय या विषयावर दिले गेलेले आहेत. मनुष्य, पृथ्वी आणि स्वर्गातील सृष्टि या संबंधी फक्त दोनच अध्याय आहेत (जरी उत्पत्ति 1 व 2) यानंतर बायबलमध्ये सृष्टीच्या संदर्भात अनेकदां सांगितले गेले आहे. निर्ग 30 च्या शेवटी दिलेली टीप पाहा, की तंबूला आत्मिक अभ्यासासाठी कशा प्रकारे उपयोगात आणता येते.

* *"दीपवृक्ष"*- निर्ग 25:31-40.

* *"मेज"*- निर्ग 25:23-30.

* **9:3** *"दुसरा तंबू"*- निर्ग 26:31-35.पहिला तंबू पवित्रस्थान, बाहेरच्या आंगणापासून वेगळे करतो.

* **9:4** *"धूपदाणी"*- निर्ग 30:1-10.

* *"संदूक (कोश)"*- संदूक निर्ग 25:10-15.

* *"मान्ना"*- निर्ग 16:14-16,33.

* *"अहरोनाची काठी"*- गण 17:8-11.

* *"पाटया"*- गण 25:16.

* **9:5** *"तेजोमय गौरवी"*- निर्ग 40:34-35.

* *"करूबीम"*- निर्ग 25:17-22.

* **9:6** *"पहिल्या तंबूत"*- म्हणजे पवित्र स्थान - वचन 2. "सेवा"- निर्ग 27:21; 30:7-8; लेवी 24:5,9.

* **9:7** *"दुसऱ्यात"*- म्हणजे अति पवित्र स्थान - वचन 3. लेवी 16 अध्याय, याजकाने वर्षातून फक्त एकदांच केलेल्या कार्यांचा उल्लेख करतात. दोन्ही अध्याय नीट-स्पष्ट समजून घेण्यासाठी त्याचे एकत्र अध्ययन केले गेले पाहिजे.

* *"अज्ञानाद्वारे"*- असे अपराध जे परमेश्वरबापाला न ओळखल्यामुळे होतात, तसेच त्याची वैयक्तिक ओळख नसल्यामुळे जे लोक करतात, त्याविषयी लेखक सांगतो. तो यहूदी विद्वानांच्या अज्ञानामुळे किंवा अजाणपणे केलेल्या अपराधांविषयी बोलत नाही. (तुलना करा इफि 4:17-19). इस्त्राएलात मनबदलाच्या दिवशी सर्वच प्रकारचे अपराध, अशुद्धता, दुष्टता, विद्रोह यांची क्षमा मागण्याचा प्रबंध होता. लेवी 16:21-22,30,34.लक्ष द्या - या शब्दांकडे "अज्ञानाद्वारे झालेल्या चुकांसाठी"ft -लेवी 26 यात याजकाद्वारे चुकून किंवा अजाणपणे केल्या गेलेल्या अपराधांपर्यंतच क्षमा मर्यादीत नव्हती.

* **9:8** *"पवित्रात्मा"*- 3:7 (योहान 14:16-17). यात आपण लेखकाचा विश्वास पाहू शकतो की तंबू व प्रमुख याजकाच्या कार्याविषयी पवित्रात्म्याची प्रेरणेची भूमिका कशी होती. (2 तीम 3:16-17). त्याने इस्त्राएलाच्या मनबदलाच्या दिवसाविषयी काय शिकवले? हेच की परमेश्वराच्या उपस्थितीत पोहचण्याचा मार्ग आतापर्यंत जाहिर केला गेला नाही. जोपर्यंत तंबू उभारलेला होता तोपर्यंत प्रमुख याजकाशिवाय आणखी कोणी इस्त्राएली, महापवित्रस्थानात प्रवेश करू शकत नव्हता. महापवित्र स्थान, तंबूची ती जागा होती जेथे परमेश्वराची उपस्थिती होती. तंबू हे शिकवतो की परमेश्वराच्या उपस्थितीत जाण्यासाठी कोणकोणत्या बाधा आहेत, हे नव्हे की कशा प्रकारे त्यात प्रवेश केला जावा. (निर्ग 27:9-19). याचा अर्थ हा नव्हे की इस्त्राएलाचा कोणताही व्यक्ति तंबू सोडून, एखाद्या दुसऱ्यास्थानात, परमेश्वराच्या उपस्थितीत प्रवेश करू शकत नव्हता, नाही असे नाही. तुलना करा - उत्प 5:24; 6:9; 27:7; निर्ग 33:14; स्तो 51:11; 89:15.परंतु त्या युगात परमेश्वराने हे प्रगट केले नव्हते की ते कशा प्रकारे शक्य आहे, आता परमेश्वरपित्याने ते प्रगट केले आहे. गुन्हेगार पवित्र परमेश्वराच्या उपस्थितीत पूर्ण प्रकारे यासाठी येऊ शकतो कारण ख्रिस्तांनी त्याच्या अपराधांच्या क्षमेसाठी बलिदान केलेले होते - 10:19-20; 1 पेत्र 3:18.

* **9:9** जुन्या प्रबंधाचे बलिदान अपराधांची जाणीव आणि दंड दूर करण्यासाठी पर्याप्त नव्हते 10:2.जर विवेक शुद्ध नसेल तर परमेश्वराच्या उपस्थितीत 'शुद्ध विवेकांवाचून' जाणे होऊच शकत नाही. विवेक यासाठीचे नोट्स पाहा - प्रेषि 23:1.

जेथे अशी दानें व अर्पणें केली जातात ज्यान्वये आराधकांचे विवेक शुद्ध होऊ शकत नाहीत. 10 *कारण ते फक्त खाणेपिणे व
स्नानविधींच्या आधारे लावून दिलेले असे शारीरिक नियम आहेत, जे नव्या क्रमाच्या अर्थात नव्या कराराच्या काळापर्यंतचे होते.
11 **परंतु ज्या वेळी ख्रिस्त भविष्यकाळी येणाऱ्या उत्तमोत्तम वस्तूंचे प्रमुखयाजक होऊन आले, त्या वेळी अधिक भव्य व सिद्ध
तंबू जो हातांनी केलेला नाहीये व या दुनियेचाही नाहीये, 12 आणि जो बकरें व वासरें* यांच्या रक्ताद्वारे नाही, पण आपल्याच
रक्ताद्वारे* एकदांच आमच्यासाठी सार्वकालिक स्वातंत्र्य* मिळवून त्यांनी त्या सिद्ध तंबूत पवित्रस्थानी प्रवेश केला.
13 कारण जर बैल व बकऱ्यांचे रक्त आणि वासरांची* राख, अशुद्ध लोकांवर शिंपडल्यामुळे ते बाह्यरूपाने शुद्ध केले जातात,
14 तर मग ख्रिस्तांचे रक्त ज्यांनी सनातन आत्म्याद्वारे स्वतःस परमेश्वरासमोर निर्दोष* अर्पण म्हणून सादर केले, तुमचा विवेक*
मेलेल्या कार्यांपासून आम्हांला आणखी अधिक शुद्ध का करणार नाही? तेणेकरून आपण जिवंत परमेश्वराची सेवा करावी.
15 या कारणास्तव* येशू नव्या कराराचे मध्यस्थ* आहेत. 'मरणाद्वारे' पहिल्या कराराच्या* काळातील अपराधांपासून स्वातंत्र्य*,

---

***9:10*** भोजन इत्यादिंच्या संबंधात जुना करार (लेवी 11; निर्ग 6:15,17; 28:7-8; निर्ग 30:17-21; लेवी 16:24) यात आत्मिक सत्याचे प्रकार आणि त्यांची छाया होती. त्यांचे स्वतःचे काही महत्व नव्हते, परंतु त्या बाह्य रीतिविधि होत्या. परमेश्वरबापाने हे सर्व त्यांना नेहमीसाठी दिलेले नव्हते, परंतु सुधारणेच्या समयापर्यंत. ग्रीक शब्द 'सुधारणा' याच्या भाषांतराचा अर्थ आहे, सरळ केले जाणे. जोपर्यंत परमेश्वर एका नव्या क्रमाचा (ख्रिस्तांद्वारे स्थापित नवा करार) परिचय करून देत नाही, तोपर्यंत जुन्या कराराच्या रीति-विधि त्या वेळा पुरत्याच होत्या.

***9:11-28*** लेखक ख्रिस्तांचे प्रमुख याजक असण्याचा विषय धरून दाखवतो की जे काही जुन्या कराराच्या याजकाच्या रीति-विधि द्वारे केले जाऊ शकले नाही, ते सर्व कशा प्रकारे ख्रिस्त याजकाद्वारे केले गेले.

***9:11*** 8:2,5 पाहा

***9:12*** *"बकरें व वासरें"*- लेवी 16:14-15,27.

* *"आपल्याच रक्ताद्वारे"*- वचन 11-28 यात, रक्त शब्दाचा 11 वेळा प्रयोग केला गेला आहे. बलिदान आणि मृत्यू शब्दांचा अनेकदा उपयोग केला गेला आहे. हे शब्द रक्ताकडे इशारा करतात. लेखक दाखवतो की ख्रिस्तांचे रक्त (बलिदान व मृत्यू) किती महत्वपूर्ण आहे, कारण ते विश्वासींचा विवेक शुद्ध करते (वचन 14), (ख्रिस्त) ते त्याच्या सुटकेसाठी तारणाची किंमत ठरते (वचन 16), रक्त क्षमेचा फक्त एकच आधार होता (वचन 22). ते स्वर्गीक वस्तूंना शुद्ध करीत होते (वचन 23). आणि ते अपराधाला नष्ट करते (वचन 26 व 28).

* *"स्वातंत्र्य"*- वचन 15. स्तो 78:35; मत्त 20:28ची टीप पाहा. जी सुटका ख्रिस्तांनी विश्वासींसाठी मिळवली ती सनातन आहे. तुलना करा 5:9; 10:14.याचा परिणाम स्थायी आहे. येशूंनी त्यांना आपल्या रक्ताची किंमत देऊन विकत घेतले आहे आणि ते नेहमी त्यांचे आहेत. 1 पेत्र 1:18-19; 1 करिं 6:20; योहान 6:37; 17:6,11,12.

***9:13*** *"वासरांची"*- गणना अध्याय 19. अपराध-क्षमा किंवा मन शुद्ध करण्याविषयी (या प्रकारे) काही संबंध नव्हता.

* *"निर्दोष"*- 4:15; 7:26; 1 पेत्र 1:19; 2:22.

***9:14*** *"विवेक"*- विवेक मनुष्याचा तो भाग आहे जो त्याचे कार्य उचित-अनुचित, चांगले-वाईट ठरवतो. पाहा प्रेषि 23:1; 24:16; रोम 2:15; 9:1; 1 करिं 8:7; 10:28-29; 2 करिं 1:12; 1 तीम 1:5; 3:9; 4:2; तीताला 1:15.जर आपला विवेक अपराधांमुळे अशुद्ध झालेला आणि अपराधी आहे तर शुद्धतेची गरज आहे. हे जाणून घेणे आवश्यक आहे, की अपराध, दूर केले आहेत आणि आता परमेश्वरबापाचा न्याय किंवा दंड येण्याचे कोणतेच कारण राहिलेले नाही. हेच कार्य ख्रिस्तांचे रक्त करते. ख्रिस्तांच्या बलिदानाविषयीचे आपले ज्ञान आणि असा विश्वास की त्यांचे रक्त आमचे अपराध नष्ट करण्यासाठी, दूर करण्यासाठी वाहिले गेले. हा विश्वास आपला विवेक संतुष्ट आनंदी करतो. ख्रिस्तांचे रक्त आपल्याला या ज्ञानापासून शुद्ध करीत नाही की आपण अपराधी आहोत 1 योहान 1:8; 1 तीम 1:5,परंतु याद्वारे आपल्याला असे आश्वासन मिळते की परमेश्वरबापाचा क्रोध आमच्यापासून दूर केला गेला आहे. ख्रिस्तांच्या बलिदानाचे सत्य जे आपल्या अंतःकरणात आहे, त्याचा उपयोग परमेश्वर,विवेकांस शिकवण्यासाठी आणि तो शुद्ध करण्यासाठी करतो. प्रेषि 15:9शी तुलना करा. एक जागृत केला गेलेला विवेक दोषी ठरवतो आणि आपल्याविरूद्ध आक्रोश दाखवतो, तो फार कष्टदायक होऊ शकतो परंतु तो शांति व समाधान प्राप्त करू शकतो. शुद्ध विवेकच, फक्त स्वातंत्र्य आणि आनंदाने जिवंत परमेश्वराची सेवा करू शकतो. या वचनात 'त्रिएकत्वा'कडे लक्ष द्या - पुत्राने, पवित्र आत्म्याद्वारे, पित्याप्रत आपल्या स्वतःला वधस्तंभी दिले. त्रिएकत्वासाठी या वचनावर टीप पाहा - मत्त 3:16-17.

***9:15*** *"या कारणास्तव"*- म्हणजे, हे सत्य की येशूंचे रक्त विवेक स्वच्छ करते;व जुन्या प्रबंधातील बलिदान हे कार्य करू शकत नव्हते. वचन 9; 10:2.

* *"नव्या कराराचे मध्यस्थ"*- 8:6-13. हा करार येशूंनी वाहिलेल्या रक्तावर आधारलेला आहे.

प्राप्त होण्यासाठी नवा करार झाला आहे, जेणेकरुन पाचारण झालेल्यांनी प्रतिज्ञेनुसार अनंत वारीस होण्याचे * अभिवचन प्राप्त करावे.
16 कारण आता, मृत्युपत्र * करणाऱ्याचा मृत्यू समजून घेणे नितांत गरजेचे ठरते. 17 कारण मृत्युपत्र, मरणानंतरच अमलात येत
असते, व जोवर मृत्युपत्र अर्थात वसीयतनामा तयार करणारा जिवंत असतो, तोवर ते कोणत्याच कामाचे नसते,
18 *पहिला करारही रक्ताद्वारे झाला नव्हता. 19 कारण जेव्हा, नियमशास्त्रातील हरेक आज्ञा सांगून झाली होती, त्यानंतरच मोशेने
वासरेंबकरें यांचे रक्त घेऊन, पाणी व लाल लोकर आणि एजोब वनस्पतिसह, त्या पुस्तकावर आणि सर्व लोकांवर शिंपडले,
20 आणि म्हटले, “हे त्या कराराचे रक्त आहे, ज्याची प्रतिज्ञा तुमच्यासाठी परमेश्वराने केली आहे.”
21 मग या प्रकारेच त्याने तंबू व सेवेच्या सर्व वस्तूंवरही रक्त शिंपडले. 22 नियमशास्त्रानुसार बहुतेक सर्व * वस्तु रक्ताद्वारेच शुद्ध
केल्या जातात व रक्त ओतल्या-सांडल्याविना * अपराधांसाठी क्षमा प्राप्त होत नाही. 23 यास्तव गरजेचे होते, की स्वर्गातील * गोष्टींची
प्रतिरूपें * व नमूनें अशा बलिदानांद्वारे शुद्ध केली जावीत.
24 कारण हातांनी बनविलेल्या पवित्रस्थानी, जो खऱ्या पवित्रस्थानाचा नमूना * आहे त्यांत ख्रिस्तांनी प्रवेश केला नव्हता, परंतु
प्रत्यक्ष स्वर्गातच प्रवेश केला, यासाठी की आता आपल्यासाठी * त्यांनी परमेश्वरासमक्ष उभे रहावे. 25 *जसे मुख्यपुरोहित दरवर्षी
अर्पणांचे रक्त घेऊन पवित्रस्थानी प्रवेश करी ,आता तसे नाहीच मुळी की येशूंनी वारंवार स्वतःस अर्पण करावे. 26 तसे असते तर
जगाच्या प्रारंभापासून येशूंना वारंवार दुःख सोसावे लागले असते, पण आता युगाच्या शेवटी ते एकदांच प्रगट झाले *, यासाठीच की
स्वतःच्याच बलिदानाद्वारे अपराधांचा दंड सहन करावा.
27 ज्याप्रमाणे मनुष्यासाठी एकदांच मरणे * व त्यानंतर त्याचा न्याय * होणे नेमलेले आहे, 28 त्याचप्रमाणे ख्रिस्तही अनेकांचे

---

* *“पहिल्या कराराच्या”*- या जगातील सर्वच युगाच्या लोकांच्या अपराधांसाठी ख्रिस्त मरण पावले, यात त्या लोकांचाही समावेश आहे ज्यांनी त्यांच्या पृथ्वीवर येण्यापूर्वी अपराध केले होते. तुलना करा रोम 3:25.

* *“स्वातंत्र्य”*- एखाद्याच्या ऐवजी तारणाची किंमत. वचन 12; मत्त 20:28.

* *“अनंत वारीस होण्याचे”*- 1:2,14

* **9:16** *“मृत्युपत्र”*- ग्रीक भाषेतील 'करार' शब्द आणि 'मृत्युपत्र' एकच आहे. हिंदी भाषेत दोन्ही शब्दांसाठी पूर्ण रूपाने दुसऱ्या शब्दांचा उपयोग केला जातो. वचन 15 यात लेखक “वारीस”या पदाविषयी सांगतो जे विश्वासींना प्राप्त होते. आता तो म्हणतो की जोपर्यंत मृत्युपत्र तयार करणाऱ्याचे मरण होत नाही तोपर्यंत विरासत किंवा वारीस होण्याचा हक्क प्राप्त होत नाही.

* **9:18-20** निर्ग 24:1-8पाहा. लेखक जुन्या कराराविषयी (निर्ग 19:5) म्हणतो की ते पुस्तक एक मृत्युपत्र असावे, हा करार परमेश्वराने तयार केलेला होता आणि त्याद्वारे इस्त्राएलाला वारीसाची प्रतिज्ञा मिळाली. (अनु 12:8-10; यहो 1:6; 23:4; स्तो 105:11) परंतु हा करार पूर्ण करण्यासाठी परमेश्वर मरण पावला नाही, परंतु असे नियुक्त केले की त्या समयी पशू मारले जावेत. जनावरांचे मरण, परमेश्वराचा करार कसा पूर्ण करणार? पशुंचे बलिदान ख्रिस्तांच्या मृत्युचे चित्र होते. मोशेने लोकांच्या शरीरांवर रक्त शिंपडले (निर्ग 24:8) याच प्रकारे ख्रिस्तांनी आपले रक्त (आत्मिक रीतिने) विश्वासींच्या अंत:करणावर आणि विवेकावर शिंपडलेले आहे.

* **9:22** *“बहुतेक सर्व”*- सामान्यतः पशुंचे रक्त प्रायश्चितासाठी आवश्यक होते, परंतु याला देखील काही अपवाद होते (लेवी 5:11-13; गण 31:22-24).

* *“रक्त ओतल्या-सांडल्याविना”*- लेवी 17:11.परमेश्वर फक्त ख्रिस्तांद्वारे क्षमा प्रदान करतो - मत्त 26:28; इफि 1:7.

* *“स्वर्गातील”*- ते आत्मिक सत्य, ज्याचा संबंध विश्वासींच्या वर्तमान पवित्रीकरणाशी, आराधनेशी व सेवेशी आहे. उत्तम बलिदानस्वतः ख्रिस्त व त्यांचे वाहिलेले पवित्र, निर्दोष, निष्कलंक रक्त आहे.

* **9:23** *“गोष्टींची प्रतिरूपें”*- 8:5; 10:1.

* **9:24** *“नमूना”*- स्वर्ग 'खरे' महापवित्र स्थान आहे. तंबू व भवन या दोन्हींचे पवित्रस्थान त्याच नमुन्याप्रमाणे तयार केले गेले होते. “खऱ्या”8:2 ची टीप पाहा.

* *“आपल्यासाठी”*- 7:25; 1 तीम 2:5; 1 योहान 2:1

* **9:25** लेवी 16:14-15,34.

* **9:26** *“एकदांच प्रगट झाले”*- 12:28; 10:10,14. दोन हजार वर्षांपूर्वी केले गेलेले बलिदान मनुष्यांच्या अपराध क्षमेसाठी आवश्यक होते; येशूंनी स्वतःचे बलिदान करून जगाचे अपराध स्वतःवर घेतले (योहान 1:29). या बलिदानाची पुनरावृत्ति अनावश्यक आणि अविचारणीय आहे.

* **9:27** *“एकदांच मरणे”*- बायबल असे शिकवीत नाही की लोक पृथ्वीवर वारंवार जन्म घेतात आणि वारंवार मरतात. केवळ एकच शारीरिक मरण आहे आणि एकच शारीरिक जन्म. ईयोब 11:12; योहान 9:3यात पुर्नजन्माविषयी पाहा. पुर्नजन्माद्वारे व्यक्ति

अपराध* स्वतःवर घेण्यासाठी एकदांच बलिदान झाले आहेत; जे लोक त्यांची वाट पाहतात* त्या सर्वांना, दंडमुक्तीनंतरचे (भविष्यकाळाचे) आशीर्वाद देण्यासाठी, येशू मेघांमध्ये दृष्टीस पडतील (दिसतील).

## 10

1 कारण नियमशास्त्र पुढे येणाऱ्या ज्या उत्तम गोष्टी आहेत, त्यांची फक्त छाया* आहे पण अस्सल व वास्तविक स्वरूप नाही*.
2 *एकाच प्रकारचे बलिदान, प्रत्येक वर्षी ओतले जात होते, तरी ते भक्तांना पूर्ण शुद्धता कधीच देऊ शकत नव्हते. कारण जर असे
झाले असते, तर त्यांची अर्पणें बंद झाली नसती का? कारण तेव्हा सेवा करणारे एकदांच शुद्ध झाले असते, मग त्यांचे विवेक त्यांना
दोषी ठरवू शकले नसते, 3 त्यांच्याद्वारे प्रत्येक वर्षी अपराधस्मरण झाले नसते. 4 कारण बैल व बकऱ्यांच्या रक्ताद्वारे अपराध दूर
होणे, ही गोष्ट केवळ अशक्य* आहे.

---

तारण प्राप्त करतो, ही कल्पना स्पष्ट अनावश्यक आणि चुकीची आहे. ख्रिस्तांनी आपल्या बलिदानाद्वारे आपल्या सर्वांचे अपराध स्वतःवर लादून घेतले. त्यांच्यावर विश्वास केल्याने आपल्याला अपराधांची क्षमा, नवा जन्म आणि तारण प्राप्त होऊ शकते.

*"*न्याय*"- मत्त 10:15; प्रेषि 17:31.त्या एका मृत्युद्वारे, मरणानंतर, आपण या जगात पुन्हा दुसऱ्यांदा जन्म घेत नाही, परंतु त्याच्यानंतर न्याय होईल.

***9:28** "*अनेकांचे अपराध*"- योहान 14:3या वचनात तारणाचा अर्थ आहे, अर्थात विश्वासींची अंतिम मुक्ति जी भविष्यातील प्रक्रियेच्या रूपात पाहिली गेली आहे. हे एक अशा प्रकारचे वारीसपण आहे, विश्वासीं यानंतर मिळणार आहे.1:14; रोम 8:23-24; 1 पेत्र 1:4-5ते अपराधांच्या उपस्थितीपासून व त्यांच्या परिणामापासून वाचवले जातील आणि आत्मा, प्राण व शरीराचे तारण प्राप्त करतील.

*"*जे लोक त्यांची वाट पाहतात*"- मत्त 24:42-51.याचा अर्थ आशेने त्यांची वाट पाहणे. तुलना करा तीताला 2:13.प्रायश्चिताच्या दिवशी (लेवी अध्याय 16) महायाजकाच्या महापवित्र स्थानात प्रवेश झाल्यानंतर, लोक त्याच्या बाहेर येण्याची प्रतिक्षा करायचे. येशूंनी महापवित्र स्थानात अर्थात स्वर्गातच प्रवेश केलेला आहे. बाहेर, पृथ्वीवर लोक त्यांच्या येण्याची वाट पाहत आहेत. हा इशारा आगमनाचा -मधला- काळ, अर्थात एका मोठ्या प्रायश्चिताच्या दिवसाप्रमाणेच आहे.

***10:1** "*छाया*"- 8:2,5; 9:23-24. नियमशास्त्र, तंबू व अर्पण आणि नियम, हे सर्व येणाऱ्या किंवा होणाऱ्या उत्तम वस्तूंचे केवळ प्रतिक आणि चित्र होते. ख्रिस्ती लोकांच्या सनातन - सार्वकालिक सत्य तारणाचे हे चित्र होते.

*"*अस्सल व वास्तविक स्वरूप नाही*"- वचन 14; 2:10; 5:9; 11:40; 12:23. पशु बलिदान कोणत्याही मनुष्याला परमेश्वराच्या उपस्थिती योग्य करू शकत नाही (7:11,19) पशूंच्या बलिदानाच्या महत्वाविषयी पाहा. लेवी 1:2.

***10:2-3** 9:9 पाहा. "विवेक त्यांना दोषी ठरवू शकले नसते" किंवा शक्यतोवर 'अपराधाची चेतना' हा अर्थ. लेखकाचे म्हणणे आहे की लोकांनी जर वास्तविक विचार केला होता की त्यांचे अपराध, पूर्ण प्रकारे त्यांच्या(येशूं) बलिदानाद्वारे दूर केले गेले होते, तर आपला विवेक शुद्ध झाला आहे असा अनुभव त्यांनी केला असता. त्याचप्रमाणे त्यांनी विचार केला असता की आता त्यांना दोषी ठरवले जाण्याची गरज नाही. पाहा 9:14.

***10:4** "*अशक्य*"- हे अशक्य का होते? पशु 'मनुष्याचे'स्थान घेऊ शकत नव्हते किंवा त्यांच्या स्थानी मरू शकत नव्हते. ते फक्त एक प्रतिक स्वरूपात होते. ते (पशूंचे) अज्ञानी असल्यामुळे आणि अनिच्छेने वध केले जाण्यामुळे, तो दंड जो मनुष्यावर त्यांच्या अपराधांमुळे आला होता, तो दंड पशु, स्वतःवर घेऊ/उचलू शकत नव्हते. हा दंड म्हणजे आत्मिक मृत्यू आणि परमेश्वरापासून कायमचे दूर जाणे असा होता. पाहा मत्त 25:41; 2 थेस्स 1:9; प्रकटी 20:14. मनुष्य सुद्धा, दुसऱ्या मनुष्यासाठी अपराधांचे बलिदान म्हणून ठरू शकला नसता. प्रत्येक मनुष्य दोषी आहे आणि तो केवळ त्याच्या अपराधांसाठीच मरेल, आणखी इतर दुसऱ्या व्यक्तीच्या अपराधांसाठी नव्हे. समजा, जर एखादा निरअपराध व्यक्ति असता आणि जर तो अपराधांसाठी बलिदान होऊ शकला असता, तरी तो कोणत्याही (फक्त) एकाच व्यक्तीऐवजी मरू शकला असता, संपूर्ण मानवजातीसाठी नव्हे. त्यानंतर परमेश्वराला सुद्धा या गोष्टीसाठी सहमत व्हावे लागले असते आणि परमेश्वरबाप त्यासाठी अजिबात सहमत झाला नाही. प्रायश्चिताच्याविषयी आणि इतर दुसऱ्याच्या ऐवजी मरण्याविषयी आपल्याला खालील गोष्टी समजून घ्याव्या लागतील: आपण जे काही वाईट कार्य करतो, ते परमेश्वराच्या विरोधातच करतो - स्तो 51:4.जे दुष्कर्म, मनुष्य दुसऱ्यांसाठी किंवा स्वतःसाठी किंवा जगाच्या विरोधात करतो, ते वाईट कर्म वास्तविक पाहिल्यास परमेश्वराविरूद्ध आहेत; कारण सर्व मनुष्य आणि संपूर्ण सृष्टि ही त्याचीच संपत्ति आहे. जर परमेश्वराची इच्छा असेल की त्याने मनुष्यांना क्षमा करावी तर त्यांच्या अपराधांचे परिणाम सहन करण्यासाठी त्यांनाच तयार व्हावे लागेल; त्याचप्रमाणे जे काही त्यांनी केलेले आहे, त्याची किंमत मोजावी लागेल. 'गुन्हा' हा दंड किंवा बलिदान यासाठी

5 *या कारणास्तव जगात येताना तो म्हणतो, “की बलिदान* व अर्पणांची तुला आवड नव्हती, हवीच नव्हती, परंतु माझ्यासाठी
एक देह तयार केला. 6 होम व अपराधांसाठीची अर्पणें, या सर्वांनी तू खुशही झाला नाही वा तुला आनंदही मिळाला नाही.” 7 *तेव्हा
मी म्हटले, “पहा, मी आलो आहे (माझ्याविषयी पवित्र वचनांत लिहिलेले आहे), यासाठी की हे परमेश्वरा, तुझी इच्छा पूर्ण करावी.”
8 तो म्हणतो, “की जरी नियमशास्त्रानुसार* बलिदान, अर्पण, होमार्पण, अपराधार्पण केले जाते, तरी त्या सर्वांत तुला संतोष व
आनंद देखील नव्हता, त्यांची इच्छा नव्हती.” 9 तो असेही म्हणतो, “पहा मी आलो आहे यासाठी की तुझी इच्छा पूर्ण करावी.” तो
पहिल्यास नाहीसे करतो जेणेकरून त्याच्या स्थानी दुसरे स्थापिले जावे*.
10 त्या इच्छेन्वयेच आम्ही येशूंच्या देह अर्पणाद्वारे पवित्र केले गेलो आहोत*.
11 प्रत्येक याजक उभा राहून* प्रत्येक दिवशी सेवा करतो व एकाच प्रकारचे बलिदान वारंवार* अर्पितो, परंतु ते बलिदान अपराध
कधीच दूर करू शकत नाही*. 12 परंतु येशू तर अपराधांबद्दल एकच सार्वकालिक बलिदान अर्पण करून, परमेश्वराच्या उजवीकडे*
जाऊन बसले* आहेत, 13 तेव्हापासूनच आपल्या वैरीस, आपल्या पायाखालचे पाट (पदासन)* करण्याची वाट येशू पाहात आहेत,

---

बोलवीत असतो (पाहा गण 31:1-3; अनु 32:41,43; यश 34:8; 47:3; रोम 12:19). कोण हा दंड स्वीकारेल किंवा सहन करेल? मनुष्याने जे नियम तोडले आणि त्यामुळे परमेश्वराला जो दंड देण्याचा अधिकार आहे, तो दंड कोण सहन करू शकला? असता अपराधी लोक किंवा स्वतः परमेश्वर? केवळ परमेश्वरच एका निरपराध, निर्दोष, निष्कलंक मनुष्याच्या रूपात येऊन, लोकांच्या अपराधांसाठी स्वतःला बलिदान रूपाने अर्पण करून त्यांचा दंड सहन करू शकला असता, आणि तेच कार्य येशूंनी केले. प्रायश्चित व क्षमा दुःखावर आधारलेली आहे, बलि झालेल्या पशूवर नाही किंवा आपल्या स्वतःच्या दुःखावर नाही तर परमेश्वराच्या दुःखावर.

***10:5-7** स्तो 40:6-8ची टीप पाहा. ख्रिस्तांपूर्वी तिसऱ्या शताब्दीतील जुना करार, जो ग्रीक भाषेत भाषांतर केला गेला, त्यातून हे वचन घेतले गेले आहे. येथे लेखक जुन्या करारातून हे शिकवीत आहे की पशु बलिदानाविषयी त्याचे शिक्षण बरोबर होते.

* *“बलिदान”*- परमेश्वराला पशुबलि मान्य नव्हती, नको होती, परंतु त्यांहीपेक्षा काही सर्वोत्तम हवे होते. वचन 7 यातील “मी” शब्द ख्रिस्तांकडे इशारा करतो. “हे परमेश्वरा, तुझी इच्छा पूर्ण करावी” याचा अर्थ हाच आहे की मानवाच्या अपराधांसाठी, केवळ ख्रिस्तांचेच बलिदान होणार होते.

***10:7** मत्त 26:39.

***10:8** *“नियमशास्त्रानुसार”*- परमेश्वराने अर्पणें व बलिदानें यासाठी नियुक्त केली होती की त्यांनी ख्रिस्तांच्या बलिदानाचे एक प्रतिक ठरावे- चिन्ह ठरावे; परंतु परमेश्वरबापाला हे ठाऊक होते की त्याची अपेक्षा या सर्व गोष्टी पूर्ण करू शकत नव्हत्या.

***10:9** *“जेणेकरून त्याच्या स्थानी दुसरे स्थापिले जावे”*- त्यांचा अर्थ जुना व नवीन करार यांच्याशी होता. त्यांनी पहिला करार वेगळा केला - 8:7,13.

***10:10** *“पवित्र केले गेलो आहोत”*- परमेश्वराची इच्छा संपूर्ण रीतिने पूर्ण करून, विश्वासीं लोकांसाठी मरण्याद्वारे ख्रिस्तांनी त्यांना पवित्र केले आहे; आणि त्या सर्वांना परमेश्वरबापाचे लोक/प्रजा होण्यासाठी समर्पित देखील करून टाकलेले आहे. 1 पेत्र 2:9.पवित्रीकरणासंबंधी पाहा लेवी 20:7आणि योहान 17:17-19याची टीप वचन 10 यात ख्रिस्ती लोकांच्या पवित्रतेच्या जीवनाविषयी सांगितलेले नाही, ते आपल्याला 12:10-16या वचनांत दिसते. विश्वासीं आताच ख्रिस्तांत पवित्र असे आहेत व ते पवित्र केले जात आहेत (12:10). शेवटी ते संपूर्ण रीतिने पवित्र असे तयार केले जातील (कल 1:22). हे काही विश्वासींसाठी नव्हे तर सर्वच ख्रिस्ती लोकांविषयी सत्य आहे.

***10:11** *“उभा राहून”*- तंबू किंवा भवन यात कोणतीच खुर्ची नव्हती. हे वचन कदाचित हेच दाखवते की त्याठिकाणी याजकांचे कार्य कधीच संपत नाही, ते निरंतर कायमच असते.

* *“वारंवार”*- वचन 10,14; 9:12,25-28. येशूंचे एकच बलिदान सार्वकालिक प्रकारचे आहे, कारण आता अपराधांसाठी आणखी कोणतेच बलिदान उरलेले नाहीये.

* *“अपराध कधीच दूर करू शकत नाही”*- वचन 4.

***10:12** *“उजवीकडे”*- लेखक आपल्याला पुन्हा त्याच ठिकाणी परत आणतो जेथे त्याने आरंभ केलेला होता - 1:3.

* *“जाऊन बसले”*- हा संकेत आहे की त्यांचे बलि अर्पण करण्याचे कार्य सार्वकालिक पद्धतीचे आहे. पाहा योहान 19:30.कोणत्याही याजकाद्वारे आता केले गेलेले कार्य, कोणत्याच प्रकारे, कोणत्याही व्यक्तीच्या तारणासाठी आवश्यक नाही.

***10:13** *“पाट (पदासन)”*- 1:13; स्तो 110:1.स्वर्गीक पित्याने आतापर्यंत ख्रिस्तांचे शत्रू त्यांच्या पायांचे पदासन बनवलेले/केलेले नाही. ख्रिस्त आतापर्यंत याच प्रतिक्षेत आहेत व असे होईलच प्रकटी 11:15-18.

14 *कारण येशूंनी, पवित्र होणाऱ्यांना * (विश्वासीगण) आपल्या एकाच अर्पणाद्वारे, सर्वकाळासाठी * शुद्ध-सिद्ध केलेलेच आहे.
15 *पवित्रात्मा सुद्धा आपणास अशीच साक्ष देतो, की 16 *प्रभू म्हणतो, "जो करार मी त्या दिवसांनंतर त्यांच्याशी करीन तो असा आहे: मी आपले नियम त्यांच्या अंतःकरणात लिहीन, त्यांच्या मनांत घालीन." 17 *तो पुढे असेही म्हणतो, की "मी त्यांचे अपराध व अनुचित कृत्यें पुन्हा कधीही आठवणारच नाही."
18 मग जर त्यांची क्षमा झालेलीच आहे, तर अपराधांबद्दल बलिदान होणे राहिलेच (उरले) नाही.
19 म्हणून * माझ्या बंधूभगिनींनो, ज्याअर्थी आपल्याला येशूंच्या रक्ताद्वारे त्या नव्या-जिवंत मार्गाने, पवित्रस्थानी दाखल होण्याची

---

* **10:14** अनेक वर्षे याजकांनी प्रत्येक वर्षी असंख्य पशूंचे बलिदान अर्पण केले, परंतु त्यांच्याद्वारे एकही अपराध क्षमा होऊ शकत नव्हता, मिटवला जाऊ शकत नव्हता. "पवित्र" -ख्रिस्तांच्या एकच बलिदानाने सदा-सदाकाळासाठी सर्व विश्वासीं त्यांचाचठायी शुद्ध-पवित्र असे केले गेले आहेत; याचा अर्थ काय आहे? ग्रीक शब्दाचा अर्थ आहे पूर्ण केले जाणे - म्हणजेच तात्पर्य हेच आहे की त्या लोकांसाठी जे बलिदान ख्रिस्तांनी केले त्याद्वारे ख्रिस्ती लोकांचे तारण संपूर्णपणे पूर्ण झालेले आहे आणि त्यात कोणतीच कमतरता किंवा त्रूटी नाही किंवा काहीच करण्याचे कार्य उरलेले नाही - तुलना करा 7:25. परमेश्वरासमोर उभे राहण्यासाठी, ख्रिस्तांचे एकच बलिदान, हाच आधार आहे. त्याद्वारे सर्व बाधा, सर्व अडखळण बाजूला हटवून दिले गेले आहेत आणि सिद्ध (संबंध-मेळ) केले गेलेले आहेत.त्यांचे अपराध, ख्रिस्तांनी पूर्ण प्रकारे स्वतःवर घेतलेले आहेत आणि आता (विश्वासींच्या) विरोधात एकही अपराध राहिलेला नाही. (रोम 4:8; 8:33). येशूंनी त्यांना परमेश्वराबरोबर एक सिद्ध संबंध दिलेला आहे. (रोम 8:1,15; 2 करिं 5:18-19). येशूंनी त्यांचे विवेक पूर्ण रीतिने शुद्ध केलेले आहे. येशूंनी त्यांना परमेश्वराच्या उपस्थितीत आताच प्रवेश (9:14) करण्यासाठी आणि सदाकाळ राहण्यास तयार केलेले आहे. (वचन 22; रोम 5:2; इफि 2:18). 23 वचनांपर्यंत हे स्पष्ट आहे की शुद्ध केले जाण्याचा अर्थ हाच आहे. या पृथ्वीवर विश्वासीं या अर्थाने शुद्ध नाहीत की त्यांच्यात कोणताच दुबळेपणा, कमजोरी, अपराध किंवा त्रूटी नसावी. याकोब 3:2; 1 योहान 1:8.संपूर्ण प्रकारे कोणताही विश्वासी सिद्ध नाही. फिलि 3:12पाहा; ज्याठिकाणी तोच शब्द वापरला गेला आहे. याप्रकारची शुद्धता (सिद्धता) भविष्यातच शक्य आहे. 1 योहान 3:20

* *"पवित्र होणाऱ्यांना"*- वचन 10. जर असे म्हटले की जे पवित्र केले जात आहेत (जसे काही भाषांतरकार म्हणतात), तर त्याचा इशारा त्या प्रक्रियेकडे होईल, जी ख्रिस्तांत सर्व विश्वासींच्या जीवनात घडत आहे आणि हीच खऱ्या विश्वासींची व्याख्या देखील ठरेल. तुलना करा 12:5-10; मत्त 5:6-8; रोम 6:15-22; 8:12-14; 1 योहान 3:3,6,9,10.काही प्रमाणात समर्पित आणि पवित्रता प्राप्त झाली नाही, परंतु ख्रिस्तांत सर्व विश्वासी पूर्णत: सिद्ध केले गेलेले आहेत, शुद्ध केले गेलेले आहे आणि शुद्ध होत जात आहेत.

* *"सर्वकाळासाठी"*- 5:9; 9:12 ख्रिस्तांनी आपल्या विश्वासी लोकांसाठी केलेले बलिदान व्यक्तीगत आणि सामूहिक रीतिने स्थायी आणि न बदलणारे असे आहे.

* **10:15** पवित्रात्मा पण आम्हांला हीच साक्ष देतो - 3:7; 9:8; 2 तीम 3:16; 2 पेत्र 1:21.याठिकाणी तो असे प्रगट करतो की ख्रिस्तांत विश्वासींचे 'सिद्ध होत जाणे' याचा वास्तविक अर्थ काय आहे.

* **10:16** यिर्म 31:34पाहा. ख्रिस्त ज्या सिद्धतेत विश्वासींना आणतात, त्यात हे तत्व फारच महत्वपूर्ण आहे. परमेश्वर आपल्या इच्छेच्या आत्मिक ज्ञानप्राप्तीसाठी आणि त्याच्या आज्ञापालनासाठी आंतरिक इच्छा आणि योग्यता प्रदान करतो. हे ज्ञान, ही समजण्याची क्षमता ख्रिस्तांजवळ होती (वचन 7) आणि येशूंच्या बलिदानाच्या आधारावर परमेश्वरबाप ते सर्व काही आपल्या लोकांना देतो. नवीन कराराचे हे एक आवश्यक चिन्ह आहे. जर खरे पाहिले तर, ते सोडून मग खरे विश्वासीं होण्याचे चिन्ह तरी काय आहे? योहान 14:15,23; रोम 8:3-4; 1 करिं 2:16; 2 करिं 3:3.जर एका व्यक्तीजवळ परमेश्वरासाठी अंतःकरण नाही, सेवेचे हृदय नाही, बायबलप्रमाणे परमेश्वराची इच्छा पूर्ण करण्याची आवड नाही, तर माझे अपराध क्षमा झाले असे म्हणण्याचा काय अर्थ आहे? नव्या कराराच्या आशीर्वादांना विभाजित केले जाऊ शकते काय? आपण एक आशीर्वाद ग्रहण करू आणि दुसरा रद्द असे होईल काय?

* **10:17** लेखकाचे कथन, की ख्रिस्तांनी विश्वासींना शुद्ध केले आहे, चांगल्या प्रकारे समजण्यास मदतगार सिद्ध होते की त्यांनी त्यांना संपूर्ण क्षमा दिलेली आहे. जेव्हा पौल म्हणतो की विश्वासींना निर्दोष ठरवले गेले, तेव्हा जो पौलाचा अर्थ होता तोच येथे देखील आहे. रोम 3:14; 4:6-8; 8:33पाहा. ख्रिस्तांनी परमेश्वरासमोर विश्वासींचे स्थान 'सिद्ध' ठेवलेले आहे.10:18 "मग जर त्यांची क्षमा झालेलीच आहे, तर अपराधांबद्दल बलिदान होणे राहिलेच (उरले) नाही"- कार्य पूर्णप्रकारे, योग्य रीतिने, सार्वकालिक असे केले गेलेले आहे. ख्रिस्तांच्या एका बलिदानाच्या ऐवजी आता दुसऱ्या बलिदानाची, किंवा ख्रिस्तांच्या पुन्हा दुसऱ्या बलिदानाची गरज राहिलेली नाही.

* **10:19** *"म्हणून"*- 2:1; 3:1; 4:1,14; 6:1 ख्रिस्त आपले प्रमुख याजक आणि नव्या कराराचे मध्यस्थ या रूपात शिक्षण दिल्यानंतर, लेखक या ठिकाणी समाप्त करतो. आता तो सर्व विश्वासींना प्रोत्साहन देतो की त्यांनी हे सत्य जाणून त्याप्रमाणे व्यवहार

हिंमत.* झाली, [20] *व येशूंनी स्वतःच्या देहांतून जाऊन जो पडदा.* आपल्यासाठी उघडला (अभिषेक केला), [21] *आणि यासाठी की आपला एक असा महान याजक आहे, जो परमेश्वराच्या घराचा.* अधिकारी आहे; [22] त्याअर्थी या, आपण सच्च्या अंतःकरणाने.*, विश्वासाच्या पूर्ण खात्रीने.*, विवेक-खंतावणीचे बोल व दोष दूर करण्याखातर, आणि विवेक शुद्ध व निर्मळ व्हावे.* म्हणून, मनावर सिंचन करून व देह शुद्ध पाण्याने धुतलेले.* असे आपल्या परमेश्वराकडे (जवळ).* जाऊ यात.
[23] न डळमळता, आशेचा अंगिकार दृढ धरून आपण त्या परमेश्वराकडे जाऊ, कारण ज्याने वचन दिले आहे तो विश्वसनीय आहे.*.

---

करावा. याद्वारे तो हे देखील दर्शवतो की परमेश्वराच्या दृष्टीत विश्वासींचे स्थान किती 'सिद्ध'आहे.

**"दाखल होण्याची हिंमत"*- वर्षातून एकदा प्रमुख याजकाला महापवित्रस्थानात प्रवेश करण्याची संधी प्राप्त होत असे. (9-7) कोणत्याही इस्त्राएली माणसाला हे धाडस नव्हते की त्याने त्यात प्रवेश करावा, परंतु आता विश्वासी कोणत्याही वेळी, केव्हाही महापवित्र स्थानात प्रवेश करू शकतो. ते सुद्धा स्वर्गीक पित्याच्या हजेरीत. परमेश्वरबापाने सर्व विश्वासींना याजकाचे पद देऊन त्यांना नेमलेले आहे, नियुक्त केलेले आहे, (13:15-16; 1 पेत्र 2:9; प्रकटी 1:6) आणि परमेश्वराच्या उपस्थितीत ते आपल्या प्रमुख याजकाच्या अर्थातच येशूंच्या मागे मागे येऊ शकतात. येशूंच्या रक्ताद्वारे अपराधांसाठी प्रायश्चित केले गेलेले असल्यामुळे आणि ती दरी, जी परमेश्वर व मनुष्य यांच्यामध्ये होती दूर केली गेलेली असल्यामुळे विश्वासींसाठी हे शक्य आहे.

*__10:20__ जुना करार, जो लोकांना दूर ठेवीत होता, त्याच्याशी येशूंच्या मार्गाची तुलना केली गेली आहे. निर्ग 19:21-25; 27:9-19हा एक जिवंत मार्ग आहे जो ख्रिस्तांच्या जीवनावर अवलंबून आहे, जे विश्वास करतात त्यांना ते नवीन आत्मिक जीवन प्रदान करतात; योहान 14:6; 3:1-4. जुना करार मृत रीति, विधि आणि प्रथांच्याविरूद्ध आहे.

**"पडदा"*- (दर्शनी) तंबू आणि भवन यामध्ये एक पडदा होता, ज्यामुळे पवित्र व महापवित्र स्थान विभागले गेले होते. (9:3) हे दर्शविते की परमेश्वरपित्याच्या उपस्थितीत पोहचण्याचा मार्ग अजूनही प्रगट झालेला नव्हता - 9:8 "पडदा"ख्रिस्त दर्शवतो. जेव्हा ख्रिस्त देहाठायी आले, आपल्या अपराधांसाठी मेले (10:5), आणि आपल्या अपराधांसाठी त्यांनी दुःख सोसले, तेव्हा त्याच क्षणी भवनाचा पडदा वरपासून खालपर्यंत फाटून दुभागला - मत्त 27:50-51.दुसऱ्या शब्दांत त्यांच्या मरणाद्वारे, पित्याच्या उपस्थितीत जाण्याचा मार्ग मोकळा झाला, उघडला; महापवित्रस्थानात आपण ख्रिस्तांच्या क्रूसित शरीरामुळे, जे आपल्यासाठी तोडले गेले, प्रवेश करू शकतो, दाखल होऊ शकतो.

*__10:21__ आपला ....याजक"- 2:17; 4:14.

**"परमेश्वराच्या घराचा"*- 3:6.

**"सच्च्या अंतःकरणाने"*- लूक 12:1; मत्त 5:8; योहान 4:23-24; 1 करिं 5:8.

**"विश्वासाच्या पूर्ण खात्रीने"*- 11:1,6 तुलना करा 3:12.सर्व विश्वासींजवळ हे असावे आणि असू सुद्धा शकते. आपल्याला आश्वासन असावे की ख्रिस्तांनी आपले अपराध हरले आणि हे देखील की ते आपले प्रमुख याजक आहेत. त्यांचे मार्ग आपल्याला परत परमेश्वराजवळ आणतात; हे सुद्धा की ते आपल्या उपस्थितीत आपला स्वीकारही करतात. याविषयी आपल्या मनात शंका व भीति नसावी. इब्रीकरास पत्रात, लेखकाने जे सत्य समोर ठेवले आहे, ते समजल्यानंतर आपले आश्वासन आणखी जास्त वाढू शकते. तुलना करा 3:14; 6:19; 1 योहान 5:13; 2 तीम 1:12; योहान 14:1; लूक 12:32.

**"विवेक शुद्ध व निर्मळ व्हावे"*- हे हृदयाचे सिंचन, आंतरिक अनुभव दाखवते. पाहा 9:13-14.येशूंचे रक्त विश्वासींच्या मनावर शिंपडले जाते, याचा अर्थ हाच आहे की ख्रिस्तांच्या बलिदानाचे ज्ञान आणि या बलिदानावरील विश्वासामुळे, आपले अंतःकरण धुतले जाते.

**"देह शुद्ध पाण्याने धुतलेले"*- या पूर्ण पत्रात लेखकाने जुन्या करारातील आराधनेच्या भौतिक वस्तूंच्या माध्यमातून आत्मिक सत्य सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. येथे देखील तो तसेच करीत आहे, काही विद्वान म्हणतात की तो ख्रिस्ती बापतिस्म्याकडे संकेत करीत होता. पाहा निर्ग 30:17-21; लेवी 8:6; 16:4.याजकांचे शरीर धुतले जाणे, विश्वासींच्या शरीराचे आता धुतले जाणे (वर्तमानकाळी) दर्शविते. ते नव्या कराराअंतर्गत याजक आहेत. वचन 19. ज्याप्रमाणे त्याच्या हृदयाची शुद्धता आवश्यक आहे, अगदी त्याचप्रमाणे त्यांचे बाह्य व्यवहार देखील शुद्ध होतात. नवा जिवंत मार्ग जो परमेश्वराने विश्वासींसाठी उघडलेला आहे, तो काही सीमेपर्यंत बायबलमध्ये दिला गेलेला आहे. निर्ग 30 च्या अध्यायात, तंबूच्या आत्मिक उपयोगाविषयी टीप पाहा.

*__10:22__ *"परमेश्वराकडे (जवळ)"*- पाहा 4:16; इफि 2:18; 3:12; रोम 5:1-2; याकोब 4:8.आपण कशा प्रकारे व त्याच्याजवळ यावे, या संबंधी चार गोष्टी दिलेल्या आहेत:

*__10:23__ *"तो विश्वसनीय आहे"*- 6:16-18; तीताला 1:2; 1 योहान 5:9-10.शंका व अविश्वास याद्वारे आपण प्रभूचा अपमान करू नये कारण याचा अर्थ असा होईल की प्रभू आपले वचन पूर्ण करण्यात विश्वसनीय नाही.

24 *त्याबरोबरच प्रेम व भली कृत्यें करण्याखातर एकमेकांकडे लक्ष लावून* त्यांना प्रोत्साहित करीत जाऊ. 25 *एकमेकांशी भेटीगाठी
व एकत्र मिळणे दुर्लक्षित करू नका; तसे अनेक लोक करीत असतात, पण तुम्ही मात्र एकमेकांना समजावीत रहा, आणि तो दिवस
जसजसा जवळ येत असल्याचे दिसू लागले*, तसतसे आणखी अधिक असेच करीत रहा.
26 कारण सत्याची ओळख* प्राप्त केल्यानंतर, जर आपण जाणूनबुजून* (जाण ठेवूनही) येशूंना नाकारून त्यांचा स्वीकार करणार
नाही, तर यापुढे पुन्हा कोणतेही बलिदान होणे नाही. 27 होय, आता दंडाची एक भयानक प्रतिक्षा व अग्नीचा भडकाच* काय तो
बाकी राहिला आहे, तो विरोधकांना* भस्म करून टाकील. 28 *मोशेच्या नियमशास्त्राचे पालन न करणारा, जर दोन वा तीन
लोकांच्या साक्षीवरून दयेवांचून जिवे मारला जात असे, 29 *तर ज्याने परमेश्वराचा पुत्र पायांखाली तुडविला, ज्याने कराराचे रक्त

---

***10:24** वचन 19-23 यात लेखक परमेश्वर व विश्वासी यांच्यातील संबंधाविषयी सांगतो. आता तो सांगतो की एक दुसऱ्या प्रत त्याच्या जवाबदाऱ्या काय आहेत. पाहा 3:12; रोम 14:19; 15:2; 1 करिं 9:24; कल 3:15.

**“लक्ष लावून”*- इतरांनी प्रभूची सेवा उत्तम प्रकारे करावी हा हेतू साधून आपण असे प्रयत्न करावे, असे मार्ग काढावेत की ज्यांच्याद्वारे आपल्याला एकमेकांचा उत्साह वाढवण्यात एकमेकांची मदत व्हावी.

***10:25** दुसरे विश्वासी ज्याठिकाणी एकत्र येतात, तेथे जाणे थांबवू नये. प्रत्येकाला सहभागितेची गरज आहे आणि प्रत्येकाने दुसऱ्यांना एकमेकांशी सहभागिता करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

**“तो दिवस जसजसा जवळ येत असल्याचे दिसू लागले”*- याचा अर्थ काय आहे? कदाचित यरूशलेम व मंदिर नष्ट केले जाण्याकडे हा इशारा केला गेला आहे. (मत्त 24:1-3; लूक 19:41,44; 21:20-24). हा नष्ट होण्याचा काळ त्याने लिहिलेल्या वेळेच्या निकट होता किंवा याचा अर्थ ख्रिस्तांचे दुसरे आगमन असे होते (9:28; मत्त 24:33) किंवा दोन्हीही गोष्टींकडे हा इशारा होता. पहिल्या शताब्दीचे विश्वासी या दोन्ही घटनांना एकाच वेळी घडण्याच्या अपेक्षेत होते. विश्वास त्यागासंबंधी ही चौथी ताकीद आहे. 2:1-4ची टीप पाहा. ख्रिस्तांविषयी, परमेश्वराद्वारे प्रगट केलेल्या महिमामय सत्याच्या प्रकाशाच्या विरोधात, मुद्दाम जाऊन अपराध करण्यासारखेच ते होईल.

**“सत्याची ओळख”*- ' विश्वासानंतर मनबदल' असे लेखक म्हणत नाही. आपल्याला सत्याचे ज्ञान असूनही आपण मनबदल व विश्वास यांकडे दुर्लक्ष करू शकतो. एखाद्या गोष्टीला वारंवार व सतत अस्वीकार करत राहणे, हा लेखकासाठी या वचनात गुन्हा ठरु शकतो. पुढे येणाऱ्या शब्दांच्या मदतीने ही गोष्ट स्पष्ट होते. “पुन्हा कोणतेही बलिदान होणे नाही”- जो कोणी ख्रिस्तांचे बलिदान अस्वीकार करतो, तो क्षमेच्या मार्गापासून स्वतःला वेगळे करतो. तो व्यक्ति जर असा विचार करतो की तो पुन्हा जुन्या कराराचे बलिदान अर्पण करू शकतो (किंवा आणखी कोणतेही बलिदान) आणि तरीही परमेश्वर त्याला ग्रहण करील, तर तो एक मोठी भयंकर चूक करीत आहे.

***10:26** *“जाणूनबुजून”*- एखादा अपराध किंवा अपराधाची क्रिया नव्हे तर याद्वारे मन आणि जीवन याची एक स्थिर अवस्था दाखवली गेलेली आहे. लेखक असे म्हणत नाही की त्याला वाटते की त्या लोकांपैकी कोणीही अशा प्रकारच्या स्थितीत सापडेल. तो “जर”या शब्दाचा उपयोग करतो (तुलना 6:6) वचन 39 यात तो म्हणतो की, त्याला अशी खात्री आहे की, ज्या विश्वासींना तो लिहीत आहे, ते या अपराधाचे दोषी ठरवले जाणार नाहीत (तुलना करा 1 योहान 3:9-10). असे वाटते की लेखक एखाद्या अपराधाविषयी उल्लेख करीत आहे. विश्वासी लोक झालेल्या अपराधांची क्षमा प्राप्त करू शकतात - (1 योहान 1:9; 2:1; 5:16) परंतु एक अपराध/गुन्हा असा आहे, ज्याच्यासाठी कोणतीच क्षमा नाही, याठिकाणी तो गुन्हा असा आहेः ख्रिस्त व त्यांच्या बलिदानाचा तिरस्कार करणे, त्यांच्या रक्ताच्या नव्या करारापासून माघार घेणे आणि पवित्रात्म्याच्या वाणीची आज्ञा न पाळणे (वचन 29). असे लोकही आहेत, जे असे शिकवतात की एखाद्या अपराधात पडल्यामुळे विश्वासी नेहमीसाठी नाश होतील परंतु नव्या कराराची शिकवण अशी नाही - मत्त 6:12; 1 योहान 1:9; 2:1.

***10:27** *“अग्नीचा भडकाच”*- 12:29; 2 थेस्स 1:7; मत्त 3:10; मार्क 9:42-48; लूक 16:24; प्रकटी 20:14.

**“विरोधकांना”*लेखकाचा इशारा परमेश्वर विरोध्यांकडे आहे. प्रत्येक व्यक्ति जो ख्रिस्त आणि त्यांचे एका बलिदानाविषयी प्रगट झालेले सत्य मुद्दाम दुर्लक्षित करतो, त्याला कळेल की तो परमेश्वराचा विरोधी आहे. तुलना करा योहान 7:7; 15:18; रोम 5:10; याकोब 4:4.

***10:28** पाहा 2:2; अनु 17:6-7.ते अपराध, जे कायद्याअंतर्गत मृत्यूदंड आणीत होते. पाहा निर्ग 21:36.एक उदाहरण पाहा - गण 15:30-35.

***10:29** हा तो गुन्हा आहे ज्याच्याविषयी लेखक 26व्या वचनात म्हणतो. तुलना करा 6:6; मत्त 12:31; 1 योहान 5:16-17.जुन्या कराराअंतर्गत मुद्दाम गुन्हा केल्यावर मरणाच्या दंडाचे विधान होते. नवा करार, जुन्या कराराहून श्रेष्ठ आहे, म्हणूनच त्याविरूद्ध केले गेलेले अपराध, जुन्या करारातील जितके जास्त ज्ञान व सत्य उपलबध करते, तितकी जास्त आपली आज्ञापालनाची जबाबदारी

ज्याद्वारे तो पवित्र ठरविला गेला होता अपवित्र जाणले, व कृपेच्या आत्म्याचा अपमानही केला आहे, तर असा मनुष्य किती अधिक
कठीण दंडास.* पात्र ठरील? 30 *कारण आपण परमेश्वरास ओळखतो, जाणतो व मानतो, ज्याने म्हटले आहे, “सूड घेणे माझे कार्य
आहे, मी बदला घेईन आणि मीच दंडही देईन, आणखी पुढे हे देखील की प्रभू आपल्या लोकांचा न्याय करील.”
31 *जिवंत परमेश्वराच्या हातीं सापडणे, एक महाभयंकर गोष्ट आहे.
32 **पूर्वकाळचे दिवस आठवा, जेव्हा तुम्ही सत्य ओळखीत असल्यामुळे दुःखात सुद्धा स्थिर व मजबूत राहिला होता. 33 काही
जण तर निंदा व क्लेश सहन करीत लोकांपुढे तमाशा झाले, ज्यांच्याशी वाईट व्यवहार केला, त्यांच्या दुःखात तुम्ही सहभागी झाला.
34 प्रियांनो, तुम्ही कैदी लोकांच्या दुःखात दुःखी झाला, आपली संपत्तिही इतरांना आनंदाने लुटू दिली, कारण तुम्ही नीट ध्यानांत
ठेवले होते, की तुमच्याजवळ जी संपत्ति आहे ती सर्वोत्तम व सदाकाळ टिकणारी मालमत्ता.* आहे. 35 म्हणून आपले धैर्य.* खचू देऊ

---

वाढते, आणि आज्ञाभंग केल्यावर किंवा त्याचा स्वीकार केला नाही तर दंड देखील अधिक होतो. ख्रिस्तांत असलेला एक विश्वासी या वचनात वर्णन केलेला गुन्हा करील व ख्रिस्तांना आपल्या पायाखाली तुडवील, तर तो त्यांचे रक्त अपवित्र करील इत्या? नव्या करारात विश्वासीसंबंधी जे शिक्षण शिकविले आहे, ते लक्षात घेतले तर असे शक्य नाही. पाहा योहान 5:24; रोम 8:1,28-33; फिलि 1:6; 1 योहान 3:9-10इत्या.

*“कराराचे रक्त”*- याचा अर्थ काय? हे शक्य आहे कां की एखादा व्यक्ति जो त्यांच्या रक्ताने शुद्ध ठरवला गेला, विश्वासीं नसेल किंवा त्याने तारण प्राप्त केलेले नसेल? पवित्रीकरणाचा अर्थ 'मुक्ति आणि विश्वास' असा नेहमी नसतो. याचा मूळ अर्थ आहे 'वेगळे करणे'(लेवी 20:7आणि योहान 17:17-19ची टीप पाहा) अविश्वासीचे शुद्ध केले जाण्याविषयी पाहा 1 करिं 7:14.ही गोष्ट ध्यानात ठेवा की या पत्रात जुन्या व नव्या कराराची तुलना आहे, आणि हे पत्र इब्री लोकांना लिहिले गेले होते; त्यांना ठाऊक होते की एका इस्त्राएली रूपात ते रक्ताद्वारे शुद्ध केले गेले होते (9:18-20; निर्ग 24:7-8; 31:13; लेवी 21:8) परंतु याचा अर्थ हा नाही की इस्त्राएलातील प्रत्येक व्यक्ति एक खरा विश्वासी होता किंवा परमेश्वराच्या दंडापासून वाचलेला होता. पाहा 3:10-11,19. नव्या कराराचा पाया, ख्रिस्तांचे रक्त आहे- 9:15. पाहा 13:12जेथे लिहिले आहे की, लोकांना आपल्या रक्ताने पवित्र करण्यासाठी ख्रिस्त येशूंनी दुःख सहन केले, नवा करार इस्त्राएलाच्या घराण्याशी बांधला गेला होता - 8:8 'इस्त्राएल राष्ट्र' दुसऱ्या राष्ट्रांपासून एका विशेष कार्यासाठी वेगळे केले गेले आहे (पवित्र केले गेले आहे) रोम 9:1-5; 11:11,25-29.परंतु बहुतेक लोक ख्रिस्तांचा स्वीकार करीत नाहीत आणि विश्वास न ठेवताच जिवंत आहेत. असे म्हणणे शक्य नाही काय, की पृथ्वीवर दिसणारे चर्च ख्रिस्तांच्या रक्ताने शुद्ध केले गेलेले आहे? असे म्हणणे सत्य नाही काय की दिसणाऱ्या/असणाऱ्या चर्चमध्ये पुष्कळ अविश्वासी आहेत आणि त्यांनी कधीच तारण प्राप्त केले नाही? 1 तीम 2:6पाहा ज्यात असे लिहिले आहे की, ख्रिस्तांनी आपल्या स्वतःला सर्व लोकांसाठी, रॅनसम किंवा मुक्तीमूल्य/तारणाची किंमत या रूपात देऊन टाकले. हे 'तारणमूल्य'ते स्वतःच होते, त्यांनी आपले रक्त, त्या मूल्यासाठी वाहिले. 1 पेत्र 1:18-19.

* *“दंडाची”*- 9:27; प्रेषि 17:31; प्रकटी 22:11-15

***10:30*** अनु 32:35-36; स्तो 135:14.

***10:31*** जिवंत परमेश्वराच्या हातीं सापडणे ही भयंकर गोष्ट आहे कारण परमेश्वर पवित्र आहे, अपराध त्याला आवडत नाही, तो अपराधाचा द्वेष करतो आणि विद्रोह व अविश्वास या दोन्ही गोष्टी त्याच्या दृष्टीने दंडनीय आहेत, जर आपण परमेश्वराचे सत्य ग्रहण केले आणि ते स्वीकारले आहे, त्याचप्रमाणे जसे 19-25 यात दिले गेले आहे व त्याप्रमाणे आपण करीत आहोत तर आपल्याला घाबरण्याची गरज नाही.

***10:32-39*** सत्यापासून दूर न जाण्याची ताकीद दिल्यानंतर जसे त्याने 6:9-12यात केले होते, तसेच तो आताही करतो. त्याची इच्छा आहे की त्यांना खात्री असावी की त्यांचे तारण झालेले आहे आणि ते वचन 26-29 चे अपराध करणार नाहीत. त्याचा हेतू आहे की त्यांनी विश्वास ठेवावा आणि आपला विश्वास कार्यांनी सिद्ध करावा.

***10:32-34*** दुःखात त्यांची स्थिरता, दुसऱ्या ख्रिस्ती लोकांशी प्रेम, ख्रिस्तांसाठी सर्व काही देऊन टाकण्याची तत्परता - हे सर्व या गोष्टीचे एक सबळ प्रमाण होते की त्यांचा विश्वास वास्तविक होता.

***10:34*** *“सदाकाळ टिकणारी मालमत्ता”*- वचन 34 पाहा 6:12; मत्त 6:19-20; रोम 8:17; 1 पेत्र 1:4.ख्रिस्तांठायी आपल्याजवळ सार्वकालिक दौलत आहे, म्हणूनच आपल्याजवळ काय आहे काय नाही याविषयी आपण अधिक चिंता करता कामा नये.

***10:35*** *“धैर्य/हिंमत ठेवणे”*- पाहा 3:6,14; 6:11; रोम 3:3-5; 8:24-25; याकोब 1:2-4काही का होईना, ख्रिस्तांठायी विश्वास ठेवून सर्व काही सहन करत राहणे आवश्यक आहे. लेखकाला विश्वास आहे की ते तसेच करतील (39), आपल्याला देखील हाच विश्वास ठेवायचा आहे.

नका, कारण त्याचे प्रतिफळ * अर्थात परिणाम मोठा असेल. [36] सबुरीने तुम्ही सहनशील असणे आवश्यक आहे, जेणेकरून परमेश्वरी
इच्छेची पूर्ति करून तुम्ही प्रतिज्ञेचे फळ प्राप्त करावे. [37] *आता अगदी थोडका वेळ राहिला आहे, कारण येणारा तो येईलच व उशीर
करणार नाही,
[38] क्षमा-प्राप्त केलेला माझा जण (विश्वासी) आपले जीवन विश्वसनीय असे राखून ठेवील, पण जर तो माघारी फिरून विश्वासत्याग
करील, तर माझे मन त्याच्याविषयी आनंदी असणार नाही.
[39] आम्ही त्या लोकांसारखे नाही जे विश्वास त्यागल्यामुळे पुन्हा बर्बाद होतात, परंतु आपण येशूंच्या विश्वासाठायी कायम
स्थिरावलेले असू, जेणेकरून उद्धाराच्या आशीर्वादांमध्ये अढळ राहू.

# 11

[1] *आता विश्वास आशा केलेल्या वस्तूंचे निश्चयपूर्वक जपलेले आश्वासन * व न दिसणाऱ्या गोष्टींचे प्रमाण * आहे.
[2] कारण यांद्वारेच पूर्वजांची * उत्तम साक्ष दिली गेली.

---

* *"प्रतिफळ"*- मत्त 19:28-30; प्रकटी 22:12.

* **10:37-38** "जर तो माघारी फिरून "- 6:6

*"माझा जण"*- याचा अर्थ आहे ख्रिस्तांचे सत्य/खरे विश्वासीं लोक (त्याला ठाऊक होते की, तो त्यांपैकीच एक होता) आणि त्यांनी या गोष्टींचे भरपूर प्रमाण दिले होते की ते सुद्धा विश्वासी होते. वचन 32-34; 6:11. जर ते मागे गेले तर परमेश्वरास त्यांच्यामुळे आनंद होणार नाही; म्हणजेच त्यांचा नाश होईल, परंतु प्रेषित लेखक म्हणतो की ते मागे जाणार नाहीत, माघार घेणार नाहीत. काही लोकांचे म्हणणे असे आहे की खरा विश्वासी मागे फिरू शकतो आणि येथे 26;2:3; 3:12; 12:25 यांत वर्णित अपराध करू शकतो आणि त्याचा सार्वकालिक नाश होऊ शकतो परंतु लेखक इशारा करतो की असे होणार नाही. विश्वास अधिक सामर्थी आहे, इतका अधिक सामर्थी की ज्याची कल्पना किंवा विचार लोक करूच शकत नाही. या जगापेक्षा विश्वास अधिक बलशाली आहे (1 योहान 5:4). विश्वास पर्वतांना हालवतो आणि अशक्य गोष्टी शक्य करू शकतो (मत्त 17:20; रोम 4:19-22) विश्वास अदृश्यास पाहण्याजोगा, दिसण्यायोग्य असा करतो (2 करिं 4:18). परमेश्वराने हे एक माध्यमाच्या रूपात निवडलेले आहे जेणेकरून त्याच्याद्वारे लोकांना तारण द्यावे आणि त्यांचे तारण कायम टिकून राहावे (इफि 2:8; 1 पेत्र 1:5) ,असे माध्यम जे परमेश्वराने निवडले आहे, कधी स्वतःहून अयशस्वी होऊ शकते काय? हा ख्रिस्ती विश्वासींसाठी प्रार्थनेचा एक विषय आहे, तेव्हा विश्वास अयशस्वी होईल काय? इब्रीकरांसचा लेखक आपला हा विश्वास प्रगट करतो की असे होऊच शकणार नाही. रोम 5:9आणि 10ची टीप पाहा. ज्या अंतिम व शेवटच्या मुक्तीचे वचन परमेश्वरबापाने विश्वासींना दिलेले आहे, त्यांत ख्रिस्ती विश्वासीं निरंतर विश्वास करतात. पुढच्या अध्यायात लेखक विश्वासाचे सामर्थ्य व शक्तीचे वर्णन करतो.

* **11:1** विश्वास अंधारात उडी मारणे नाही, ही उडी प्रकाशात मारण्याची आहे. केवळ कामना करणे म्हणजे विश्वास नाही. विश्वास परमेश्वराच्या वचनांच्या बलवंत प्रमाणावर आधारलेला असतो. खऱ्या विश्वासात म्हणजे परमेश्वराविषयी येणारा प्रत्येक विचार किंवा त्या सर्व गोष्टीं नव्हे, ज्या माणसाच्या दृष्टिकोनातून परमेश्वरी ज्ञान म्हटल्या जातात.

* *"आश्वासन"*- या शब्दाचा अर्थ 'तत्व किंवा सारांश' किंवा 'प्रकृति किंवा हिंमत/धैर्य' देखील होतो. पण या ठिकाणी आश्वासन सर्व प्रकारे अधिक उचित शब्द प्रतित होतो. ग्रीक भाषेत दोन शब्दांचे मिलन आहे. पहिल्याचा अर्थ 'खाली' आणि दुसऱ्याचा 'उभा'. दुसऱ्या शब्दात आपण म्हणू शकतो की विश्वास ती वस्तु आहे जी एखाद्यावर उभी असते, ज्याला आपण पाया सुद्धा म्हणतो. ती कोणती वस्तु किंवा गोष्ट आहे जिच्यावर विश्वास स्थिर असतो? त्या सर्व गोष्टी, ज्या येथे इब्रीकरांस पत्रात ख्रिस्तांत आशादायक आहेत. विश्वास आपल्या आशेचा खरा पाया आहे. विश्वासांवाचून आपल्याजवळ आशेसाठी कोणतेही सबळ कारण नसेल आणि आशा करण्याचा कोणताही अधिकार देखील नसेल. विश्वास एक पाया आहे, गुण आहे जो आपल्याला एखाद्या नष्ट होण्याच्या शक्यतेत आणि कोणत्याही प्रकारच्या समस्येचा सामना करण्यासाठी व सहन करण्याकरता योग्य असे तयार करतो. तुलना करा रोम 5:1-4.

* *"प्रमाण"*किंवा पुष्टि करणे किंवा उघडणे, उलगडा करणे. ग्रीक भाषेत यापैकी कोणताही शब्द असू शकतो - क्रियेचा उपयोग - योहान 3:20; 16:8; 1 करिं 14:24; इफि 5:11,13यात केला गेला आहे. विश्वास ती स्थिती आहे, की ज्या न दिसणाऱ्या गोष्टींविषयी बायबल सांगते, त्यावर अशी धारणा ठेवते की त्या वास्तविकच आहेत. तुलना करा. वचन 27; 2 करिं 4:18.

* **11:2** *"पूर्वजांची"*म्हणजेच जुन्या काळातील, ते सर्व लोक जे परमेश्वराचे होते आणि ज्यांच्या विश्वासाची स्तुति-प्रशंसा स्वतः परमेश्वरबापाने केली होती. त्याच्या स्तुतिचा विषय हा होता की, संपूर्ण मानवजातीत हेच लोक सरळ मार्गावर होते, परमेश्वरावर

[3] विश्वासाने* आपल्याला कळते की संपूर्ण जगाची रचना परमेश्वराच्या शब्दाने (वचन) झाली म्हणजे अशी, की जे दिसते ते दिसणाऱ्या वस्तूंपासून झाले नाही.
[4] *विश्वासाने हाबेलाने* परमेश्वरास काईनापेक्षा उत्तम बलिदान अर्पिले, त्याद्वारेच तो विश्वासी असण्याविषयीची साक्ष दिली गेली, कारण परमेश्वराने त्याच्या बलिदानाची (अर्पण) साक्ष दिली, ज्याद्वारे आतापर्यंतही मरणानंतर तो बोलतो आहे.
[5] *विश्वासाने हनोख वर उचलला गेला जेणेकरून त्यास मरणाचा अनुभव येऊ नये. त्याच्याविषयीची कोणतीही माहिती सापडली नाही कारण परमेश्वराने त्याला वर उचलून घेतले होते. वर जाण्यापूर्वी त्याच्याविषयी अशी साक्ष दिली होती, की त्याने परमेश्वरास आनंदी केले आहे.
[6] *विश्वास नसेल, तर परमेश्वरास खुश करणे अशक्य ठरते, कारण त्याच्याकडे येणाऱ्याने विश्वास करावा की तो आहे व जे

---

त्यांचा पक्का विश्वास होता, परमेश्वरबापासमोर ते सर्व नीतिमान होते. या अध्यायात आपण देखील या प्रशंसेचे भागीदार आहोत. परमेश्वराच्या दृष्टीत मानवजातीचा इतिहास म्हणजे त्या लोकांचा इतिहास जे परमेश्वरबापावर विश्वास करतात; कारण विश्वास व त्याद्वारे शक्य होणाऱ्या गोष्टीच महत्वपूर्ण आहेत, केवळ तेच आहे जे स्थिर राहील, बाकी सर्व नष्ट होईल (1 योहान 2:17)

*__11:3__ *"विश्वासाने"*समज किंवा तर्क यांचा विरोध करत नाही. विश्वासडोळ्या सारखी समज देतो जो प्रकाशाला आत येऊ देतो. विश्वासीला ज्ञान आहे की सृष्टीची उत्पत्ति कशी झाली कारण परमेश्वरपित्याने ते प्रगट केले आहे. अविश्वासी लोकांसारखे आपण सृष्टीच्या उत्पत्तिविषयी तर्क करता कामा नये. परमेश्वराने म्हटले आणि सृष्टि निर्माण झाली. (उत्प 1:1,3,6,9; स्तो 33:6; यश 40:26; 42:5; योहान 1:3; कल 1:16)

*__11:4__ येथे लेखक विश्वास करणाऱ्या पूर्वजांविषयी आरंभ करतो. ते सर्व, काही प्रतिभावान लोक नव्हते. हाबेल एक मेंढपाळ होता, याकोब व शमशोन यात अनेक चांगल्या गोष्टींची उणीव होती, राहाब एक वेश्या होती. परंतु त्या सर्वात एक गोष्ट सामान्य/सारखी होती. त्यांनी परमेश्वरावर विश्वास ठेवला आणि या गोष्टीत ते सर्व आपल्यासाठी एक नमूना/आदर्श होते. याठिकाणी जुन्या करारातील सर्वच विश्वासींची नांवे दिली गेलेली नाहीत. याठिकाणी विश्वासाचे तीन परिणाम आपण पाहू शकतो: पहिला : विश्वासाच्या परिणामामुळे त्यांनी काही केले. खरा विश्वास जीवनरहीत नाही, अक्रियाशील नाही. विश्वास हा एक शक्तिशाली बळ/शक्ति आहे जो नेहमी क्रिया उत्पन्न करतो (10:39; याकोब 2:14-26). दुसरा : विश्वासामुळेच त्यांना आशीर्वाद प्राप्त झालेत. या सुचीनुसार परमेश्वराने प्रत्येक विश्वासीला, कोणत्या न कोणत्या अद्‌भुत मार्गांनी/पद्धतींनी आशीर्वाद दिला. तिसरा : ज्यांच्याजवळ विश्वास होता, त्यांनी शेवटपर्यंत सर्व काही सहन केले म्हणून खरा विश्वास कार्यशील आहे, प्राप्त करीत राहणारा व सतत कायम राहणारा असा आहे, जो विश्वास असे करीत नाही, तो बायबलवर आधारलेला विश्वास नाही.

* *"हाबेलाने"*- उत्प 4:1-10;आपण यात विश्वास व बलिदान यामधील संबंध पाहतो. एक अपराधी म्हणून आपण सर्वांनी येथूनच सुरवात करावी आणि या पुस्तकाची एक मुख्य शिकवण हीच आहे. हाबेलाचा विश्वास एका सत्यावर अवलंबून होता (ज्याप्रमाणे खरा विश्वास असतो) आणि विश्वासाद्वारे त्याने परमेश्वर- निर्धारित बलिदानाची निवड केली होती. काईनाने असे करण्यास नकार दिला, ते स्वीकारले नव्हते; म्हणूनच हाबेलाचे अर्पण त्याच्या बलिदानापेक्षा श्रेष्ठ असे ठरले.

*"तो विश्वासी"*- तुलना करा उत्प 15:6; रोम 1:17; 3:22; 5:1त्याच्या या नमुन्यामुळे हाबेल आजपर्यंत बोलतो आहे आणि म्हणतो की 'परमेश्वराच्या ज्ञानावर विश्वास करा आणि त्याच्याद्वारे निर्धारित बलिदानाची निवड करा'. हे बलिदान येशू ख्रिस्तांचेच आहे.- 7:27; 9:12,26,28; 10:10,14.

*__11:5__ परमेश्वराबरोबर सहभागिता व विश्वास यांमधील संबंध हनोख दाखवतो. उत्प 5:11-24पाहा. विश्वास बाजूला सारून परमेश्वरबापाचे ज्ञान ठेवणे, त्याला ओळखणे किंवा त्याच्याबरोबर जीवन व्यतित करणे अशक्य गोष्ट आहे. अविश्वास परमेश्वरबापास खोटे ठरवतो. (1 योहान 5:10) दोन व्यक्तींपैकी जर एकात अविश्वास आणि दोष लावण्याचा स्वभाव (विचार) असेल तर त्यांच्यात सहभागिता कशी होऊ शकते? हनोख, विश्वास व अमरता यातील संबंध सुद्धा दाखवतो, एक असा बदल जो येशू ख्रिस्तांच्या दुसऱ्या आगमनावर जिवंत विश्वासींच्या जीवनात येईल (1 करिं 15:51-53; 1 थेस्स 4:15-17)

*__11:6__ *"विश्वास नसेल" -विश्वासावांचून/सोडून परमेश्वराला आंनदी करणे अशक्य आहे; केवळ अशक्यच नव्हे तर कठीण सुद्धा आहे. परमेश्वरबाप ज्या अविश्वासाकडे दुर्लक्ष करतो, असा अविश्वास"लहानसहान चुकीची गोष्ट नाही. हा एक भयंकर गुन्हा आहे जो परमेश्वर व मानव यांच्यामध्ये असलेल्या आपल्या 'सबंध केंद्रावर' प्रहार करणारा असा आहे. ही एखाद्या व्यक्तीची परमेश्वर आणि सत्य याविरूद्ध, अपराध आणि अंधार यांच्याप्रत आंतरिक निवड आहे. हे परमेश्वराचे प्रकाशन आणि त्याचा पुत्र यांचा तिरस्कार आहे आणि परमेश्वरबाप याची योग्य ती शिक्षा देतोच.* 3:11-12,19; योहान 3:36; प्रकटी 21:8 पाहा, विश्वास दोन गोष्टींचे सत्य ग्रहण करतो : हा की बायबलमध्ये वर्णित परमेश्वराचे अस्तित्व आहे आणि परमेश्वराला तत्परतेने शोधणाऱ्या व्यक्तीला बक्षिस/पुरस्कार देतो. येथे वचनांच्या दोन सीमा आहेत. विश्वासीं, ही दोन्ही सत्यें ग्रहण करतो कारण परमेश्वरपित्याने ती त्यावर

त्याच्यावर प्रेम करतात त्यांना तो उत्तर देतो.
7 विश्वासाठायी नोहा त्या समयी तयार होता, ज्या गोष्टींविषयी त्यास परमेश्वरापासून चेतावणी मिळाली* होती, पण ज्या त्या समयी
त्याला दिसत नव्हत्या. अदृश्य गोष्टींविषयी न डळमळता त्याने परमेश्वर - भक्तीसह* आपल्या घराण्याचा* बचाव करण्यासाठी
जहाज तयार केले, त्याद्वारे त्याने जगाला आरोपी ठरविले*, व केवळ विश्वासाने मिळणाऱ्या पदाचा तो वारस झाला*.
8 *विश्वासामुळेच पाचारणानंतर अब्राहामाने आज्ञा पाळली. अशा ठिकाणी गेला जे वतन म्हणून त्यास मिळणार होते, परंतु आपण
कोठे जात आहोत हे ठाऊक नसतांही जो निघून गेला.
9 *विश्वास बाळगून तो प्रतिज्ञेच्या देशात परदेशी होऊन राहिला, इसहाक व याकोबाबरोबर, जे त्यासह वचनाचे वारस होते तंबूत
वास केला. 10 कारण अब्राहाम स्थिर पाया असलेल्या नगराची प्रतिक्षा करीत होता, एक असे नगर ज्याचा रचनाकार व बांधणारा
परमेश्वर आहे.
11 *सारेनेही म्हातारी असतानाही तिच्या विश्वासामुळेच गर्भ धारणेचे बळ मिळविले. तिने प्रतिज्ञा करणाऱ्यास खरा,
सच्चा-विश्वासयोग्य म्हणून ओळखले होते. 12 म्हणून तो जो मेल्यागत होता, त्या एका मनुष्यामुळे आकाशांतील तारे व समुद्राच्या
वाळू समान, अगणित वंश उत्पन्न झाले.
13 *त्यांनी प्रतिज्ञा केलेल्या वस्तु प्राप्त केल्या नव्हत्या, कारण ते सर्व जण विश्वासाच्या अवस्थेतच मरण पावले होते; तरीपण त्या
सर्वांनी त्या वस्तू दुरूनच पाहिल्या, आनंदी झाले आणि विश्वासामुळेच त्यांनी हे सत्य मान्य केले की आम्ही या पृथ्वीवर परदेशी व

---

प्रगट केली आहेत. 1:1-3; यश 44:6; 45:5,18,21; योहान 1:18; मत्त 7:7-8.

***11:7** *“मिळाली”*- अनु 4:29; यिर्म 29:13.गुन्ह्याविरूद्ध परमेश्वराच्या क्रोधापासून बचाव आणि विश्वासासोबत त्याचा जो संबंध आहे,तो आपण नोहाच्या जीवनात पाहतो - उत्प 6:9; 7:5आता लोकांसाठी ख्रिस्त हेच शरणस्थान आहेत. विश्वासी त्यांच्या शरणस्थानी सुरक्षित आहे.

* *“भक्तीसह”*- उत्प 20:11; स्तो 34:7-11; 111:10; नीति 1:7ची टीप.

* *“घराण्याचा”*- प्रेषि 16:31शी तुलना करा.

* *“जगाला आरोपी ठरविले”*- विश्वासाचे एक उदाहरण, अविश्वासाला दोषी ठरवील. अगदी त्याचप्रमाणे, ज्याप्रमाणे प्रकाश, अंधाराला दोषी ठरवतो. (तुलना करा - योहान 3:18-21; 15:22-24)

* *“पदाचा...झाला”*- रोम 1:17; 3:24-25या अध्यायात अब्राहामाला, अन्य लोकांच्या तुलनेत जास्त महत्वाचे स्थान स्थान दिलेले आहे. बायबलमध्ये हे विश्वासाचे एक सर्वश्रेष्ठ उदाहरण आहे आणि त्याला 'विश्वास करणाऱ्यांचा पिता'असे म्हटलेले आहे. रोम 4:11,16.याठिकाणी त्याच्या जीवनातील अनेक पैलूंचे चित्र दिसते.

***11:8** पाहा उत्प 12:1-5; प्रेषि 7:24.या ठिकाणी विश्वास व परमेश्वरबापाप्रत आज्ञापालन यातील संबंध दाखवलेला आहे. विश्वासाशिवाय वास्तविक आज्ञापालन नाही कारण त्यामुळे हे सिद्ध होते की त्याठिकाणी विश्वास नाही. 5:9पाहा योहान 3:36; प्रेषि 5:32; रोम 1:5; 2 थेस्स 2:8आणि प्रेषि 22:10ची टीप पाहा. सर्व काही त्यागून एखाद्या नव्या ठिकाणी जाणे, ही व्यक्तीची जुनी जीवन-शैली व विश्वास त्यागणे दर्शविते (तुलना करा लूक 14:33; 18:28,30; 2 करिं 6:17-18) परंतु आपली यात्रा आरंभ करून याबद्दल काही ज्ञान नसणे की आपण कोठे जात आहोत आणि काय करीत आहोत, हा मूर्खपणा नाही काय? मनुष्याच्या बुद्धीला कदाचित हा मूर्खपणा वाटत असेल, परंतु विश्वासासाठी आणि मोठ्या ज्ञानासाठी हा मूर्खपणा अजिबात नाही.

***11:9-10** उत्प 12:6-9अब्राहामाचे तंबूत राहणे व बहुतेक एका स्थानापासून दुसऱ्या स्थानास स्थलांतर करणे, विश्वास व यात्रा यामधील संबंध दर्शवतो. वचन 13-16 पाहा. अब्राहामाचे डोळे अनंत जीवनाकडे (स्वर्गातील )लागलेले होते, म्हणून त्याने आपली दृष्टि या जगाकडे लावली नाही. तुलना करा 1 पेत्र 2:11.विश्वासींचा दृष्टिकोन असाच असावा. कारण त्यांची नेहमी कायमची टिकणारी संपत्ति व नागरिकता स्वर्गाचीच आहे. (10:34; मत्त 6:19-20; फिलि 3:20). विश्वासाद्वारे लोक ही गोष्ट समजतात, ओळखतात, की हे जग त्यांचे घर नाही, परंतु या मार्गावर चालणारे ते केवळ एक प्रवासी/यात्री आहेत, आणि त्यांचे खरे घर स्वर्गात आहे जे परमेश्वराचे नगर आहे, या सत्य गोष्टीत ते आनंदित व समाधानी होतात (12:22; गल 4:26; प्रकटी 21:2).

***11:11-12** उत्प 15:4-6; 21:1-5; रोम 4:18-21.हे सत्य आहे की अब्राहामाने परमेश्वराच्या प्रतिज्ञेवर व वचनांवर विश्वास ठेवला की त्याला व त्याची पत्नी सारेला संतान होईल. पुत्राचे वचन देत असतांना, सारेच्या विश्वासाविषयी काहीच म्हटले गेले नाही. उत्प 18:10-15पाहा. इब्रीच्या लेखकानुसार नंतर तिने सुद्धा विश्वास केला. विश्वास व फळ-दायकता, विश्वास व दिसणारी अशक्यता (मत्त 17:20) यांच्या मध्ये जो संबंध आहे, तो त्या दोघांच्या विश्वासावरून आपण पाहू शकतो.

***11:13** तो एका अशा विश्वासाचा नमूना आहे जो शेवटपर्यंत कायम असतो (10:39)

दुनियेबाहेरचे[*] आहोत. 14 जे असे बोलतात ते ठळकपणे स्पष्ट प्रगट करतात, की ते गांर्भियाने स्वदेशाविषयीची चाह बाळगणारे
आहेत. 15 ज्या देशातून ते बाहेर पडले होते, त्याचा विचार केला असता, तर त्यांना पुन्हा तेथे परत जाण्याची संधी होती! 16 परंतु ते
एका उत्तम स्वर्गीक देशाचे इच्छुक असल्यामुळे, परमेश्वर स्वतःस ‘त्या लोकांचा परमेश्वर’असे म्हणवून घ्यावयास लाजत नाही,
यास्तव त्या लोकांसाठी त्याने एक नगर तयार केले आहे.
17 [*]अब्राहामाने पारख होत असताना, विश्वासाने इसहाकाचे अर्पण केले, आणि ज्याने प्रतिज्ञा खरी मानली, 18 व ज्याला असे
सांगितले होते, की इसहाकाचाच वंश तुझा वंश म्हणविला जाईल तोच अब्राहाम आपल्या एकुलत्या एकाचे अर्पण करावयास राजी
होता; 19 कारण परमेश्वर मेलेल्यांतूनही जिवंत करावयास समर्थ आहे, शक्तीने पुन्हा जीवन देणारा आहे या सत्यावर त्याचा भक्कम
विश्वास होता. यास्तव दृष्टांताच्या रीतिनुसार त्याने इसहाक पुन्हा प्राप्त केला, नव्हे इसहाक मिळवून घेतला.
20 [*]विश्वासाने याकोबास व एसावास पुढे (भविष्यांतील) येणाऱ्या गोष्टींविषयीही आशीर्वाद मिळाला.
21 याकोब मरत असताना, विश्वासानेच त्याने योसेफाच्या दोन्ही मुलांना एक एक आशीर्वाद दिला, व काठीच्या टोकाचा आधार
घेऊन त्याने आपल्या परमेश्वराची आराधना केली.
22 [*]विश्वासाद्वारेच योसेफाने आपल्या मरतेवेळी इस्राएलाने निघून जाण्याविषयीची चर्चाही केली व आपल्या हाडांविषयीची आज्ञा
दिली.
23 [*]मोशेच्या आईबापाचा विश्वास परमेश्वरावर असल्यामुळे, त्याचा जन्म झाल्यानंतर त्यांनी त्याला तीन महिने लपविले. त्यांनी
पाहिले की बाळ देखणे आहे, विश्वासाठायी त्यांना राजाज्ञेची भीति देखील नव्हती.
24 [*]मोशे प्रौढ झाला, आपल्या विश्वासाखातर त्याने फारोच्या कन्येचा पुत्र म्हणविणे नाकारले, 25 कारण गुन्ह्याच्या थोडक्या

---

[*] *“परदेशी व दुनियाबाहेरचे”*वचन 9,10 केवळ अब्राहामच नाही, पण ज्या सर्वांची नांवे येथे आली आहेत, ते सर्व जण याच प्रकारच्या ज्ञानाचे, याच संमजसपणाचे व अशाच दृष्टिकोनाचे होते. आशा केलेल्या गोष्टी, म्हणजेच अदृश्य गोष्टी (वचन 1) या त्यांचे विचार, इच्छा व विश्वास यांचे मोठे लक्ष्य होते.

[*]**11:17-19** उत्प 22:1-19च्या वर्णन केलेल्या घटनेत आपण अनेक सीमांची मर्यादा पाहू शकतो. उदा.परीक्षा होत असतांनाचा विश्वास आणि विजय, कठीण समयी, विश्वास, आणि आज्ञापालन, विश्वास आणि पुनरूत्थान, विश्वास आणि न बदलणारी (स्थिर) परमेश्वरपित्याची प्रतिज्ञा. उत्प 21:12यात परमेश्वरबापाने दिलेले वचन पूर्ण होण्यासाठी, इसहाकाचे जिवंत राहणे आवश्यक होते. अब्राहामाला विश्वास होता की जर त्याने इसहाकाला बलि म्हणून अर्पण केले, तरी परमेश्वर त्याला मेलेल्यांतून जिवंत करील, आणि परमेश्वर या प्रकारे आपली प्रतिज्ञा, आपले वचन पूर्ण करील. विपरित परिस्थिती असतांनाही, खरा विश्वास दृढ व कायम असतो.

[*]**11:20** उत्प 27:27-40हा विश्वास आणि आशा केलेल्या वस्तुं (वचन 1) यांच्यामधील संबंध दर्शवितो.

[*]**11:22** उत्प 49:1-28; 50:24-25.याकोब व योसेफाद्वारे आपल्याला अशा प्रकारचा विश्वास पाहायला मिळतो, की मरेपर्यंत विश्वासात कायम दृढ राहावे, नीट ओळखून घ्यावे की परमेश्वराने केलेली प्रतिज्ञा भविष्यात पूर्ण होईलच. (वचन 13) याकोबाचा विश्वास त्याच्या जीवनाच्या शेवटल्या टप्प्यातच जास्त तीव्रतेने चमकला होता. मृत्युचा समय जवळ असला तरी, खरा विश्वास डळमळत नाही (10:39). ज्या लोकांना हे पत्र लिहिले गेले होते, त्यांना येणाऱ्या समस्यांमुळे आपला विश्वास त्यागण्याची इच्छा झाली होती का? विश्वासापासून माघार घेण्याची त्यांची तयारी होती कां? अशा लोकांनी आपल्या पूर्वजांकडे दृष्टि लावावी. त्यांनी (पूर्वज) किती भयंकर पिडेतून आणि संघर्षातून जाऊन त्या सर्व गोष्टींचा सामना केला होता? विश्वासाने परमेश्वर, लोकांना या सर्व गोष्टी प्राप्त करण्यायोग्य व समर्थ करतो (बनवतो).

[*]**11:23** निर्ग 1:22; 2:2; प्रेषि 7:20. त्यांनी अर्थात मोशेच्या आईवडीलांनी परमपिता परमेश्वरावर विश्वास ठेवला म्हणूनच त्यांना राजाच्या आज्ञेची भीति वाटली नाही. दृढ विश्वास भयांवर जय प्राप्त करतो - 13:6; मत्त 8:26; मार्क 4:40; प्रेषि 4:13.

[*]**11:24-26** निर्ग 2:11,13; प्रेषि 7:23-26.मोशे 40 वर्षांचा असतांना त्याने मिसर आणि परमेश्वर यांच्यामध्ये निवड केली. मिसरची निवड करण्याचा अर्थ होताः संसारिक सामग्री, दौलत, आमोदप्रमोद या सर्वांची निवड करणे; परमेश्वराची निवड करण्याचा अर्थ होता, या दुनियेचे सर्व सुख त्यागणे आणि मिसर देशात गुलाम लोकांबरोबर दुःख भोगणे. तो ही निवड यासाठी करू शकला कारण त्याच्याजवळ विश्वास होता आणि एखाद्या गोष्टीला 'योग्य मूल्य' देण्यासाठी, हाच विश्वास लोकांची मदत करतो. भविष्यातील परमेश्वरी आणि अदृश्य गोष्टी, त्या गोष्टींपेक्षा श्रेष्ठ आहेत, ज्या जग आपल्याला देते, विश्वास याच सत्याविषयी आपल्या अंतःकरणाला प्रभावित करतो. मोशे हा 'विश्वास व त्यागले जाणे' यांच्यामधील जो संबंध आहे, त्याचा नमूना आहे. पाहा 10:34; लूक 14:33; 18:28-30; मत्त 4:18-22; 10:37-39; 16:24-28.सत्य-विश्वास, ख्रिस्तांसाठी प्रत्येक प्रकारचे बलिदान करण्यासाठी तत्पर असतो. जे बलिदान व त्याग करण्यास तयार नाहीत, पण म्हणतात की त्यांच्याजवळ विश्वास आहे, आणि इतर दुसरे लोक जरी त्यांच्याविषयी साक्ष देत असतील, की होय ते विश्वास ठेवतात तरी वास्तविक गोष्ट हीच आहे की अशा लोकांजवळ

दिवसांच्या सुखापेक्षा, परमेश्वराच्या लोकांबरोबर दुःख सहन करणे त्यास सर्वोत्तम वाटले; [26] ख्रिस्तांसाठी (परमेश्वर) निंदीत होणे, ही मिसर देशातील भांडारांपेक्षा प्रचंड विशाल संपत्ति आहे हे त्याने ओळखून घेतले, व विश्वासाठायी त्याची दृष्टि प्रतिफळावर केंद्रित झाली होती.

[27] राजाच्या क्रोधाची पर्वा न करता*, विश्वास बाळगून त्याने मिसर देश सोडला, व अदृश्य ते, जणू दिसत असल्यागत विश्वासाठायी तो मजबूत राहिला.

[28] *मोशेने विश्वास राखूनच वल्हांडण सण व रक्तसिंचन - विधि पाळली, जेणेकरून प्रथम नाश करणाऱ्याने इस्राएलावर हात घालून, प्रथम जन्मलेल्यांचा नाश करू नये.

[29] *विश्वास धरून इस्राएली लाल समुद्र असा पार करून गेले, जणू काय कोरड्या भूमिवरून जाताहेत, व मिसऱ्यांनी तसेच करण्याचा जेव्हा प्रयत्न केला, तेव्हा ते सर्व बुडून मरण पावले होते.

[30] *यरीहोच्या नगरभिंती, विश्वासाने सात दिवस फेऱ्या घातल्यानंतरच कोसळल्या होत्या.

[31] *विश्वासाने रहाब आज्ञाभंग करणाऱ्या लोकांबरोबर* नाश पावली नाही कारण तिने विश्वसनीयतेने हेरांना (जासूद) सुरक्षा बहाल केली होती.

[32] *आता आणखी कोणाचा उल्लेख करू? काय सांगू? गिदोन, बाराक, शमशोन, इफताह, दावीद, शमुवेल व संदेष्टयांचे वर्णन
करण्याचा आता समय नाहीये. [33] विश्वासान्वयेच त्यांनी राज्यें* पादाक्रांत केली, उचित व न्याय्य कृत्यें केली, प्रतिज्ञेच्या वस्तु
मिळविल्या**, तोंडें बंद केली. [34] अग्नीची* ज्वाळा (जाळ) थंड केली, तरवारींच्या* धारेपासून बचावले, दुर्बल असताना बळवंत

---

बायबलचा खरा विश्वास नसतो, बायबलच्या विश्वासापासून ते दूर आहेत. त्या सर्व लोकांविषयी आपण काय म्हणावे, जे मोशे व पौल यांचा मार्ग त्यागून, ख्रिस्तांसाठी कष्ट सोसणे सोडून, त्याऐवजी जगिक आमोदप्रमोद, संपत्ति व जगाच्या अधिकारामागे जातात, जगाचे अनुयायी होतात? अशा लोकांनी हे सत्य शिकणे गरजेचे आहे. ख्रिस्तांसाठी कष्ट सोसणे हे संसारिक धन संपत्तीपेक्षा श्रेष्ठ आहे. (वचन 26; 13:13; प्रेषि 5:41; 1 पेत्र 4:12-16)

*__11:27__ *“राजाच्या क्रोधाची पर्वा न करता”*- निर्ग 2:14यात लिहिले आहे की, मोशे यासाठी भ्याला कारण त्याच्या कार्याविषयी, ज्याचे वर्णन 11,12 वचनात आहे, ते लोकांना कळले होते. त्याला असे वाटले की त्यामुळे त्याच्या लोकानी आणखी जास्त त्रास होईल. म्हणून या भीतिमुळे तो पळाला, पण आपला जीव वाचवण्यासाठी नाही. भीतिमुळे नाही परंतु विश्वासाने त्याने मिसर देश सोडला. खरा विश्वास नेहमी परमेश्वराच्या एखाद्या वचनावर आधारित असतो. मोशेने मिसर देश यासाठी सोडला होता, कारण त्याला ठाऊक होते की परमेश्वराने त्याला तसे करण्यास सांगितले होते आणि त्याने अदृश्य परमेश्वराला पाहिले, कारण तो विश्वासात दृढ राहिला (10:39; वचन 1; 2 करिं 4:18) विश्वास लोकांना आत्मिक दृष्टि देतो.

*__11:28__ निर्ग 12:1-30 पाहा. येथे परमेश्वरबापाच्या दंडापासून मुक्ति आणि विश्वास दृष्टीस पडतो. तुलना करा वचन 7;9:27-28; 1 करिं 5:7.

*__11:29__ निर्ग 14:15-31येथे विश्वास आणि शत्रुपासून मुक्ति आहे.

*__11:30__ यहो 6:12-20 पाहा येथे विश्वास आणि जे वचन परमेश्वराने दिले, ते विश्वासाने घेण्याविषयी सांगितले आहे. तुलना करा यहो 1:3; 1 योहान 5:14-15; मार्क 11:24.

*__11:31__ यहो 2:1-21; 6:24-25पाहा. याठिकाणी जो विश्वास आहे तो मोठ्या अपराधांवर आणि अज्ञानावर देखील विजय प्राप्त करतो आणि त्याचबरोबर परमेश्वराच्या दंडापासून सुटकाही देतो. (तुलना करा गल 3:10-14; योहान 5:24).

* *“आज्ञाभंग करणाऱ्या लोकांबरोबर”*ग्रीक शब्द या दोन्ही गोष्टींकडे इशारा करतो, पाहा योहान 3:36.

*__11:32__ जुन्या करारातील इतर अनेक उदा. लेखकाने दिली असती, पण ते आवश्यक नव्हते. त्याने हेच दाखवले की खरा विश्वास काय आहे व तो काय करतो. तो येथे विश्वासाच्या अनेक योद्धांचे वर्णन करतो आणि दाखवतो की त्यांच्या विश्वासाने, कशा प्रकारे कार्य केले कसे प्राप्त केले आणि त्यांचा कसा सांभाळ पण केला. (वचन 4 टीप) ही वचनें दाखवतात की जुन्या कराराच्या विश्वासींनी कोणत्या गोष्टी प्राप्त केल्या, आणि त्या आठ गोष्टी ज्या त्यांनी सहन केल्या, त्यांच्या विश्वासाविषयी जो अपेक्षित वस्तूंच्याप्रत होता, ज्याद्वारे त्यांना ते सर्व सहन करण्याची योग्यता मिळाली, जे त्यांनी सहन केले.

*__11:33__ *“राज्यें”*- गण 21:23-35; यहो 12:7-24; 2 शमु 8:1-14.

* *“प्रतिज्ञेच्या वस्तु मिळविल्या”*- जुन्या करारातील प्रतिज्ञा यासाठी दिल्या गेल्या, कारण परमेश्वराने पाहिले की त्या प्राप्त करण्यासाठी कोणी न कोणी (अधिकारी) व त्यावर विश्वास करण्यासाठी, त्या वेळी या पृथ्वीवर होता.

* *“सिंहांची”*- दानी 6:16-22.

*__11:34__ *“अग्निची”*- दानी 3:19-27.

झाले.*, लढाईत पराक्रमी ठरले, परक्या फौजां मारून त्यांची पिछेहाट केली.
[35] स्त्रियांनी आपले मेलेले, पुन्हा जिवंत.* असे प्राप्त केले. किती तरी (विश्वासी) मार खात खात यासाठी मरण पावले, की उत्तम
पुनरूत्थानाचे.* भागीदार व्हावे म्हणून त्यांनी आजादीची चाह धरली नाही.*. [36] कित्येकांनी टवाळया व उपहास सहन केला,
चाबकाचे फटके खाल्ले, बंधने व कैदेत.* ठेवण्याद्वारे पारखले गेले.*. [37] त्यांना दगडमार केला.*, करवतीने चिरले.*, त्यांची परीक्षा
घेतली, तरवारीने मारले. अनेक जण गरीबीत आणि त्रासलेल्या.* अवस्थेत, दुःख व क्लेश सहन करीत, मेंढरांबकऱ्यांची कातडी
पांघरून पिडीत राहून इकडेतिकडे भटकत राहिले. [38] *जंगलांत, डोंगरात, गुहेंत व पृथ्वीवरच्या विवरांत राहून कसेबसे जगले.
[39] *दुनिया त्यांच्या योग्य राहिली नव्हती, परंतु त्यांच्या विश्वासामुळेच या सर्वांनी उत्तम साक्ष मिळवली, परंतु तरी अभिवचनानुसार
त्यांना प्रतिज्ञेच्या वस्तु.* त्या समयी मिळाल्या नव्हत्या. [40] कारण याहवेने (अब्बा) आपल्या सर्वांसाठी, अगदी प्रारंभापासूनच एक
सर्वोत्कृष्ट.* बाब नेमून ठेवलेली होती, ती अशी की त्यांनी (विश्वासीं) आपल्याबरोबरच प्रतिज्ञेच्या त्या वस्तु प्राप्त कराव्यात.

# 12

[1] *मग या कारणामुळे की साक्षींच्या.* एवढ्या मोठ्या मेघाने आपण वेढलेले आहोत, तर या असे प्रत्येक ओझे व जाळयात सहज

---

* *“तरवारींच्या”*- 1 शमु 17:45-50
* *“बळवंत झाले”*- 2 इति 14:11; यश 40:31तुलना करा 2 करिं 12:9-10
* **11:35** *“आपले मेलेले, पुन्हा जिवंत”*- 1 राजे 17:24; 2 राजे 4:32-37.
* *“उत्तम पुनरूत्थानाचे”*- अनंत जीवनासाठी, भविष्यातील पुनरूत्थान.
* *“आजादीची ...नाही”*- ज्या वेळी दुष्टता व अविश्वास यांच्याबरोबर समझोत्याची गोष्ट होती, तेव्हा त्यांनी त्यापासून सुटका स्वीकारली नाही.
* **11:36** *“कैदेत”*- उत्प 39:20; यिर्म 37:15-16; 38:6.
* *“पारखले गेले”*- ही गोष्ट त्या काळातील सर्वच विश्वासींसाठी आणि विश्वासाच्या वीरांविषयी सत्य आहे. या सूचीत दिलेल्या गोष्टींसाठी (विषयी)कदाचित सर्वांची परीक्षा होणार नसेल, परंतु आपण सर्व अनेक इतर परीक्षा व प्रलोभनांचा सामना करू.
* **11:37** *“दगडमार केला”*- मत्त 23:27
* *“करवतीने चिरले”*- असे मानले जाते की यशया सोबत असेच झाले.
* *“गरीबीत...... त्रासलेल्या”*- बहुधा इतिहासात झालेल्या सर्वोत्तम लोकांविषयी ही गोष्ट सत्य आहे. तुलना करा योहान 15:18-21; 16:2-3,33; रोम 8:35-37; 1 करिं 4:11-13.
* **11:38** जगाने त्यांच्याशी या प्रकारे व्यवहार केला, जणू काही ते त्या योग्यच होते की काय? परंतु सत्य या विरूद्ध होते. ते पृथ्वीवर कोणतेही घर प्राप्त करू शकले नाहीत, परंतु परमेश्वराने त्यांच्यासाठी स्वर्गात घर तयार केले होते.
* **11:39-40** "उत्तम साक्ष" - वचन 2
* *“प्रतिज्ञेच्या वस्तु”*- वचन 10,16. लेखक प्रतिज्ञा केलेल्या वस्तूंकडे इशारा करीत आहे, जे ख्रिस्त घेऊन येणार होते. 1:14; 6:12; 9:15.
* **11:40** *“सर्वोत्कृष्ट”*- यात त्या सर्व गोष्टी समाविष्ट आहेत, ज्या या पत्रात दिसतात - 7:19; 8:6; 9:23. परमेश्वराची योजना होती आणि आहे देखील, की जे विश्वासीं ख्रिस्त येण्यापूर्वी जिवंत होते आणि ज्यांनी नंतर विश्वास केला, त्या सर्वांनी एकत्रच प्रतिज्ञेच्या त्यां वस्तुं प्राप्त कराव्या. ख्रिस्तांचे बलिदान, त्यांच्यासाठी जे आधी होते व आपल्यासाठी, सारखेच आहे, त्याचप्रमाणे ते कोणत्याही व्यक्तीच्या सिद्धतेसाठी एक उपाय देखील आहे. 10:14; रोम 3:25-26;संपूर्ण सिद्धता ख्रिस्तांच्या आगमनानंतर प्राप्त होईल.
* **12:1-2** येथे आपल्याजवळ साक्षीदारांची एक मोठी गर्दी आहे (अध्याय 11 चे विश्वासीं), आपल्याला बाधक असणाऱ्या गोष्टींपासून दूर राहायचे आहे (गुन्हा, इतर). ज्या धावेत आपण धावत आहोत, त्यांचा अर्थात येशू ख्रिस्तांचा सिद्धांत (धीराने लावणे) आणि तो मोठा आदर्श, त्याच्याकडे आपल्याला पाहायचे आहे . लेखक सांगू इच्छितो की शेवटी एक मोठा पुरस्कार असेल.
* *“साक्षींच्या”*- ग्रीक भाषेत याचा अर्थ आहे, ते लोक जे त्या सर्व गोष्टींची साक्ष देतात, ज्या त्यांनी पाहिल्या किंवा अनुभवलेल्या आहेत. बायबलमध्ये आपण जेथे कोठे पाहतो, तेथे हे साक्षीदार, अध्याय 11चे विश्वासीं दिसतात. पवित्र वचनांच्या पानांतून ते आपल्याला पाहतात आणि आपल्याला साक्षही देतात. ते सांगतात की विश्वासाचे जीवन चांगले आहे, कल्याणाचे आहे, त्याचे

गुंतवणारे गुन्हें.* दूर सारून, ज्या धावेत आपल्याला धावणे अपेक्षित आहे ती धाव आपण धीराने पूर्ण करू या; [2] विश्वासाचा प्रारंभ.* करणारे व तो मजबूत करणारे येशू यांच्याकडे आपण निरंतर पाहात राहू.*, ज्यांनी त्या आनंदासाठी.* जो त्यांच्यापुढे होता, लज्जा.* तुच्छ मानून वधस्तंभाची पीडा सहन केली आणि परमेश्वरी अधिकार, अर्थात थेट राजासनापर्यंत जे जाऊन पोचले.* आहेत.
[3] *लक्ष द्या, तुम्ही निराश होऊन धीर सोडू नये कारण आपल्याविरूद्ध गुन्हेंगारांनी केलेला प्रचंड विरोध.* (शत्रूत्व) त्यांनी सहन केला. [4] *तुम्ही गुन्ह्यांशी झगडत असता, सामना करीत असता, तरी तुम्हांस त्याचा असा मुकाबला करावा लागला नाही, की तुमचे

---

पुरस्कार मोठे आहे आणि हे देखील , की प्रत्येक बाधादायक गोष्टींवर विजय प्राप्त केला जाऊ शकतो .

* *“गुंतवणारे गुन्हें”*- ज्या गोष्टी आपला वेग कमी करतात, आपले लक्ष भंग करतात, बाधक होतात, धावणे अवघड करतात, धावण्यात समस्या व अडथळें निर्माण करतात किंवा आपणा जिंकण्याचा निर्णय आपल्यापासून हिसकून घेतात, या सर्व गोष्टी आपल्या विश्वासाच्या धावेत, अडचणी आणतात, बाधा आणतात. या गोष्टी, म्हणजे आळस, सांसारिकपणा, अनुशासनाचा अभाव, निराशा किंवा इतर काही स्वरूपाच्या असू शकतात. सर्वात मोठी बाधा ‘गुन्हा” हा आहे. विशेषतः गुन्ह्याविषयी, अपराधाविषयी लेखक आपल्याला सचेत व सावध करतो. “सहज गुंतवणारे गुन्हें"- गुन्हा जो सोप्या रीतिने आपल्याला फसवतो, जाळयात अडकवतो” लेखक अविश्वासाकडे इशारा करीत आहे असे वाटते. काही लोकांचे म्हणणे आहे, की तो प्रत्येक प्रकारच्या अपराधांकडे इशारा करीत आहे. विश्वासींच्या गर्दीत, समूहांत, 'अविश्वास'ही सर्वात मोठी बाधा आहे आणि प्रत्येक धावकाच्या टाचेला ती बोचते.

* **12:2** *“प्रारंभ”*- जर आपल्याजवळ विश्वास आहे तर, येशू (प्रभूजी) तो विश्वास उत्पन्न करणारे आहेत (इफि 2:8; फिलि 1:29).

* *“येशूं ......राहू”*- येशू स्वर्गात आहेत, पण विश्वासाने आपण आपले डोळे त्यांच्याकडे लावू शकतो. (11:1,27; 2 करिं 4:18).

* *“आनंदासाठी”*- समोरासमोर येईपर्यंत, त्या दिवसापर्यंत आपला विश्वासाला वाढवणारे येशूंच आहेत (10:39; लूक 22:32; फिलि 1:6). जे कार्य त्यांनी आरंभिले, ते तेच पूर्ण देखील करतील. येशू कशा प्रकारे सहन करू शकले-2 करिं 5:21; 1 पेत्र 2:24; यश 53:5,10."आनंदासाठी"-दुसऱ्या बाजूला आनंदत्यांच्या प्रतिक्षेत होता. (स्तो 16:11) त्यांचा आनंद काय होता? कदाचित पिता परमेश्वरास प्रसन्न करणे आणि आपले कार्य समाप्त करणे (योहान 4:34), कदाचित अनेक पुत्रांना/मुलांना/बालकांना गौरवाने येतांना पाहणे (2:11), अनंत मुक्तीच्या प्राप्तीसाठी, अपराध्यांसाठी एक मार्ग उघडणे (लूक 15:7,10)

* *“लज्जा”*- वधस्तंभावरचे मरण सर्वांत जास्त लज्जास्पद होते.

* *“पोचले”*- 10:12; 1:3.

* **12:3** विश्वासाच्या जीवनात, एखाद्या विश्वासीसाठी, येशू हे सर्वात उत्तम उदाहरण आहेत. (1 पेत्र 2:21-23) त्याच्या विचारांनी आपले मन भरून घेणे हे विश्वासीच्या धावेतील खूप मोठे प्रोत्साहन आहे. पाहा 3:1; कल 3:12.

* *“विरोध”*- मत्त 9:3,34; 12:14,24; 21:23,46; 22:15; 26:3-4,14-16,47-50,65-68; 27:20-23,27-31,35-44.

* **12:4** विश्वासाचे जीवन केवळ एक धावच नाही तर ते एक युद्ध देखील आहे (इफि 6:10-18; 2 तीम 2:3; 4:7) गुन्हा हा आपला शत्रु आहे. हा गुन्हा आतून व बाहेरून लढत असतो. (1 योहान 1:8; रोम 7:17-18) गुन्ह्याविरूद्ध युद्ध थांबवणे म्हणजे समस्येला आहवान देणे. 12:5-13आपल्या विश्वासाखातर त्यांनी प्राण दिले नसले, तरी अनेक विश्वासींनी,त्यांच्यासाठी त्याच प्रकारे दुःख सहन केले (वचन 4) (10:32-34) येशूंनी, यहूदी धर्माच्या गोष्टीं सोडल्यामुळे परमेश्वर त्यांच्यावर अप्रसन्न झाले आहे म्हणूनच हे कष्ट भोगावे लागत आहे असे कदाचित अविश्वासी यहूद्यांनी त्यांना टवाळया मारून, व उपाहास करून म्हटले असेल. ख्रिस्ती लोकांच्या जीवनात जे कष्ट, पीडा, त्रास, क्लेश, समस्या, संघर्ष येतात ते सर्व परमेश्वराच्या प्रेमाचे प्रतिक आहेत, परमेश्वरबापाच्या अप्रसन्नतेचे नव्हे. ही गोष्ट लोकांनी समजून घ्यावी असे लेखकाला वाटते. परमेश्वर त्यांना अनुशासित करीत होता, कारण तो आपले संतान अनुशासित करतो आणि त्यांच्या कल्याणासाठी तो वचनबद्ध होता. येथे आपण शिक्षेविषयी पाच सत्य गोष्टी शिकतो. (अनुशासन आणि शिक्षेद्वारे प्रशिक्षण). पहिला : विश्वासीं यापासून वांचू शकत नाहीत, आपला बचाव करून सुटू शकत नाहीत, प्रत्येक पुत्र ज्याला परमेश्वरबाप ग्रहण करतो, त्याला तो अनुशासित देखील करतो (वचन 6). दुसरा : यासाठी जी पद्धत वापरली जाते त्यांत क्लेश, त्रासदायक आणि छडी मारल्यासारखा अनुभव येतो. यापासून आनंद नाही तर पीडा प्राप्त होते (वचन 11). “छड़ी देखील लगावतो” - हे मत्त 10:17; मार्क 10:34; लूक 18:33यात उपयोगात आलेले आहे. जरी परमेश्वरबाप स्वतः वास्तविक फटक्यांचा उपयोग करीत नाही, तरी त्याची शिक्षा आणि अनुशासन आपल्या हृदयावर अंतःकरणावर या प्रकारे होते जणू काही शरीरावर फटके मारले जातात की काय असे वाटते, त्या पिडेचा आपल्याला अनुभव होतो. लोक आपल्याला खऱ्या फटक्यांची पीडा देऊ शकतात, ज्याचा उपयोग परमेश्वरबाप आपल्या लोकांच्या अनुशासनाखातर करतो. तिसरा : हे अनुशासन एक चिन्ह आहे; यावरून आपण शिकतो, की ज्यांना शिक्षा मिळते ते परमेश्वराचे संतान आहेत. हे या गोष्टीचे सुद्धा चिन्ह आहे की परमेश्वर आपल्याकडे विशेष प्रकारे लक्ष देतो. एक आदर्श पिता जसा करतो तसाच परमेश्वरपिता सुद्धा आपल्या मुलांवर प्रेम करतो व त्याबरोबर अनुशासन

रक्त पाडले जावे, ते सांडावे, 5 [*]आणि जो उपदेश तुम्हांला पुत्रांप्रमाणे दिला जातो, तुम्ही विसरला आहा की “हे माझ्या मुला, प्रभूच्या
शिक्षेचा (क्रोध) अनादर करून ती तुच्छ समजू नको, जेव्हा तो तुझ्यावर भडकेल तेव्हा धीर सोडू नको.” 6 प्रभू ज्यावर प्रेम करतो
त्यांच्यावर ओरडतोही, ज्याला पुत्र म्हणून स्वीकारतो त्याला ओरडा लावून छडी देखील लगावतो.
7 [*]प्रियांनो, दुःख म्हणजे ‘अनुशासन’ अशी जाणीव ठेवून ते सहन करा. परमेश्वर आपल्या पुत्रकन्यांप्रमाणे तुमच्याबरोबर वागत
असतो. असा कोण बाप आहे जो पुत्रकन्येस शिस्त लावण्यासाठी चंपराक लावीत नाही? पुत्रकन्येस पित्याची शिक्षा सहन करावीच
लागते. 8 जर तो राग, ओरडा व अनुशासनाची छडी ज्याचे भागीदार सर्व जण झाले आहेत, व यांवाचून तुम्ही सुटला आहा, तर तुम्ही
पुत्रकन्या नाहीच मुळी, पण व्यभिचाराचे संतान ठरता. 9 ज्याअर्थी, जसा जगिक बाप [*] करीत असे,त्याअर्थी जसे आपण त्याला
भीत [*] असू , तसेच ज्याद्वारे आपण जिवंत राहू, त्या आत्म्यांच्या पित्याच्या [*] आणखी जास्त आधीन रहावयास नको काय?
10 जगिक बाप अल्प ज्ञानाच्या आधारे थोडे दिवस शिक्षा करतात परंतु परमेश्वर आपल्याच हितासाठी [*], अर्थात त्याच्या पवित्रतेचे [*]

---

देखील (वचन 8). काही लोक असा विचार करतात की जर परमेश्वराने आमच्यावर प्रेम केले असते तर त्याने आमच्याशी असा व्यवहार केलाच नसता, परंतु परमेश्वर असे यासाठी करतो की त्याची प्रिती आमच्यावर आहे. चौथा : परमेश्वराद्वारे अनुशासित केले जाण्याचा आणखी एक अद्‌भुत हेतू आहे 'आपले कल्याण, आपली पवित्रता' (वचन 10). पाचवा : जे लोक धीराने प्रतिक्षा करतात (वचन 7) ते आधीन होतात (वचन 9) आणि सहन करीत जातात (वचन 11). त्या सर्वांना त्याचे प्रतिफळ प्राप्त होते. परमेश्वराने केलेले अनुशासन किंवा “अनुशासनाची छडी” या प्रत आपले तीन प्रकारचे व्यवहार असू शकतात. (1) तुच्छ लेखणे (2) अस्वीकार करून हताश होणे (3) किंवा परमेश्वराच्या आधीन होऊन प्रशिक्षण प्राप्त करणे. आपली निवड ही असते की आपण एकतर अस्वीकार करावे किंवा स्वीकार करावे, लेखक याविषयी सांगत नाही की परमेश्वर आपले अनुशासन करण्यासाठी कोणत्या माध्यमाचा उपयोग करतो, परंतु त्याच्या मनात त्या सर्व गोष्टी नव्हत्या का, ज्यांचे वर्णन तो 10:32-34; 11:35-38यांत करतो? 1 करिं 11:29-32; 2 करिं 12:7-10; 1 पेत्र 1:6-7सुद्धा पाहा. तुलना करा - स्तो 66:10-12आणि स्तोत्र 73 पाहा; जेथे परमेश्वरबापाकडे, एकजण आपल्या अनुशासनाच्या समयाचा अनुभव वर्णन करतो.

[*]**12:5-6** नीति 3:11-12; ईयोब 5:17; स्तो 94:12; आणि 119:67,71,75सुद्धा पाहा,

[*]**12:7-8** असे वाटते की खरे, सात्विक विश्वासी, दुसऱ्या इतर लोकांपेक्षा जास्तच समस्यांचा सामना करतात (स्तो 73:2-14) येथे त्याचे कारण देखील आहे. परमेश्वरबाप त्यांच्याशी आपल्या मुलांच्या रूपाने व्यवहार करतो. एक व्यक्ती जो स्वतःला ख्रिस्ती समजतो, त्याने ही चिंता करू नये की परमेश्वर त्याला अनुशासित करीत आहे, याउलट त्याचे अनुशासन झाले नाही तर त्याने अस्वस्थ व्हावे, की परमेश्वरबाप त्याला अनुशासन का करीत नाहीये! कारण परमेश्वरबाप सैनाताच्या मुलांचे अनुशासन करीत नसतो, कारण त्यांवर तर परमेश्वरबापाचा क्रोध भडकलेला असतो म्हणून परमेश्वरपिता त्यांना दंड देतो आणि त्यापैकी प्रत्येकाचा निश्चित समयी न्याय देखील करतो.

[*]**12:9** *“जगिक बाप”*नीति 13:24; 18:18; 22:15; 23:13-14.

[*]*“भीत”*- जेव्हा आईबाप, स्नेहाने आपल्या आवडत्या मुलांचे योग्य वाटले की वेळोवेळी अनुशासन करतात, योग्य वेळी त्यांना दंड देतात, त्या वेळी मुलांना ठाऊक असते की प्रेमाखातर आईबाप तसे अनुशासन करतात; पण कधी कधी मुले हा विचार देखील करतात की आईवडील खरोखर त्यांच्यावर प्रेम करतात किंवा नाही.

[*]*“आत्म्यांच्या पित्याच्या”*- बायबलमध्ये हे केवळ एकदाच वर्णित आहे. (याच्याशी जुळणारी गोष्ट आपल्याला गण 16:22; 27:16यांत वाचायला मिळते) असे वाटते की लेखक पार्थिव पिता व स्वर्गीक पिता यांची तुलना करीत आहे. पार्थिव पिता आपल्या मुलांच्या शरीराला पीडा देतो; पण स्वर्गीक पिता आपल्या संतानाच्या आतील मनुष्यत्वाला बदलण्याच्या प्रयत्नात असतो.

[*]**12:10** *“हितासाठी”*- रोम 8:28

[*]*“पवित्रतेचे”*- परमेश्वरबापाची हीच इच्छा आहे की त्याचे पुत्र/बालक या जगाच्या नैतिक- अशुद्धतेपासून शुद्ध केले जावेत. (2 करिं 6:17) यासाठी की त्यांनी अपराधांचा सामना करावा. (2 करिं 6:17) यासाठी की त्यांनी अपराधांशी युद्ध करून त्यावर विजय प्राप्त करावा; आणि आपले आंतरिक जीवन अधिक पवित्र असे करावे. (मत्त 5:8) हा दृष्टिकोन पुढे ठेवून स्वर्गीक पिता आपल्या बाळांना अनुशासित करतो, पीडा देतो आणि योग्य वाटल्यास शिक्षा पण करतो. जेव्हा समस्येतून या प्रकारचे प्रतिफळ मिळते तेव्हा त्यांचे स्वागत केले पाहिजे. परमेश्वराची पवित्रता आणि त्याच्या भरपूरीचे भागीदार होण्यात व आपल्या शुद्धीकरणाच्या प्रक्रियेत जर आपल्याला काही पीडा सहन करावी लागत असेल तर काहीच हरकत नाही. येथे पाहा, की परमेश्वरबाप आपल्या पवित्रतेचे भागीदार होण्यासाठी, आपल्या मुलांना कशा प्रकारे योग्यता देतो. केवळ एकच असाधारण अनुभव, आपल्या जीवनात लागू करून परमेश्वरबाप तसे करत नाही, तर तो अनुशासित करण्याचे कार्य सतत, निरंतर चालू ठेवतो आणि नि:संदेह आपण या जगाचा निरोप घेईपर्यंत तो हे कार्य चालूच ठेवील. ईयोब 3:20ची टीप स्पष्ट करते की अनुशासनाचे आणखी काही फायदे आहे.

व समानतेचे भागीदार आपण व्हावे म्हणून तसे करतो. [11] *सद्य काळात हरेक प्रकारची शिक्षा आनंदाची नसते, उलट शोकाची गोष्ट
वाटते. तरीपण जे लोक ती सतत सहन करून पक्के * झाले आहेत, अशा सर्वांना नंतर पुढे योग्य जीवनशैलीचे समर्पक प्रतिफळ प्राप्त
होते.
[12] म्हणून * आता प्रियांनो, थकलेले व लोंबकळणारे हात आणि दुर्बल व लटपटणारे गुडघे ताठ आणि सरळ करा *. [13] आपल्या
पायांसाठी सरळ मार्ग तयार करा *, यासाठी की लंगड्याने (कमजोर विश्वासी) भटकू नये *, पण बरे व्हावे.
[14] सर्वांबरोबर मेळ व शांति * राखण्याचा प्रयत्न करा, पवित्रतेचे * शोधक व्हा *, कारण पवित्रतेवांचून कोणीही प्रभूला पाहू
शकणार नाही, [15] कारण असे होता कामा नये की एखाद्याने दूर जावे. लक्षपूर्वक पाहत रहा *, की एकानेही परमेश्वरी कृपेपासून
वंचित राहू नये; कडूपणाचे कोणतेही मूळ अंकुरित होऊन त्याद्वारे दुःख मिळावे व अनेकांनी अशुद्ध व्हावे असे होऊ नये, याविषयी
हमखास लक्ष द्या, [16] *म्हणून ज्याने एका घासाबद्दल आपले ज्येष्ठत्वाचे पद विकले त्या एसावासारखा कोणी व्यभिचारी किंवा

---

***12:11** हेच एक प्रतिफळ आहे, ज्याची इच्छा सर्व विश्वासींना होत असते (मत्त 5:6) म्हणूनच अनुशासन, पीडा आणि शिक्षा ज्यांचा उपयोग परमेश्वरबाप, हे फळ उत्पन्न करण्यासाठी करतो ते आपण ग्रहण केले पाहिजे.

**“सहन करून पक्के”*- समस्या व दुःख या कारणामुळे आपण स्वतः दुःखाचा अनुभव करतो आणि निराश होऊन जातो, याऐवजी आपण आपले स्वपरिक्षण करून, पिडेचे कारण शोधावे आणि स्वतःमध्ये आवश्यक ती सुधारणा करावी. विलाप 3:40शी तुलना करा.

***12:12** *“म्हणून”*- लेखक विश्वासींना चार गोष्टी करण्यास सांगतो “सरळ करा” (वचन 12) “सरळ मार्ग तयार करा (वचन 13), “शोधक व्हा” (वचन 14), “लक्षपूर्वक पाहत रहा” (वचन 15). जर परमेश्वरी अनुशासन काही अपेक्षेने होत असेल तर आपण केवळ निष्क्रिय राहून चालणार नाही, त्या ऐवजी पूर्णरूपाने आपण परमेश्वरबापाला सहकार्य द्यावे.

***12:12** *“सरळ करा”*- जर एखाद्याचे गुडघे लटपटत असतील आणि हात लोंबकळत असतील, तर असा व्यक्ती कशा प्रकारे धावेत भाग घेऊ शकेल? (वचन 1) ख्रिस्तांठायी परमेश्वराजवळ, आपल्यासाठी सामर्थ्य आहे आणि आपण याचा उपयोग कसा करावा हे शिकावे. पाहा स्तो 29:11; 73:26; 105:4; इफि 1:18-19; 6:10; कल 1:11-12,29.

***12:13** *“सरळ मार्ग तयार करा”*- नीट धावण्यासाठी सरळ व सपाट, समतल मार्गाची गरज असते. आपल्याला असा मार्ग प्राप्त होतो किंवा नाही, हे आपल्यावरच अवलंबून आहे. आपल्या जीवनात जर आपण दुष्टता कायम ठेवली तर आपण विजयी ठरू शकणार नाही.

**“लंगड्याने भटकू नये”*- नीति 4:25-27जर आपण परमेश्वरबापाच्या आधीन झालो तर परमेश्वराच्या अनुशासनाच्या मार्गावर, नक्कीच खातरीने आपण बरे व स्वस्थ होऊ शकतो. दुःखाची गोष्ट हीच आहे की पुष्कळ विश्वासी/ख्रिस्ती लोक, लंगड्या पायांनी धावण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**“मेळ व शांति”*- मत्त 5:9; रोम 12:18.

**“पवित्रतेचे”*- वचन 10. पवित्रतेसाठी प्रयत्न आवश्यक आहे. “शोधक" (रोम 8:13; 1 करिं 9:27; 2 करिं 7:1; गल 5:16-18; इफि 4:22-32; कल 3:5; इब्री 12:4,10-13; 1 पेत्र 1:13-16; 2 पेत्र 1:5-8) आपण पवित्रतेच्या मागे लागावे, या जाणीवेने की तसे करणे योग्य आहे. पवित्रता एक अति आवश्यक गोष्ट आहे. (मत्त 5:8; 1 करिं 6:9-11) जे लोक, जग शरीर व सैतानानुसार जगतात आणि स्वतःला ख्रिस्ती म्हणतात व परमेश्वराच्या पवित्र स्वर्गात स्वागताची अपेक्षा करतात, ते भयानक व भयंकर रीतिने आश्चर्यात पडतील. (लेवी 20:8; योहान 17:17-19यात पवित्रतेचे नोट्स पाहा)

***12:14** *“शोधक व्हा”*- पुन्हा एकदा आपण बघतो, की आपल्या वैयक्तिक प्रयत्नाचा यात समावेश आहे. जीवनात निरर्थकपणे लाटांनी वाहून जाणाऱ्या, जीवनाचे स्वप्न आपण पाहू नये.

***12:15** *“लक्षपूर्वक पाहत रहा”*- हे शक्य आहे की चर्चचे काही लोक परमेश्वराच्या कृपेपासून अजाण राहतील. तुलना करा 2 करिं 6:1; गल 5:4,7.लेखक 'पवित्रता'हा विषय पुढे चालूच ठेवतो. त्याला ठाऊक आहे की पवित्र होण्याचा एकमात्र उपाय परमेश्वराची कृपाच आहे आणि जर एखादा व्यक्ती याकडे दुर्लक्ष करतो तर तो या एका मार्गासंबंधी अज्ञानी राहील. जर सावधगिरी बाळगली नाही तर कोणत्याही चर्चमध्ये भांडण-तंटा-विभाजन, वाईट बोलणे, बदला/सूड घेणे इ. होऊ शकते, ज्यामुळे पूर्ण चर्च प्रभावित होईल. काही सीमेपर्यंत करिंथ आणि गलती येथील मंडळ्यांत असेच होत होते.

***12:16** अशा पुष्कळशा गोष्टी आहेत ज्यां आपण चर्चमध्ये पाहणे आवश्यक आहे, ज्यांचे आपण अवलोकन केले पाहिजे. बायबलमध्ये आपण चुकीच्या मार्गावर चालण्याच्या संभावना व त्यांचे परिणाम पाहू शकतो. “एसावासारखा” उत्प 25:24-34.तो अशा लोकांचा नमूना आहे, जे कृपेपासून वंचित राहतात. एसावाने जन्माच्या अधिकारांचे तसेच त्याशी जुळणाऱ्या प्रतिज्ञांचे महत्व जाणले नाही.

वाकडा * होऊ नये. [17] तुम्हांला ठाऊक आहे की त्यानंतर * जेव्हा त्याने आशीर्वादाची कामना केली तेव्हा तो अयोग्य गणला गेला, अश्रू ढाळून ढाळून इच्छा असतानाही त्याला मनबदलाची संधी * पुन्हा मिळालीच नाही.

[18] परमेश्वराने सीनाय पर्वताव र नियमशास्त्र दिले होते, त्या समयी पेटलेला अग्नी, अंधार, मेघांचा काळोख व वादळ होते, तशा पर्वताजवळ तुम्ही आला नाही *; [19] *ना तुम्ही कर्णा वाजतो तशा हादरून टाकणाऱ्या आवाजात, प्रचंड भयचकित करून टाकणारा संदेश ऐकला, व असेही झाले नाही की तुम्ही परमेश्वरास विनंती करून म्हटले की त्याने तुमच्याशी बोलू नये! [20] परंतु ते परमेश्वराची ती आज्ञा सहन करू शकले नव्हते,'की जर एखादा पशु पर्वतास स्पर्श करील तर त्यास दगडमार केला जावा.' [21] *आणि ते भीतिदायक दर्शन पाहून मोशेही म्हणाला, "मी अति भयभीत झालो व थरथर कांपतो आहे."

[22] तुम्ही तर सीयोन पर्वताजवळ *, जिवंत परमेश्वराचे नगर स्वर्गीक यरूशलेमेजवळ *, [23] लाखों स्वर्गदूत व ज्येष्ठांची * साधारण सभा * व चर्च ,ज्यांची नांवे स्वर्गात लिहिली * आहेत आणि सर्वांचा न्यायी * परमेश्वर, मुक्ति प्राप्त झालेल्यांचे आत्में * जे निर्दोषी ठरविले गेले, [24] नव्या कराराचे * मध्यस्थ येशू व शिंपडण्याचे ते रक्त * जे हाबेलाच्या * रक्तापेक्षा उत्तम बोलते, त्या रक्ताजवळ आला

---

* *"वांकडा"*- ग्रीक शब्दाचा अर्थ आहे 'अशुद्ध'एसाव असाच व्यक्ती होता, ज्याला आत्मिक गोष्टीत काहीच रूचि नव्हती. शरीरावर मन लावणाऱ्या लोकांचा नमूना तो आहे (रोम 8:5-8), जे परमेश्वराला प्रसन्न करण्याऐवजी स्वतःला खुश करतात. आपल्या चर्चमध्ये आणि चर्चच्या पुढाऱ्यांमध्ये आज असे लोक नाहीत काय? जोपर्यंत अशा लोकांच्या जीवनात पूर्ण बदल होत नाही, त्यांचा अंत एसावासारखाच होईल. ते परमेश्वराद्वारे तुच्छ लेखले जातील. तुलना करा मलाखी 1:3.

* **12:17** *"त्यानंतर"*- उत्प 27:30-40.

* *"मनबदलाची संधी"*- कदाचित याचा अर्थ असा आहे की त्याने आपल्या पित्याचे मन, ज्याने याकोबाला आशीर्वाद दिला होता बदलण्याचे प्रयत्न केले . काही लोकांचा विचार असा आहे की एसावाने आपले अंतःकरण बदलण्याचा विचार केला पण ते योग्य किंवा बरोबर वाटत नाही.

**12:18** *"सीनाय पर्वतावर"*- या वचनात वर्णित गोष्टी आणि पुढच्या दोन वचनांचे सत्य; निर्ग 19:16-19; 20:18,21;आणि अनु 4:11यांवर अवलंबून आहे.

* *"तुम्ही आला नाही"*- ख्रिस्तांचे विश्वासी होण्याच्या नात्याने ते यहूदी नियमांतर्गत नव्हते - रोम 6:14.विश्वासींच्या पित्यासोबत, सहभागिता करण्यासाठी यहूदी प्रबंधाला, एका उपायाच्या रूपांत पाहू नये.

* **12:19-20** हे सर्व काही, या गोष्टीकडे संकेत करते की परमेश्वरी नियमावलीचे दिले जाणे ही भयानक गोष्ट आहे. निर्ग 19 चे नोट्स पाहा.

* **12:21** येथे मोशेद्वारे बोललेल्या गोष्टी, बायबलमध्ये आणखी कोठेही दिल्या गेल्या नाहीत. मोशेने सांगितलेल्या गोष्टीं, पवित्रात्मा जाणत होता, आणि त्या कोणत्या ना कोणत्या प्रकारे या पत्रात लेखकावर प्रगट केल्या गेल्या.

* **12:22** *"सीयोन पर्वताजवळ"*- लेखक, ख्रिस्तांठायी विश्वास आणि ख्रिस्तांद्वारे स्थापित, नव्या प्रबंधाची आशीर्वादित कारणें दाखवतो. स्वर्गीक सीयोन पर्वत जो की पार्थिव शहराच्या आत्मिक सत्याची वास्तविकता होती, त्याच्या छायेविषयी तो सांगत आहे.

* *"स्वर्गीक यरूशलेमेजवळ"*- गल 4:26; प्रकटी 21:10.

* *"ज्येष्ठांची"*- जे लोक महान प्रथम फळाशी/ जेष्ठांशी जुळलेले आहेत. पाहा रोम 8:29; कल 1:15,18; प्रकटी 1:5.

* **12:23** *"साधारण सभा"*- ग्रीक भाषेत याचा अर्थ, सात लोकांची सामान्य सभा, आराधना सभा किंवा सार्वजनिक उत्सव असा होता.

* *"स्वर्गात लिहिली"*- लूक 10:20; प्रकटी 21:20.

* *"न्यायी"*- स्तो 50:4-6; 96:13; यश 33:22; प्रेषि 17:31; रोम 2:16;

* *"मुक्ति...आत्में"*- जे लोक विश्वासातच मरण पावले आणि ख्रिस्तांच्या बलिदानाद्वारे मुक्त व निर्दोषी केले गेले (इब्री 10:10,14) आणि परमेश्वराच्या उपस्थितीत निष्कलंक असे आहेत.

* **12:24** *"नव्या कराराचे"*- 8:8-13; मत्त 26:26-28.

* *"शिंपडण्याचे ते रक्त"*- 9:14; 10:22; 1 पेत्र 1:2.

* *"हाबेलाच्या"*- उत्प 4:1हाबेलाचे रक्त त्या व्यक्तीच्या दंड आणि सूड भावनेसाठी बोलीत राहिले, ज्याने ते वाहवले होते. ख्रिस्तांचे रक्त, सुटका आणि क्षमेविषयी बोलते. इफि 1:7. 18-24 या वचनात लेखकाने स्पष्ट भाषेत सांगितले आहे की नवा करार, जुन्या प्रबंधापेक्षा किती श्रेष्ठ आहे. जुना प्रबंध, भीति आणि शिक्षेचा विषय आहे, परंतु नवा करार, दया परमेश्वरापर्यंत पोहचणे आणि अनंत आशीर्वादाचा विषय आहे.

आहा.
[25] *सावध असा व जो बोलतो* आहे त्याच्यापासून तोंड वळवू (लपवू) नका, कारण जर* त्या वेळचे मोशेचे लोक, पृथ्वीवर* * ताकीद देणाऱ्यांपासून तोंड वळवून वाचू शकले नव्हते, तर आपण चेतावणी देणाऱ्याच्या शब्दांकडे दुर्लक्ष करून कसे बरे वाचू शकू? [26] त्या वेळी, त्याच्या शब्दाने पृथ्वी हादरून गेली*, परंतु आता परमेश्वराने असे वचन दिले आहे, की "पुन्हा आणखी एकदां केवळ पृथ्वीच नव्हे, तर आकाशालाही* मी कांपवीन."
[27] *हे वाक्य 'आणखी एकदां' प्रगट करते की ज्या वस्तु हलविल्या जातात, त्या रचना केलेल्या वस्तु असलेल्यामुळे टळाव्यात व काढून टाकल्या जाव्यात; जेणेकरून ज्या वस्तु हलविल्या जात नाहीत, त्या टिकून अटळ रहाव्यात.
[28] या कारणास्तव असे राज्य* प्राप्त करून, जे ढळणार- हालणार नाहीये, परमेश्वराचे उपकार मानण्याचा हा मोका हातून जाऊ देऊ नका, जेणेकरून आपण शहाणपणाने समंजस होऊन आदरासह*, अशी आराधना करावी जी त्यास पसंत आहे. [29] कारण आपला परमेश्वर भस्म करणारा अग्नी* * आहे.

## 13

[1] *बंधुप्रेम कायम असो. [2] *अतिथी-सेवा व प्रेम करणे विसरू नका, कारण याद्वारे कितीतरी लोकांनी अजाणपणे नकळत स्वर्गदूतांचे* आतिथ्य केलेले आहे. [3] *कैद्यांची आठवण अशी ठेवा, जणू काय तुम्हीही त्यांच्याबरोबर कैदेत आहा. वाईट व्यवहाराने दुःखी असलेल्यांची आठवण ठेवून त्यांच्याकडे या प्रकारे लक्ष द्या की आपण देखील देहात आहोत.
[4] *विवाह ही सर्वांत अधिक आदराची* बाब समजावी, बिछाना निष्कलंक असावा, कारण परमेश्वर व्यभिचार व जारकर्मे

---

***12:25-29** या पत्रात, येथे विश्वास त्यागाविषयी ताकीद दिलेली आहे (2:1-4; 3:7-19; 6:4-8; 10:26-31) विश्वास त्याग म्हणजे नव्या कराराच्या, परमेश्वराच्या प्रकाशनाच्या विरोधात बंड करणे, उभे राहणे होय.

***12:25** *"बोलतो"*- परमेश्वर आहे (1:1-2)

* *"जर"*- पाहा 6:6; 10:26.

* *"पृथ्वीवर"*- सीनाय पर्वतावर मोशेने परमेश्वरबापाशी गोष्टी केल्या.

* *"स्वर्गातून"*- आपल्या पुत्राद्वारे परमेश्वराने असा वार्तालाप केला जसा की स्वर्गातून सरळ व प्रत्यक्षच केला होता. (योहान 1:18; 8:23; 12:49-50) ज्यांनी मोशेद्वारे दिल्या गेलेल्या परमेश्वराच्या वचनाकडे दुर्लक्ष केले, ते सर्व वांचू शकले नाहीत. तर मग ख्रिस्तांच्या गोष्टींचा तिरस्कार करणारे, नाकारणारे कसे वाचू शकतील? (2:3; 10:28-29; योहान 12:48).

***12:26** *"पृथ्वी हादरून गेली"*- निर्ग 19:18

* *"आकाशालाही"*- हाग्गय 2:6.

***12:27** 1:10-12 पाहा. प्रकटी 6:12-14; 21:1.येणाऱ्या भविष्यात, भौतिक सृष्टि नाहीशी होईल, परंतु परमेश्वराचे राज्य (सिद्धता) जे नव्या करारामुळे आलेले आहे व त्या गोष्टी ज्या 22-24 या वचनांत आहेत, त्या कधीच टळणार नाहीत.

***12:28** *"राज्य"*- मत्त 4:17; रोम 14:17.

* *"आदरासह"*- उत्प 20:11; ईयोब 28:28; स्तो 34:11-14; 90:11; 111:10; नीति 1:7.परमेश्वराचा आदर, सन्मान आणि परमेश्वरी भय आपल्यात नसेल, तर बुद्धि प्राप्त होत नाही आणि या प्रकारे केली गेलेली आराधना परमेश्वरबापाला ग्रहणयोग्य नाही.

***12:29** *"अग्नी"*- निर्ग 3:2चे नोट्स पाहा.

* *"भस्म करणारा अग्नी"*- यावरून ती 'पवित्रता' दर्शवली जाते, जी याच्या विपरित असलेल्या सर्व गोष्टींचा नाश करते; जो न्याय, अविश्वासींवर, प्रेम विसरणाऱ्यांवर तसेच परमेश्वराची वाणी न ऐकणाऱ्यांवर येईल, तो भयानक असेल. तुलना करा 2 थेस्स 1:7-8.

***13:1** योहान 13:34; रोम 12:10; 13:8

***13:2** रोम 12:13; 1 पेत्र 4:9; 3 योहान 1:5-8.

* *"स्वर्गदूतांचे"*- उत्प 19:2,22; 19:1-3.साधारणतः परमेश्वरदूत मनुष्यांच्या रूपात प्रगट होतात. जर आपण आतिथ्य केले तर, त्या वेळी एखाद्या परमेश्वरदूताचा नकळत पाहुणचार करण्याची संधी घरीच आपल्याला प्राप्त होऊ शकते.

***13:3** लूक 6:31; रोम 12:15; मत्त 25:34-40.प्रेम आपल्याला स्वतः दुसऱ्याच्या जागी ठेवण्याची संधी देते आणि त्यामुळे आपण त्या गोष्टींचा अनुभव करू शकू आणि दया दाखवू शकू.

* *परमेश्वर, यौन संबंधी गुन्हा करणाऱ्यांचा न्याय करेल.* प्रकटी 21:8; कल 3:5-6; इफि 5:3-6; 1 करिं 6:9-10.

***13:4** *"आदराची"*- ख्रिस्ती लोकांमध्ये लग्न/विवाह ही आदराची गोष्ट समजली जावी कारण परमेश्वरबापाने असेच ठरविलेले

करणाऱ्यांचा न्याय करील.
5 तुमचा स्वभाव लोभी नसावा, जे काही तुमच्याजवळ आहे त्यात संतोष करा, कारण सृष्टीकर्ता परमेश्वर स्वतःच म्हणतो, “मी
तुला कधी सोडणार नाही* व कधी त्यागणार नाही.”
6 *म्हणून आपण संकोच न बाळगता असे म्हणतो, “प्रभू माझा साहाय्यकर्ता आहे. मी भिणार नाही, मनुष्य माझे काय करू
शकतो?”
7 तुमच्या पुढाऱ्यांचे* व तुम्हांला परमेश्वराचा संदेश देणाऱ्यांचे स्मरण ठेवा. त्यांचे वर्तन पाहून, त्यांच्या विश्वासाचे अनुकरण*
करा.
8 *येशू ख्रिस्त काल, आज आणि युगानुयुग सारखेच आहेत. 9 अनेक प्रकारच्या वरवरच्या विचित्र* व उथळ उपदेशांमुळे तुम्ही
भ्रमात पडून बहकू नका. बलिदान वा अर्पिलेल्या खाद्य वस्तु, खाणाऱ्यांचा काहीच फायदा करीत नसतात म्हणून त्याऐवजी, आपले
मन अनुग्रहाने स्थिर ठेवणे अधिक फायद्याचे व बरे आहे. 10 आपली एक अशी वेदी* आहे, जिच्यावरचे पदार्थ खाण्याचा हक्क,
त्यांना नाहीये जे तंबूमध्ये सेवा करतात. 11 *ज्या पशूंचे रक्त महापुरोहित अपराध बलिसाठी पवित्रस्थानी घेऊन जातो, त्या पशूंची मृत
शरीरें छावणी बाहेर जाळली जातात.
12 म्हणूनच येशूंनीही आपल्या स्वतःच्या रक्ताद्वारे आपले लोक पवित्र करण्याच्या* हेतूने यरूशलेमेबाहेर* दुःख सहन केले.

---

आहे (मत्त 19:4-6).

***13:5** *“मी तुला कधी सोडणार नाही”*- अनु 31:6; मत्त 28:20; योहान 14:16.आपल्याबरोबर परमेश्वराची उपस्थिती ही जगातील सर्व संपत्तीपेक्षा अधिक श्रेष्ठ व मूल्यवान बाब आहे. जर परमेश्वरबाप आपल्यात आहे तर तो आपल्या सर्व गरजा भागवील (मत्त 6:25-34; फिलि 4:19) आणि आपल्या मनांत त्याची उपस्थिती असल्यामुळे आपण सर्व परिस्थितीत संतुष्ट राहू. परंतु जर विश्वासीं गुन्हा करीत असतील, तर परमेश्वर त्यांचा त्याग करणार नाही काय? कारण तो म्हणतो की मी तुला सोडणार नाही, तर आपल्याला अवश्य सोडणारच नाही. याचा अर्थ असा नव्हे की लोकांना अपराध करीत राहण्यासाठी स्वातंत्र्य मिळालेले आहे, याउलट प्रभूजी त्यांना स्वतंत्र करतो की त्यांनी पवित्र व्हावे (रोम 6:1-2; 15:18) परंतु, विश्वासी त्याला त्यागू शकत नाही काय? विश्वासी तसे करू इच्छित नाहीत, व सोडत देखील नाहीत (10:39; योहान 10:27) काही लोक ख्रिस्ती होण्याचा ढोल वाजवतात पण वास्तविक ते नाहीत, तसे लोक प्रभूला सोडण्याची इच्छा देखील करतात आणि सोडतातही. जर खऱ्या विश्वासीने असे करण्याची इच्छा केली तर ही फार कठीण गोष्ट होईल, म्हणून विश्वासीने विश्वास-त्यागाची इच्छा करू नये, अशीच आपण अपेक्षा ठेवावी. (पाहा स्तो 139:7-12)

***13:6** पाहा स्तो 118:6-7; रोम 8:31; मत्त 10:28-31; स्तो 27:1-3.माणसांनी आधीच त्याच्याविरूद्ध फार काही केलेले आहे (10:32-34); परंतु मनुष्याच्या भीतिचे स्थान त्याच्या जीवनात नव्हते; जे काही मनुष्याने केले होते ते क्षणिक होते. जर परमेश्वर त्याच्याबरोबर होता, तर त्याच्यासाठी आशीर्वादाची अनंत प्रतिज्ञाही होती. तुलना करा 2 करिं 4:17-18.

***13:7** *“पुढाऱ्यांचे”*- तो कदाचित त्या लोकांविषयी उल्लेख करतो, ज्यांनी आधी त्यांना आनंदाची बातमी ऐकवली होती.

* *“अनुकरण”*- 1 करिं 4:16; 11:1; फिलि 3:17; 1 थेस्स 1:6; 2 थेस्स 3:7,9.

***13:8** मानवीय पुढारी जिवंत राहतात, मरतात, येतात आणि जातात. ख्रिस्त येशू नेहमी सारखेच आहेत (1:12), महान प्रमुखयाजकाच्या रूपांत त्यांची सेवा तशीच आहे (7:24-25). मुख्य गोष्ट हीच आहे की त्यांचे चरित्र किंवा लोकांसाठी त्यांनी केलेली प्रेमपूर्ण सेवा यात कोणताच बदल होणार नाही, यात शंकाच नाही. ते सदासर्वदा तसेच राहतील, जसे ते प्रारंभापासून होते; जुन्या करारात होते आणि या पृथ्वीवरील आपल्या जीवनकाळात होते.

***13:9** *“विचित्र”*- इफि 4:14; रोम 16:17; प्रेषि 20:20; मत्त 7:15.लेखकाच्या मनात रीतिविधिंसंबंधी, भोजनाच्या आत्मिक मूल्यांसंबंधी यहूदी शिक्षण होते ही गोष्ट स्पष्ट आहे. (तुलना करा रोम 14:2,14,21; 1 करिं 8:8; कल 2:8,16-23; लेवी 11:2-23चे नोट्स पाहा) केवळ परमेश्वराची कृपाच, आत्मिक जीवनाचे पोषण व संगोपन करू शकते, भौतिक वस्तु नाही.

***13:10** *“एक ......वेदी”*- ख्रिस्तांत विश्वासी लोकांची दिसणारी 'पदार्थिक वेदी' नाही, लेखक ख्रिस्तांच्या क्रूसावरील बलिदानाविषयी सांगतो. जे लोक ख्रिस्तांना विश्वासाने ग्रहण करतात/मान्य करतात, त्यांच्या जवळ नवीन योग्यता आहे, रीतिविधि असलेले जीवन नाही (योहान 6:53-58,63) जे लोक जुन्या यहूदी प्रबंधानुसार सेवा करतात आणि 'ख्रिस्त व नवा करार' ही अमान्य करतात, नाकारतात, अस्वीकार करून त्याकडे दुर्लक्ष व त्याची उपेक्षा करतात, त्यांचा या 'वेदीत'कोणताच भाग/हिस्सा नाही.

***13:11** तो प्रायश्चिताच्या दिवसाकडे इशारा करतो - 9:7. लेवी 16:27पाहा त्या दिवशी बलिदान केलेल्या पचे मांस, कोणीच खात नाही. हे देखील निश्चितच आहे की ख्रिस्तांचे बलिदान केलेले यथार्थ शरीर/देह कोणीच खाऊ शकत नाही - हे अविश्वसनीय आहे.

***13:12** - *“पवित्र करण्याच्या”*- किंवा वेगळे करणे - 10:10 येशूंचे रक्त विश्वासींसाठी याच प्रकारचे कार्य करते.

[13] यास्तव त्यांची निंदा* आपणावर घेऊन, आपणही यहूदी मतांच्या रीतिविधिंचा त्याग* करू या, [14] कारण येथे आपले कोणतेच स्थायिक व स्थिर नगर नाहीये, याउलट आपण अशा एका नगराच्या* शोधात आहोत, जे भविष्यकाळी (पुढे) येणार आहे.

[15] *तर आता, आपण स्तुतिरूपी* बलिदान म्हणजे 'ओठांचे फळ' अर्थात जे येशू नांवाचा अंगिकार करतात, आपल्या परमेश्वरासाठी निरंतर अर्पण करीत राहू या. [16] भलेपणाची व हिताची कृत्यें* लक्षात ठेवा, दान देणे सुद्धा विसरू नका, कारण परमेश्वर अशा प्रकारच्या बलिदानांमुळे खूप खूप समाधानी होत असतो.

[17] आपल्या पुढाऱ्यांच्या* आज्ञेत रहा, त्यांच्या आधीन व्हा, कारण तुमचे मार्गदर्शक (पुढारी) अशा लोकांप्रमाणे सतर्क व जागृत असतात, ज्यांना आपआपल्या कार्यांचा हिशेब* द्यावा लागतो, म्हणून तर हे कार्य ते आनंदाने करण्याच्या प्रयत्नात असतात; दुःखाने किंवा त्रासिक होऊन वा कण्हून नव्हे, कारण त्या स्थितीत कोणताही फायदा नाही,ते तुमच्या हिताचेही नाही.

[18] आम्ही सर्व बाबतीत आदर आणि सन्मानाने जगण्याची व वागण्याची इच्छा धरतो, म्हणून आमच्यासाठी प्रार्थना करीत जा, कारण आमची खात्री आहे व विश्वास देखील की आमच्याठायी शुद्ध विवेक* आहे. [19] *तुम्हांस आणखी समजावून सांगतो, की या कार्यासाठी मी लवकर तुमच्याकडे पुन्हा यावे अशी प्रार्थना करा.

[20] आता शांतीदाता परमेश्वर*, ज्याने आपल्या प्रभू येशूंना, जे मेंढरांचे महान राखणकर्ते व आदर्श मेंढपाळ आहेत, सनातन कराराच्या रक्ताने* मेलेल्यांतून जिवंत करून परत* आणले. [21] *तो परमेश्वर तुम्हांला प्रत्येक चांगल्या कार्यांत यासाठी स्थिर करो की

---

* *"यरूशलेमेबाहेर"*- वधस्तंभाचे स्थान (गुलगुथा किंवा कालवरी) यरूशलेमेबाहेर होते (मत्त 27:32-33)

* *"निंदा"*-12:2 दोषी ठरवले गेलेले अपराधी क्रूसावर खिळले जात होते. जर आपण ख्रिस्तांचा मृत्यू स्वीकारतो तर ही गोष्ट स्वीकार करतो, की आपण अशा प्रकारचे दोषी व गुन्हेगार आहोत जे मरणास/मृत्युस पात्र आहेत. विश्वासीं लोक क्रूसित तारणाऱ्याचे क्रूसित लोक आहेत. (गल 6:14) आणि तसे म्हणताना, अंगिकार करतांना त्यांनी लाजू नये.

* **13:13** *"यहूदी..... त्याग"*- यहूदी मत किंवा जुन्या कराराच्या विधिंच्या बाहेर.

* **13:14** *"नगराच्या"*- 11:10,16; 12:22.

* **13:15-16** जुन्या करारात, याजक बलिदान अर्पण करत असत. याठिकाणी लेखक संकेत करतो की येशू ख्रिस्तांत, सर्व विश्वासी नव्या कराराचे याजक आहेत. पाहा 1 पेत्र 2:5,9; प्रकटी 1:6त्यांचे बलिदान पशु किंवा भौतिक वेदीवरील भौतिक वस्तु नाहीत, पण त्यापेक्षा काही वेगळे आणि सर्वोत्तम असे, स्तुतिरूपी बलिदान आहे.

* *"स्तुतिरूपी"*- पाहा स्तो 33:1-3;

* **13:16** *"भलेपणाची ...कृत्यें"*- नव्या कराराचे याजक असल्यामुळे विश्वासींची ही एक अत्यंत महत्वपूर्ण सेवा आहे. पाहा मत्त 5:16; 25:34-40; लूक 6:27,35; रोम 12:21; 2 करिं 9:8; गल 6:10; कल 1:10; 2 थेस्स 2:17; याकोब 1:27; 1 पेत्र 2:12; मत्त 5:42; रोम 12:13; गल 6:6; 1 तीम 6:18; 1 योहान 3:17.परमेश्वरबाप अशा प्रकारची अर्पणें ग्रहण करतो व त्यामुळे तो प्रसन्न व संतुष्ट होतो. तुलना करा 10:6;आणि इतर दुसरी अर्पणें जी परमेश्वराला संतोषवितात. पाहा रोम 12:1.

* **13:17** *"पुढाऱ्यांच्या"*- चर्चमध्ये पुढारी असावेत आणि त्यांच्याजवळ अधिकार देखील असावेत. परमेश्वरबाप त्यांना नियुक्त करतो म्हणून त्यांचा अधिकार परमेश्वरबापाकडूनच त्यांना प्राप्त होतो. लेखकाला ठाऊक होते की इब्री चर्चचे पुढारी चांगले होते. सर्वच पुढारी चांगले नसतात आणि असे पुढारी देखील आढळतात, जे परमेश्वराने प्रगट केलेल्या खऱ्या सत्यानुसार जीवन जगत नाहीत (तुलना करा प्रेषि 4:19; 5:29) ,आणि नव्या कराराच्या शिक्षणानुसार आज्ञा देत नाहीत, अशा लोकांचे न ऐकलेले बरे. चर्चचे चांगले पुढारी, सदस्यांचा सांभाळ करतात. प्रेषि 20:28; 1 पेत्र 5:1-4.

* *"हिशेब"*- चर्चच्या पुढाऱ्याला परमेश्वराच्या लोकांचे वरील त्याचे नेतृत्व/मार्गदर्शन/पुढारीपण तसेच स्वतःच्या वैयक्तिक जीवनाचाही हिशेब द्यावा लागेल.

* **13:18** *"शुद्ध विवेक"*- 2 करिं 1:12; 4:2.

* **13:19** रोम 15:30-32; फिलेमोना 22.

* **13:20** *"शांतीदाता परमेश्वर"*- 7:2; रोम 15:33; 16:20; 2 थेस्स 3:16.

* *"सनातन कराराच्या रक्ताने"*- 9:12; 10:29; मत्त 26:28.येथे नव्या कराराला 'सनातन'असे म्हटले गेले आहे. परमेश्वराने जे काही आपल्या लोकांसाठी निश्चित केले, त्या सर्व गोष्टीं हा करार पूर्ण करतो, आता आणखी दुसऱ्या कराराची गरज नाही.

* *"मेलेल्यांतून ......परत"*- मत्त 28:6.या पत्रात हेच असे एकमेव स्थान आहे जेथे लेखक ख्रिस्तांच्या जिवंत होण्याविषयी सांगतो. परंतु तो अनेकदां याविषयी सूचित करतो - 1:3; 2:9; 10:12-13.

* **13:21** प्रत्येक विश्वासीसाठी, केवळ परमेश्वरबापच अशा प्रकारचे कार्य करू शकतो, कोणताही विश्वासी स्वतःसाठी हे कार्य करू शकत नाही. परमेश्वर जर आपल्याला चांगल्या कार्यासाठी व सिद्ध कार्यासाठी तयार करीत नाही तर स्वतः आपण कधीच

तुम्ही त्याची इच्छा पूर्ण करावी; परमेश्वराला जे काही पसंत आहे ते सर्व येशू ख्रिस्तांद्वारे तो तुमच्यात उत्पन्न करो, परमेश्वराचे गौरव व त्याचा महिमा युगानुयुग असो. होय, असेच व्हावे.
22 हे भावांनो तुम्हांला विनंती करून म्हणतो, की शिकवणीच्या* या बोधप्रद गोष्टी ऐकून त्यानुसार वागा, मी तुम्हांस थोडक्यात लिहिले आहे.
23 ध्यानात असू द्या, की तीमथ्य* आपला भाऊ याची सुटका झाली आहे, तो लवकर आला तर त्याच्याबरोबर मी तुम्हांला भेटावयास येईन.
24 आपल्या सर्व पुढाऱ्यांना आणि पवित्र लोकांना सलाम सांगा. इटालीचे सर्व तुम्हांला सलाम सांगतात.
25 तुम्हां सर्वांबरोबर परमेश्वराची कृपा* असो.

---

समर्थ ठरू शकणार नाही; त्याचप्रमाणे जर परमेश्वरबाप आपल्या जीवनात कार्य करीत नसेल तर आपली कामें त्यांला कधीच प्रसन्न करू शकत नाहीत. तुलना करा 2 करिं 3:5; फिलि 2:13; कल 1:29.प्रत्येक विश्वासीच्या जीवनाचे लक्ष्य किंवा हेतू, प्रभू येशूंसारखाच असावा. (मत्त 26:39; योहान 4:34; 6:38; 8:29). या सर्वांत परमेश्वराची इच्छा कमी नाही किंवा अधिक नाही किंवा काहीच नाही. सर्व काही विश्वासींच्या इच्छेवरच अवलंबून आहे, की त्याने प्रभू येशूंसारखे जीवन जगावे. परमेश्वरबाप ख्रिस्तांद्वारे विश्वासीच्या जीवनात ते कार्य करतो, ज्याची त्याला गरज आहे. केवळ येशूच परमेश्वराच्या कृपेचा, सामर्थ्याचा एकमेव स्त्रोत आहेत.

***13:22** *“शिकवणीच्या”* - लेखकाने ज्या सैद्धांतिक सत्याचा येथे उलगडा केलेला आहे (प्रस्तुत केलेले आहे), त्याच्यानंतर काही उपदेश सुद्धा केले गेले आहेत. वारंवार त्यांत लिहिले गेले: “करून” आणि “या” वचन 13,15; 2:1; 4:1,11,14,16; 6:1; 10:19,22,23,24; 12:1,28.तो व्यावहारिक कारणांनी लिहितो आणि त्यांना गहन खोल सत्य सांगतो, यासाठी की त्यांनी त्यावर अमल करावा आणि गंभीरतेने, योग्य असे जीवन व्यतित करावे.

***13:23** *“तीमथ्य”*- प्रेषि 16:1स्पष्ट आहे की तो कैदेत होता.

***13:25** *“कृपा”*- योहान 1:14,16; रोम 1:7; 2 करिं 8:9याविषयी टीप पाहा.